REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस..................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका..........................=२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........=१ =६
दुसरे खेपेस.... ........=१

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptious to be paid in advance,
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 4 MAY 1903 NO 17

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ४ माहे मे सन १९०३ इ० अंक १७

K. N. ESMAYAL & Co.

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु. १॥.

तापावर एग्युनिक्चर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं. रु. १

गजकर्णाचे अतिम सोनेरी मलम कि. ४ आणे

पानथरीवर अमोलीक गोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाठव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. रु६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

खरेदी करा !

रास्कोपची थेट व खरी


पेटेंट वॉचेस

नकली मालास भुलून

पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फॉरेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. ही वश्यलें आम्ही स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलों आहोत, करीत आहोत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस..................४०
१९ ,, हंटिंग...........................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ..........२५०

मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें.................२०
१९ ,, हंटिंगचें .......................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

इनामलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपनफेस............२०
१९ ,, हंटिंग.........................२०
१४ ,, रिस्टवॉच...................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ ,, हंटिंग.........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ...............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ...............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद काटा असलेलें ......................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .....................४९

लेडिज वॉचेस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर ह्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही बेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत रु० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०
२७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना-- अलिकडे २।३ वर्षे आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सहीं पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली

जि० रत्नागिरी

नोटीस

रा० रा० परशराम वलद बनसींग राहणार गरसोळी तालुके आकोट पोस्ट दहिहांडा. यांस.

नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही वऱ्हाडसमाचारांतून तारीख २०।४।०३ इसवीची नोटीस दिली ती पावली आत तुम्ही लिहिलें कीं आम्ही १८ खंडी कापूस दिला परंतु आम्हास एक शेर सुद्धां कापूस तुम्हीं दिला नाहीं तुम्हास आम्ही शेतें वाहण्यास दिलें नाहींत सबब तुम्ही ही बेमानकी उभी केली आहे. अता खोटेपणा तुमचा चालणार नाहीं. आम्ही तुमचे पासून रुपये एकदम फिर्याद करून घेऊं अगर तुम्ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आमचे दुकानावर येऊन हिशोब करून आमचे रुपये चुकते करावें तुम्ही म्हणता कीं आम्ही हिशोबाकरितां दोनचार वेळ दुकानावर आलों ही गोष्ट किती खरी आहे हें तुमचे मनांत समजून येईल. आमचें काम हेंच आहे कीं कोणी हिशोब करून रुपये देत असल्यास हिशोबापेक्षां दोन रुपये कमी घेतों हा आमचे दुकानचा धारा आहे. तुमच्या सारख्या आमच्या असाम्या १०० आहेत तुम्ही खोटेपणा केल्यानें आमचे रुपये बुडतील असें समजूं नये. आम्ही आज रोजीं हिशोब करण्यास तुमचेकडे महिबूब शिपाई पाठविला असतां तुम्ही हिशेब करण्यास आलां नाहीं म्हणून या नोटिशीचा खर्च तुमचे पासून कोर्ट मार्फत घेतला जाईल कळावें तारीख २६।४।१९०३ इसवी.

सही

नानूराम मेघराज मारवाडी साहू दुकान कुटासें तर्फे मुखत्यार बापू सदाशिव राहणार कुटासें दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ८ शके १८२४

## प्लेगाचा प्रतिकार

सध्यां प्लेग नाहींसाच होत चालला आहे ही आनंदाची गोष्ट खरी; पण असा ग्रीष्म काळचा सूर्य सदोदित थोडाच राहणार आहे! सूर्याच्या तीव्र तापानें प्लेगाचा रोग हटतो हें आतां चांगलें अनुभवाला आलें आहे. तथापि असा कडक उन्हाळा संपून वर्षाकालाला प्रारंभ झालाच पाहिजे आणि मोठी भीती अशी आहे कीं प्लेगाचा रोग पुन्हां पावसाळ्यांत उद्भवेल. प्लेगाचें ठाणें येथें पक्कें बसलें आहे. उष्णकालानें हा रोग सध्यां दबल्या सारखा आहे पण त्याचा अंमल मोठ्या जोरानें येत्या श्रावण भाद्रपदांत सुरू होईल अशी मोठी दहशत आहे. इतर ठिकाणचा अनुभव हीच गोष्ट ध्वनित करितो. भावी अरिष्टाचा प्रतिकार आपल्या हातीं फारसा नाहीं तथापि ज्या गोष्टी आपण अगाऊ करण्या सारख्या आहेत तत्संबंधानें अनास्था व विलंब होऊं नये म्हणून आज आम्ही कांहीं सूचना करीत आहों.

कुमार श्रीहरमासजी यांनीं प्लेगा संबंधाची जी व्यवस्था घालून दिली आहे तीच मे. रुस्तुमजी साहेबांनीं चालू ठेविली आहे. प्लेगाची वस्ती सोडावी हा उत्तम उपाय खरा पण ही गोष्ट ज्याच्या त्याच्या इच्छेवर सोंपविली आहे. कोणावरही गांव सोडण्याचा जोर व जुलूम होणार नाहीं तथापि डिपुटी कमिशनर साहेब आग्रहपूर्वक लोकांस सांगत आहेत कीं स्थानत्यागाचाच उपाय सर्वांनीं स्वीकारावा. या उपायानें प्लेगाचा प्रतिबंध उत्कृष्ट होतो. जो तो आपल्या जीवाचा राजा आहे पण भला बोधाची गोष्ट सांगण्याला कांहींच हरकत नाहीं उपदेशानें जर कोणाची नीट समजूत पडेल व तो स्थानत्यागाचा उपाय करण्याला प्रवृत्त होईल तर एक मोठीच गोष्ट फळास आली असें होईल.

स्थानत्यागाचा उपाय सोपा नाहीं, त्याला अडचणी फार येतात व गरिबीमुळें हा उपाय सुसाध्यही नसतो. मे० रुस्तुमजी साहेब लोकांस वरचेवर सांगत असतात कीं हा उपाय करितांना प्रत्येकानें आपली पराकाष्ठा करून सोडली पाहिजे. प्राणाहून प्यारी चीज दुसरी नाहीं आणि त्याच्या रक्षणाचा हा रामबाण उपाय आहे हें लोकांस पक्कें समजाऊन देण्याचा सरकारी अधिकाऱ्यांचा विचार आहे. सध्यां जंगलांत जाऊन राहण्याची जरूरी नाहीं पण पुढें अवश्य लागणाऱ्या या जरूरीची कांहीं तरी तजवीज आताच केली पाहिजे. पर्जन्यकाळ सुरू झाल्यावर शेतांत राहण्याची सोय करण्याला फार कष्ट पडतील म्हणून एव्हां पासून मा रुस्तुमजी साहेबांचें लोकांस पुनः पुनः सांगणें आहे. सरकारांतून ज्या सवलती देण्या सारख्या आहेत त्या ते देण्याला अगदीं तत्पर आहेत. शेतांत राहण्यासाठीं लोकांस सरसकट परवानगी देण्यांत आली आहे. त्या शिवाय रस्त्यांच्या सोयी किंवा विहिरींच्या सोयी लोकांस स्थलविशेषीं पाहिजे असतील तर त्या करून देण्याविषयीं सरकारांतून अगोदर योजना केली जाईल, लोकांनीं आपल्या गरजा अधिकाऱ्यांपुढें मांडल्या पाहिजेत म्हणजे त्यांच्याकडे प्रथम लक्ष्य पुरविण्यांत येईल असा आम्हास पक्का भरंवसा आहे.

## अनुभव

(स्थानत्यागाच्या उपायाविषयीं)

जंगलमें मंगल असें म्हणतात तें कांहीं अंशीं चांगलें प्रत्ययाला आलें. शेतांतली वस्ती मोठी मंगलकारक आहे असें वाटतें. जे सुखवस्तु लोक शेतांतून राहण्यास गेले आणि ज्यांची तेथें नीटशी संभावना होऊं शकली ते सर्वजण सांगतात कीं शेतांतील वस्तीचा असा सुखकर परिणाम पूर्वी ठाऊक नव्हता. शहरांतल्या दाट वस्तीचा त्रास नाहीं. मोकळी हवा मनाला फार आल्हाद देते. मोकळ्या हवेंत अन्न पाण्याला देखील चांगली चवी येते. स्वेच्छाचाराची मोठी वाटते. चार श्रमाचीं कामें करण्याला हौस वाटते. विश्रांतीची व आरामाची योजना शेतांत असल्यावर शेतांतल्या सारखा रम्य आश्रम नाहीं असें मनाला वाटूं लागतें. शहर गांवच्या वस्तीचा अनुभव आल्या नंतर रानांतील वास्तव्य फार सुखकर व आरोग्य कारक वाटूं लागतें. रानांतील वास्तव्याची खरी कल्पनाच फार थोडे जणांस असते. शहरांतील वस्तीच्या सुखदुःखाला चांगला पालट रानामध्यें वाटतो. शेतांतून वस्ती करण्यासारखी सोय बहुधा नसते आणि त्या मुळें शेतकऱ्यांस देखील जंगलच्या वस्तीचें बहुविध सुख चांगलेंसें ठाऊक नसतें. आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें आम्हांस जंगलची वस्ती फार पसंत आहे. तिचे इतर दोष पुष्कळ असतील पण प्लेगा सारख्या मृत्यूच्या होमकुंडांत पडण्या पेक्षां जंगलच्या वस्तीचा रस्ता धरावा हा विहित मार्ग होय. आम्ही असें सूचवितों कीं ज्यांस साध्य असेल त्यांनीं एक वेळ आपापल्या आरोग्या साठीं निदान कांहीं दिवस जंगलच्या वस्तीचा अनुभव घेऊन पहावा आणि जर कोणी लोकांच्या माहिती साठीं आपला अभिप्राय आम्हाकडे पाठवितील तर तो आम्ही मोठ्या खुषीनें प्रसिद्ध करूं.

## विचारांचा रंग

सूर्यकिरणाचें पृथक्करण केलें असतां सप्तविध रंग निघतात; किंबहुना एका शुभ्र पांढऱ्या रंगामध्येंच इतर काळा, निळा, पिंवळा, अस्मानी, तांबडा, गुलाबी इत्यादि रंग छायारूपानें अंगभूत असतात. वस्तुमात्राला रंग असतात. व ते आपण पाहतों. पण अलिकडे असा नवीन शोध निघाला आहे कीं माणसाच्या प्रत्येक विचारालाही [illegible] असतो. हा शोध वाशिंग्टनचे प्रोफेसर गेटस यांनीं लाविलेला आहे. त्यांनीं एक कांचेची बाटली तयार केली आहे आणि तिच्या मध्यें दोन नळ्या असतात. एका नळींत स्वच्छ पातळ द्रव्य ठेविलें असून दुसऱ्या नळीच्या तोंडाशी श्वास सोडला म्हणजे तो या पातळ द्रव्यांत येऊन मिळतो. ज्या मनुष्याचे विचार आपणास कळावयाचे पाहिजेत त्याला नळीच्या तोंडाशी श्वास सोडण्याला सांगावें म्हणजे त्या श्वासाच्या द्वारानें त्याच्या विचाराचा रंग प्रवाही द्रव्यांत दृश्यमान होतो. दुसऱ्याचे मनोविकार समजण्याला ही युक्ती मोठी नामी आहे. ही बाटली म्हणजे मनुष्याच्या अंतरंगाचा आरसाच आहे. या बाटलींत मनुष्याच्या मनोवृत्तींचें प्रतिबिम्ब पडतें. हें प्रतिबिम्ब म्हणजे त्या त्या मनोवृत्तीचा रंग नळींतील प्रवाही द्रव्यांत उतरतो. हर्षशोकादि निरनिराळ्या विकारांचे रंग भिन्न भिन्न आहेत. मनोविकारांच्या जशा नाना छाया असतात तशा रंगांच्याही अनेक छाया असतात. नाना रंग जसे एकत्र होऊन विलक्षण छटा दाखवितात त्याच प्रमाणें नाना मनोवृत्ती एकत्र होऊन मनुष्य स्वभावाचें वैचित्र्य व्यक्त करीत असतात. विचारांस वर्ण असतात अशी कल्पना ब्रह्मविद्येंत आहे पण तिची परिस्फूटता या शोधानें चांगली होते.

या बाटलीवर एका निराशवृत्तीच्या विद्यार्थ्यानें श्वास टाकल्या बरोबर तें पातळ पाण्या सारखें द्रव्य फिकट हिरव्या रंगाचें झालें. त्या नंतर एका चाल, पाणीदार, व उत्साही विद्यार्थ्यानें आपला श्वास सोडला तेव्हां तो हिरवा रंग जाऊन तेथें रक्तवर्ण उत्पन्न झाला. त्या नंतर एका शांत व आनंदी मुद्रेच्या माणसानें आपला श्वास सोडला तेव्हां त्या प्रवाही द्रव्याला मूळचा शुभ्र रंग येऊं लागला. कोणत्या मनोविकाराचा कोणता वर्ण आहे हें अजून सिद्ध झालेलें नाहीं पण कालान्तरानें आपण वस्तुमात्राचें वर्णन जसें त्याच्या रंग वरून करितो तसेंच मनुष्याच्या अंतःकरणाचें वर्णन त्यांतील नाना वृत्तींच्या रंगा वरून करण्याला प्रारंभ करूं.

मनोविकारांस वर्ण असतात असें प्रथम खरें वाटत नाहीं. त्याला एक दुसरें प्रत्यन्तर आपल्या पाहण्यांत येत असतें. मनुष्याचा देह व अंतस्थ मन यांचा परस्पर संबंध फार सूक्ष्म व निकट आहे. मन हें देहाचा सूत्रधारी आहे. मनाची सर्व हालचाल देहद्वारा प्रकाशित होत असते; पण आपली दृष्टी चांगली सूक्ष्म नसते व देहाचे क्षणोक्षणीं दृश्यमान होणारे रंग आपल्याला नीटसे कळत नाहींत. तथापि मनुष्याच्या मनाचा क्षोभ होतो तेव्हा त्याचा चेहरा लाल होतो ही गोष्ट चटकन कळून येते. तद्वत नाना मनोविकारांचे रंग चेहऱ्यावर व्यक्त होतात आणि म्हणूनच आपण चेहऱ्यावरून मनुष्याच्या मनाची परीक्षा करीत असतों. मनोविकाराला वर्ण आहेत आणि त्यांचें प्रतिबिम्ब देहाच्या वर्णामध्यें होत असतें त्या अर्थी अशी गोष्टही सुसाध्य दिसते कीं मनाला सुप्रसन्नता व आल्हाद देणारे रंग कृत्रिम उपायानीं आपल्या पुढें आपण आणिले तर त्या पासून आपली मनोव्याधी व शारीर व्याधी या दूर व्हावयाला पाहिजेत. सूर्य किरणाच्या विशिष्ट योजनेनें वाटेल तसे रंग उत्पन्न करिता येतात आणि मानसिक व शारीरिक संपत्तीला अनुकूळ अशा रंगांमध्यें आपण जाऊन बसलों तर आपणास आराम वाटून आनंद झालाच पाहिजे. अलिकडे वैद्यशास्त्रामध्यें जो नवीन शोध लागला आहे कीं निरनिराळ्या रंगाच्या बाटल्यांतून सूर्यकिरण शरीरावर पाडले म्हणजे व्याधी दूर होतात त्या शोधाचा उत्तम वरील विवेचनावरून चांगला कळण्यासारखा आहे. आज कांहीं विचार वर्णदृष्टीनें वाचकांपुढें मांडले आहेत त्याचा हेतु इतकाच कीं या वर्णरचनेकडे त्यांची दृष्टी जावी आणि त्या नजरेनें त्यानीं आपल्या पुढील नित्याच्या गोष्टी पाहण्याचा प्रयत्न करावा.

## रत्नतेज.

मागच्या वर्षा पूर्वी आम्ही असें लिहिलें होतें कीं नवरत्नांचीं तेजें तीं वापरणाऱ्याच्या शरीरप्रकृती प्रमाणें अधीक उज्वल, मंद किंवा निस्तेज दिसतात. असा अनुभव सांगतात कीं क्षयरोग्याच्या अंगावर रत्नहार सारखा राहूं दिला तर कांहीं कालानें रोग्याची फिकट कांती त्या हारांतील मोत्यावर येते. हीच गोष्ट मोत्या प्रमाणें पाच, नील, वैडूर्य, पुष्कराज, हिरा, माणिक इत्यादि रत्ना संबंधानें खरी ठरते. वर वर्णाची थोडी मीमांसा केली आहे त्यावरून रत्नतेजाचा संबंध मनुष्याच्या वर्णकांतीला परिपोषक कसा होतो हें समजेल. नाना रंगाचें मिश्रण यथायोग्य झालें त्यांचे एकीकरण डोळ्याला मोठा आल्हाद देतें पण तेंच मिश्रण यथायोग्य न झालें तर त्याचा विपरित परिणाम घडतो, तशीच गोष्ट रत्नतेजाचा संबंध शरीराच्या कांतीशी येतो तेव्हा घडते. रत्नतेज व शरीराचे तेज यांचें मिश्रण होतें तेव्हां उभय तेजें परिपोषक होतात किंवा परस्परांस हीनत्व आणितात. यथायोग्य मिश्रण होण्याला रत्न चांगलें तेजस्वी व शरीर चांगलें निरोगी कांतिमान पाहिजे. याच्या उलट प्रकारचें मिश्रण परस्परांच्या अवगुणाचें द्योतक होतें.

## जकात.

आमच्या मुनसिपालिटीपुढें उत्पन्न वाढविण्याचा प्रश्न पुष्कळ दिवसा पासून होता. तो एकदाचा निकालास लागला आणि अखेरीला आकोल्यांतल्या आकोल्यांत खपणाऱ्या मालावर जकात बसविण्याचा ठराव मुनसिपाल कमिटीनें केला आहे. उत्पन्न वाढविण्या शिवाय मुनसिपालिटीला दुसरी गतीच नव्हती आणि सालोसाल वाढणाऱ्या खर्चाची तोंड मिळवणी करण्याला व शहरसफाईच्या नवीन गोष्टी करण्याला उत्पन्नाची रक्कम वाढविणें भाग आहे असा अलिशान रेसिडेंट साहेबांचा देखील अभिप्राय पूर्वी पासून आहे. हल्लींचे कर फार जबर आहेत आणि त्यांच्या जोडीला आतां नवीन कर बसविण्यांत येतील म्हणून ही गोष्ट लोकांस आवडणार नाहीं. लोकांच्या तक्रारी कोणी ऐकतील असाही रंग दिसत नाहीं. शहरच्या वस्तीचें सौख्य पाहिजे असेल तर [illegible] प्रकारचे कर द्यावेत आणि जर [illegible]ट कबूल

असेल तर शहराची वस्ती सोडून द्यावी असा फोटीक्रम कांहीं समासद उठवितात तेव्हां नवीन कराविषयीं तक्रार करणाऱ्यांला निरुत्तर व्हावें लागतें. आकोलें शहराचा मुख्य व्यापार ह्मणजे कपाशीचा होय; तेव्हां या व्यापारावर नवीन कर बसवावेत ह्मणून पुष्कळ खडाजंगीचे वादविवाद झाले आणि अंबरी-छा येथील फ्याक्टरींतून वइलेल्या कापसा वर व कपाशीच्या गठल्यांवर जो कर बस विण्याची वाटाघाट चालूं होती ती बाजूला राहिली. आणि जकाती बसविण्याचा संकल्प मुनसिपालिटीनें स्थानिक सरकाराकडे कळ विला आहे. जकातीचा कर सर्व गांवकऱ्यांव र बसतो आणि तो येणेंप्रमाणें अप्रत्यक्ष रीतीनें बसतो तथापि या कर वसूल कर-ण्याला खटाटोप मोठा करावा लागतो. जकात एकवेळ बसली ह्मणजे सर्व पदार्थ रस्तर प्रमाणानें महाग होतील. जकातीचा कर आह्मांला पसंत नाहीं पण ज्या अर्थी दुसऱ्या एखाद्या कराची योजना मुनसिपा-लिटीला पसंत पडत नाहीं त्या अर्थीं जकाती चा ठराव मान्य करण्याशिवाय गत्यंतर दिसत नाहीं.

## The Berar Samachar

MONDAY MAY 4 1903

The Bombay Presidencial Social Conference at Dharwar has a special attraction for us. It met under the presidentship of one of our best leaders. Mr. Vishnu Moreshwar Mahajani was invited to take the chair and though with modesty he denies all pretensions to such a high position we were very glad to learn this choice of the people of that large presidency and we are further delighted to welcome the news that every one in the assembly at Dharwar went with the heart-felt impression that he was by far the only righ man in the right place. Mr. Mahajani is very popular in Berar as a distinguished member of the educational department. His nam is a household word in the provice and all give him the highest honor for his great learning, his sincerity of purpose, his simplicity of life and his benevolent heart to influence very one that comes in contact wit him. He has got the magic of ennobling the ambitions of the young generations that thrived under his benign smile as a school—master. He is the rare tact of persuading the most refractory people to his ways of thinking and introducing reforms in the genial manner in which he does all his business. To compare little things with great ones, he is called the Ranade of Berar. Wh the late Rao Bahadur M. G. Ranade was to the whole of the Maharashtra Mr. Mahajani is to this province and the neighbouring central provinces. He is sometimes good to a ult. His plain talk often came in his way of promotion to the highest rung in the educational ladder. Whatever he sacrificed in the public service for the honesty of his cause he gained in the estimation of the pub. His ardous work will always endear him to every man. Though he is towards the other side of 50, he is hale and strong. The success of his ... a key to the right ways of an actual reformer. He is a reformer to the core though he is catholically religious in his observances of all forms of orthodoxy. His is a solid example for reformers. We cannot do justice to his learned inangural address in this week. But we do not lose sight of his optimistic retrospect of the last 25 years' progress though he is himself not satisfied with the slow growth of an Indian nationality that promises to build up a bright future for India in no distant time. He observes--

" Fidelity in husbands has decidedly improved. Much of lip—loyal reform has given way to serious talk. Reforms are now put forth with a studied moderation and circumspection, which is in itself, an earnest of a serious resolve to bring them about. The difficulties in the shape of domestic opposition, which were at first made light of are now recognised in their due importance. A conviction is gaining ground that all reform to be permanent must be circumspect. Greater prominence is now given to the education of our masters—I mean, the ladies of our houses,—for the truth has come home that, after all, education is the only remedy to be relied upon in the solution of the problems that foce us. The number of widow marriages has been increasing, and the treament of widows at home is softening. An organised effort is being made—thanks to Professor Karve to make them useful members to society. Social intercourse with remarried couples is now tolerated. England-returned Hindoos are now freely admitted in some communities, provided they live here in Indian fashion. All must have observed that caste restrictions have lost much of their tyrannical hold, and that there is now little danger of a storm if not in, about a tea—pot. Female education has made considerable strides; we have now not only primary schools and Anglo—vernacular schools, but also high schools for Indian ladies, one in Poona and the other in Bombay. Arts and medical colleges have been thrown open to them and already we have the first fruits, which are certainly not sour. Who did not listen with pleasure to the speeches of sweet girl graduates on the conference platform at Ahmedabad? Along with sympathy for ladies and widows, that for the lower classes has been growing. Schools for Mahars have been started at Indapore and at a village in H. H. the Nizam's dominions, and also in connection with the orphanages started for their relief at Surat, Ahmedabad, Pandharpore and Dhulia. Amraoti has resolved on the last Hindu New year's day to start a similar institution for Berar. Instances of rich pleaders leaving by their wills large sums for the education and relief of the sick and the poor and the indigent, are not rare. In the domestic circle itself love is oftener appealed to, than fear. Particular castes, such as those of Deshmukhs, Kunbis, Dhangars even Mahars, have been been holding conferences or religious *Melas* in which marriage reform, education and temperance are advocated."

Here are some facts which an Englishman wishes to bring to the notice of the ruling people in regard to the future improvement of the Indian empire.

" India was once one of the greatest manufacturing countries in the world; now her industries are destroyed, be ... 000,000 during the last century for wars in which she has had no concern; and £ 30,000,000 are paid annually in various forms to Britain. The drain for salaries and soldiers during the past quarter of a century being £500,000,000, yet the average income of her citizens is only one and a-half cent. per day. Her people have no voice in her political destinies, as British make all laws, appoint all officers, make the tariffs, and control her commerce, railway, etc. yet Indians are the equals of their masters in knowledge, ability, and trustworthiness. Taxes are three times as heavy as in England; they are not collected in produce, but in cash; which very often places helpless victims at the mercy of heartless usurers. Indians are long suffering, but if Britain's policy is continued, it may cost her India, as it long ago cost her America.

" Curzon danced while India starved is a more recent historical fact than that 'Nero fiddled while Rome burned.'"

We do not ourselves subscribe to these views to their full extent though it will be remembered that they are pregnant with some great truths with touches of suggestive remarks.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—मध्यंतरीं अभ्रें येतात व त्या-मुळें अतिशय उकाडा होतो. अक्षततृतीयेच्या रात्रीं व तसाच आदले दिवशींच्या रात्रीं पाऊसही बराच पडला. दोन दिवस तुफा-नाचा वारा सुटला होता. पण पुनः शनि-वारा पासून उन्हाळ्याचें मान पूर्ववत होऊं लागलें आहे. सार्वजनिक आरोग्य समाधान-कारक आहे. प्लेगाचा रोग नाहींसाच होत आहे. पारा ११० अंशावर चढतो.

इंगोलीची छावणी उठविण्यांत आली आणि पायदळ पलटण बोलारमला, घोड्यांचा रिसाला घोडनदीला व तोफखाना पुण्याला या प्रमाणें फाटाफूट झाली.

आज रोजीं टिळक-प्रकरणांतील साक्षी दार रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे व वेदशास्त्र संपन्न राजश्री दुर्गे जोशी यांच्या साक्षी कमिशननें उमरावतीस घेण्यांत येतील. कमिशनची कामगिरी मेजर माडवी साहेब यांच्याकडे सोंपविण्यांत आली आहे.

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे एक्स्ट्रा असि. कमिशनर यांच्या वरील प्रकरणाची डिपार्टमेंटल चौकशी खामगांवचे असि. कमिशनर मि. क्राफर्ड साहेब यांच्याकडून व्हावी असा हुकूम झाला आहे.

नक्षत्रपतन—गेल्या शुक्रवारीं रात्रीं नऊ वाजण्याच्या सुमाराला पूर्व क्षितीजा पासून ३० अंशाच्या अकाशांत एक तेजःपुंज तारा दक्षिणेकडून उत्तरकडे फरफटत गेला आणि चार पांच विपळांत खालीं पडला. या ताऱ्याची अखेरची दीप्ति फारच रम्य दिसली व तेजाचा पुंजच खालीं पडला असें दिसलें.

नोटिस

चि० रा. रा. हेमराज वल्लद धोंडू वैश्य सोनार राहणार जळगाव जामोद यांस:—

तार राजी करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे सज्ञान चि० आहांत. तुह्मी आमचे मता विरुद्ध वर्तन करितां हें पाहून आमचे दील तुमचे संबंधाने फार नाखुष आहे. कांहीं नाच कर कांहीं तमाशा कर असे नानाप्रकारचें तुमचे हातून गेर वर्तन होत आहे. शिवाय एक रांडही आपल्या जवळ आहे अशामुळें संपत्तीचा ऱ्हास होत चालला आहे करितां मुद्दाम तुह्मांला सूचवितों कीं चांगलें प्रकारे वर्तन केल्यास इस्टेट तुमची आहे. नाहीं पेक्षां तुमची पत्नी नामें जनाबाईचे नांवचे मी मृत्युपत्र करून देणार व तिचाच सर्व प्रकारचा हक्क होऊन ती आपल्या पुढील होणाऱ्या ज्या ज्या मातास सर्व प्रकारची इस्टेट करून देईल मग तुमचा कोणतच प्रकारचा हक्क या इस्टेटीवर राहणार नाहीं. दुसरे माझ्या इस्टे-टीचें नांवावर अगर माझे नांवावर कोणाचे कर्ज काढल्यास अगर गहाण ठेऊन पैसे काढल्यास मी व माझी इस्टेट त्याबद्दल जबाबदार राहणार नाहीं. कळावें. तारीख २ माहे मे सन १९०३ इ.

सही

धोंडू वा। गोविंदा वैश्य सोनार
राहणार जळगांव जामोद
दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याज कडून या जाहिरातीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे हेमराज वा। धोंडू राहणार जळगांव हा नाना प्रकारचे गेर वर्तन करितो त्यामुळें माझे मन त्याचेविषयीं फार ना खूष आहे. ह्मणून त्याला माझे नांवावर किंवा माझे इस्टेटीचे नावावर कोणी ही कर्ज अगर गहाण वगैरे ठेऊन पैसा देऊं नये दिल्यास त्याबद्दल मी अगर माझी इस्टेट जबाबदार होणार नाहीं. कळावें तारीख २ माहे मे सन १९०३ इ०

सही

धोंडू वल्लद गोविंदा वैश्य सोनार
राहणार जळगांव जामोद
दस्तुर खुद्द.

## जाहिरात.

तमाम लोकांस माहीत होण्यासाठीं प्रसिद्ध करण्यात येते कीं, जनावरांच्या रोगाचे इलाजा करितां गतवर्षा प्रमाणें तारीख १।४। १९०३ पासून खामगांव, मुर्तिजापूर, मंगरूळपीर, मलकापूर, दारव्हा ह्या तालुक्यांना व्हेटरिनरी असिस्टंटस् ( जनावरांचे डाक्टर ) नेमले असून ते घोडे, गायी, बैल, शेळी, कुत्रे इत्यादि ग्राम्य पशूंच्या रोगाची पारख नीट करतील. यासाठीं ज्या ज्या लोकांना जरूरी असेल त्यानीं त्यांनीं सदर्हू संस्थांचा जितका उपयोग करून घेतां येईल तितका फायदा करून घ्यावा. ह्या दवाखान्यांत औषधोपचार मुफत केले जातील. कळावें, तारीख ४ मे १९०३ इ०

E. Marshall
परसनल असिस्टंट टु धी कमिशनर
मुलुख सर्कार आली हेद्राबाद.

वर्तमानसार

**मंत्र सामर्थ्य—** सोनगड येथें एका पोलीस शिपायास सर्प चावून मनुष्य अगदीं अधमेला व बेशुद्ध झाला होता. तेथें [illegible] बोटखत कारकून यानीं मंत्रानें त्या मनुष्यास बरें केलें. हे कारकून ताप वगैरे अनेक व्याधि मंत्रानें बरे करितात असेंहि ह्मणतात.

**नाकाचा कुरूपपणा गेला—** व्हियेनांतील एका शस्त्रवैद्यानें नाकाचा कुरूपपणा दुरुस्त करण्याची नवीन युक्ती शोधून काढली आहे, ती अशी:- एका कांचेच्या गरम केलेल्या पिचकारींत प्याराफिनचें मिश्रण भरून तें दोन भिवयांमधील नाकाचे बुंध्याशीं कातडींत घालतात. आणि तें आंत जाऊन थिजण्याचे पूर्वी नाकास हवी तशी मनाजोगी आकृति देतात.

**हाडवैर—** सर्पास पाहिलें कीं, माकडें अगदीं निश्चेष्ट होतात, किंबहुना त्यांना घेरी येते असा अनुभव आहे. ईश्वरानें प्राण्यामध्ये कसें चमत्कारिक हाडवैर ठेविलें आहे!

**स्त्रीची उत्पत्ती—** ब्रह्मदेवानें चंद्राचा वाटोळेपणा, वेलींचा बांकडेपणा व त्यांच्या ताण्यांचा दुसऱ्यास बिलगण्याचा धर्म, गवताचा कांपण्याचा धर्म, बोरूचा बारीकपणा, फुलांचा बहार, पानांचा हलकेपणा, हरिणांचे नेत्रकटाक्ष, सूर्यप्रकाशाचा गुळहौशीपणा, ढगांचा रडवेपणा, वाऱ्याची चंचलता, सशाचा भित्रेपणा, मोराचा वृथाभिमान, पोपटाच्या पोटाचा मृदुपणा, वज्राचा कठीणपणा, मधाचा मधुरपणा, वाघाचा क्रूरपणा, विस्तवाची चमक, बर्फाचा थंडपणा, मैनेची चिवचिव आणि कोकिळेचा कुकुटाट हे घेतले व हे सर्व धर्म एकत्र करून त्यानें स्त्री निर्माण केली. अशी चमत्कारिक स्त्री आहे.

**मनुष्य पशु बनला—** नुकतेंच एका अमानुष मनुष्यानें द्रव्याचे लोभानें एकास तुरुंगाच्या खोल्यांत चौदा वर्षे लपवून कोंडून ठेविलें होतें. त्यामुळें तो बोलण्याचें विसरला. हातापायांवर रांगूं लागला आणि पशूप्रमाणें हाताशिवाय नुसत्या तोंडानें खाऊं लागला. जशी संवय लावावी तशी लागते.

**केंसाची वाढ—** डोक्याचे केस उन्हाळ्यांत फार जलद वाढतात. नखांची व केंसांची वाढ जलदी होणें हें उत्तम प्रकृतीचें लक्षण होय. उन्हाळ्यात पुष्कळांची तबेत चांगली राहते.

**चमत्कारिक जाहिराती—** अलीकडे सुधारलेल्या जाहिराती वाचण्यांत येतात. कोणी ह्मणतो मला पुनर्विवाह करावयाचा आहे. जिची इच्छा असेल तिनें कळवावें. अशीच उलट जाहिरात स्त्रियाहि देतात. तसेंच कोणास दत्तक पुत्र किंवा घर जांवई पाहिजे असल्यास कळवावें अशीहि कोणी जाहीर खबर देतात. अशा तऱ्हेच्या जाहिराती हिंदु समाजांत होत नव्हत्या त्या आतां वाचून सुधारणेला आनंद होईल.

**दर तासास १२५ मैल—** या वेगानें विजेनें गाडी चालवितां येईल असें एका इटालियन एंजिनिअरचे ह्मणणें आहे.

**स्त्रियांची संस्था—** गिलफोर्ड येथें एक स्त्रियांची [illegible] सुरू झाली आहे. तिचा मुख्य उद्देश हा कीं पुरुषांचा सर्वतोपरी तिटकारा करायाचा. व त्यांच्या फंदांत मुळींच पडायाचें नाहीं, व लग्न करायाचें नाहीं [illegible] संस्थेचे उद्देश ऐकून तेथील पुरुष मंडळींनींहि स्त्रियांच्या मायापाशांत पाय पडूं द्यायाचा नाहीं असा निश्चय केला आहे ह्मणतात.

**राजे करण्याचा कारखाना—** राजे तयार करण्याला लागणारा कच्चा माल ह्मटला ह्मणजे दीर्घ उद्योग, साहस, शौर्य, अचाट बुद्धिमत्ता, अनिवार्य महत्वाकांक्षा इत्यादि गुण होत. हे गुण इंग्लंड अमेरिका वगैरे ठिकाणीं विपुल असल्यामुळें व राजे करण्यासाठीं लागणारे मुख्य जे रंक तेहि तिकडे अनिवार असल्यामुळें राजे तयार करण्याचा देवाचा कारखाना तिकडच्या त्या देशांतून फारच भरभराटीस आलेला आहे,

**रंक करण्याचा कारखाना—** यास लागणारा कच्चा माल ह्मटला ह्मणजे आळस, मूर्खपणा, देशद्रोह, स्वाभिमान शून्यता, चुगलखोरपणा, भेकडपणा, निमकहरामपणा, आपसांतील द्वेष, मत्सर, असंतोषीपणा, आणि गुलामगिरीचा विद्यानाद अभिमान इत्यादि गुण होत. व रंक होण्यासाठीं राजे महाराजेहि हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत.

**स्मारक—** आंबळ्याच्या शुभ्रपत्रिकेंत एक इरितळ व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या स्मारकादाखल हौसूर येथें बांधण्यांत येणार असून या कामीं दीड लक्ष रुपये खर्च करण्याचें ठरलें आहे. दरिद्री होण्यापेक्षां अधेंले होणें बरें.

**मुद्दाम सूचना—** आपल्या संततीनें पारशी जाती व्यतिरिक्त अन्य जातीशीं शरीरसंबंध केल्यास त्याचा वडिलोपार्जित मिळकतीवर हक्क राहूं नये असा कित्येक पारशी गृहस्थानीं आपापल्या मृत्युपत्रांत उल्लेख करून ठेविला आहे असें अलाहाबादच्या पायोनिअर पत्रांत एकानें कळविलें आहे. अलीकडे युरोपियन स्त्रियांशीं लग्न लावण्याचा प्रचार इंडियनांत फार पडूं लागला असल्यामुळें प्रत्येक इंडियनानें वरच्या तोडीचें अनुकरण करावें असेंहि वरील गृहस्थानीं सुचविलें आहे. सूचना योग्य आहे.

**नमुन्याचें शेत—** प्रत्येक जिल्ह्या या शेतकीच्या सुधारणें करितां व शेतकीस लागलें बी पुरविण्या करितां सरकार नवीन एक शेत काढणार आहे,

**एका एडिटराची युक्ती—** एका वर्तमानपत्रकर्त्यानें एक मुद्दाम अशी बातमी छापली कीं ह्या गांवांतील एका अति सुंदर व सभ्य स्त्रीनें माझें चुंबन घेतलें, व दोन तीन आठवड्यांत ती बाई कोण काय हें मी छापणार आहे ह्मणून कळविलें. हें वाचून सर्व लोकांस फारच अचंबा वाटला व ही स्त्री कोण असावी अशी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्या वर्तमानपत्राचे ४१५ हजार लोक नवीन वर्गणीदार झाले. चवथ्या आठवड्याचे पत्रांत असें प्रसिद्ध केलें कीं, ती स्त्री माझीच बायको होय. सर्व वाचक फसले व त्यामुळें या पत्रवाल्यास आलें चंबू गबाळें बांधावें लागलें. जी ऐकावी ती नवीनच टूम!

**मोठ्या गारा—** आमरपूल येथील दोन इसम, नळसिरा येथील एक मनुष्य व दोन बैल नुकतेच गारा पडून मरण पावले. गारा ७।८ शेर वजनाच्या होत्या, व त्यानीं कि- [illegible]

**झाड बोलतें—** दक्षिण हैद्राबाद येथें चंद्रघाटवर एक चिंचेचें झाड एका मुलाबरोबर बोलत आहे व तें दुसऱ्यासहि ऐकूं येतें; हा तमाशा पाहण्यास तेथें शेंकडों लोक रोज जमतात असें तेथील एका गृहस्थानीं कळविलें आहे.

**पहेलवान स्त्रिया—** अलिकडे सगळाच मनु फिरला आहे कुस्त्या खेळण्या सारखीं मर्दानी कामें स्त्रिया करीत आहेत आणि सैंपाकाचीं चुलीपुढचीं कामें नेमळे पुरुष करीत आहेत. मागच्या शुक्रवारीं मद्रास येथें दोघां कलुची स्त्रियांची कुस्ती झाली. गुलचमन व गुल बादशा अशी त्यांचीं नावें आहेत. गुल चमन इने ती कुस्ती जिंकिली.

**पैलवान राजे—** स्वीडननॉर्वेचे राजे, बरेच वयोवृद्ध असताहि चांगले पैलवान आणि सशक्त आहेत. त्यांनीं उधळलेले दोन घोडे रस्त्यांत आपल्या हातांनीं धरून तीन माणसांचे जीव वांचविले. ते सहा तासांत पंचवीस मैल एका दमानें चालतात.

**आठ कंटवाद्यें:—** १ पांव, २ अलगुना, ३ शिंग, ४ कर्णा, ५ शंख, ६ शीळ, ७ चंग, ८ मुरली.

**षड्गुणैश्वर्यः—** १ यश, २ कीर्ति ३ श्री ४ विज्ञान ५ औदार्य आणि ६ वैराग्य

**जैन मंदीर भ्रष्ट केलें—**

पालिठाणा राज्याच्या पोलिसांनीं बूट घालून आदेश्वराच्या मंदिरांत जाऊन व तेथें तंबाखू ओढून ते मंदिर भ्रष्ट केलें अशी खबर आल्या वरून जैन लोकांत फार गडबड उडाली आहे. मुंबईतील लोकांनीं ब्रानसन बारिस्टराकडून काठेवाडच्या पोलिटिकल एजंटास लिहविलें आहे. पालिठाण्याचे ठाकोर नेहमीं यात्रेकरूस त्रास देतात व थोड्या दिवसांपूर्वी त्यानीं स्वतः असेच बूट घालून व विडी ओढीत मंदिरांत प्रवेश केला होता असें ह्मणणें आहे.

**भयंकर दुष्काळ—** कवासगी येथें फार मोठा दुष्काळ पडला आहे. हजारों लोक दुष्काळानें मरत आहेत. बायका गुलामगिरी करण्याला तयार झाल्या आहेत.

**चमत्कारिक शिंगरू—** न्यू साऊथ वेल्समधील जर्मन्टन नावाच्या गांवीं एका घोडीस चमत्कारिक शिंगरू झालें आहे. या शिंगरास कान मुळींच नाहींत; त्यास डोळा एकच असून तो मोठा आहे व त्याची जागा तोंडाचे बाजूकडे कापलेली आहे. उजवी नाकपुडी इतरांसारखीच आहे; परंतु डावी नाकपुडी मात्र फार रुंद आहे. या नाकपुडींतून श्वासोच्छ्वास मुळींच चालत नसून ह्या द्वारानें त्यास ऐकूं येत असावें, असें अनुमान आहे! दातांची वरची कवळी खालच्याहून बरीच लहान असून ती डाव्या बाजूस तिरपी आली आहे! व त्यामुळें त्याचें तोंड शार्क माशासारखें दिसतें. त्याचे इतर अवयव सुंदर व सुदृढ आहेत. तें आपल्या धन्याच्या शेतांत मोठ्या गमतीनें धांवत बागडत असतें. मात्र आपला एक डोळा नेहमीं तें शेताच्या कुंपणाकडे ठेवतें! ही हकीकत मेलबोर्न येथील 'लीडर' नावाच्या पत्रानें दिली असून सोबत त्या शिंगराचा फोटोही दिला आहे!

**उन्हावर उपाय—** पारा आणि धत्तूराचा रस हीं एकत्र [illegible] असतां

अफगाणिस्थान व इराण या संबंधानें असेंच कायमचें धोरण असून आहे व यांत कोणी ढवळाढवळ केल्यास आह्मी आपलें सर्व सामर्थ्य व संपत्ति खर्चून त्याचा समाचार घेऊं. असें इंग्लंडनें सर्व जगास जाहीर रीतीनें कळविलें आहे.

**विस्तीर्ण साम्राज्य—** ह्मणजे राखेखालच्या निखाऱ्याप्रमाणें झांकलेल्या शत्रूंचा अफाट विस्तार होय. हे झांकलेले निखारे शांततेच्या वेळीं शांत असलेले दिसतात. पण एकदां भयंकर आणि सोसाट्याच्या वाऱ्याचें वादळ सुरू झालें ह्मणजे त्यांच्यावर आलेली राख उडून नाहींशी होते, आणि ते इंगळासारखे लाल होऊन त्यांचें खरें स्वरूप दृग्गोचर होऊं लागतें. आयर्लंड, ट्रान्सवाल, ऑरेंज, फ्रीस्टेट, केप कॉलनी, वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतील ठिकाणें हीं राखेनें झांकलेल्या निखाऱ्यांप्रमाणें आहेत इंग्लंडचें सर्व सामर्थ्य हिंदुस्थानच्या सरहद्दीवर गुंतलेलें आहे. अशी संधि मिळाली तर आयरिश लोक, बोअर लोक आणि आफ्रिकँडर बॅन्डमधील लोक हे इतके कृतज्ञ नाहींत कीं, इंग्लंडच्या फायद्यासाठीं आपल्या स्वातंत्र्याची सुसंधी फुकट दवडतील.

**सर्पाची शक्ति—** सर्प हा प्राणी दिसण्यांत फारसा मोठा नाहीं, पण त्याची शक्ति फार दांडगी आहे. त्यानें शेपूट धरून पांच पांच किंवा सहा सहा माणसांनीं ओढलें तरी सर्प जागचा हालूं शकत नाहीं असा प्रत्यक्ष अनुभव आहे.

---

नोटीस

नोटीस बेशमी भागाई मर्द पिटाराम मिळे राहणार जळगावजामोद तालुके आकोट जिल्हा आकोला पोस्ट अकोट. यांस:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास आपले घरून जाऊन एक वर्ष झालें त्या मुदतींत आह्मी तुह्माला पुष्कळ वेळ आणण्यास आलों असतां तुह्मी येत नाहीं असें साफ सांगितलें त्यावरून ह्मास ह्या नोटीशीवरून कळविण्यांत येते कीं तुह्मी ही नोटीस पावले तारखेपासून आठ दिवसाचे आंत आमचे घरीं नांदण्यास यावें. आह्मी तुह्मास राजीखशीनें नांदविण्यास तयार आहोंत. जर वरील मदतींत तुह्मी माझे घरीं न आले तर पुढें कोर्टाफर्त योग्य तजवीज करून तुह्माला कोर्टा मार्फत ताब्यांत घेतलें जाईल. या आज्ञा मोडून बाहेर राहिल्यामुळें तह्मी पर ठिकाणीं जाऊन राहिलेत कीं होते, तेव्हां बाहेर राहिलेल्या कालाबद्दल तुह्मास पोटगीचा पैसा मिळणार नाहीं तो नाहींच, पण उलटी माझे संसाराचे नुकसानी झाली आहे ती तुह्मास फंद देणारे लोकांकडून भरून घेतली जाईल. या नोटिसीचा खर्च आणि पुढें होणारा दिवाणी फौजदारीचा खर्च ह्मास व तुमचे सावीदारांस द्यावा लागेल कळावें तारीख २ माहे मे सन १९०३ इ०

सही

मीठाराम वा। रावजी मीळे सहीची
निशाणी हातची.

बाहेरगांवास टपालहशीलसुद्धां ........

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंका.........................८२

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस.... .....८१

All Subscriptions to be paid in advance,

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......8 as

Repetition Per line ., 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 27 APRIL 1903 NO 16

वर्ष ३७ आकोला सोमवार तारिख २७ माह एप्रिल सन १९०३ इ० अंक १६

## नोटिस

बेशमी सिताबाई मर्द केशव पाटील चव्हाण हल्लीं वस्ती मोरगांव ता० आकोट यांस.

तुह्मास या लेखी नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी माझ्या चुलत आजी आहात सर्व इस्टेट वडिलोपार्जित आहे. तुह्मा पाशीं दोन शेतें किनखेडे येथील सर्व्हे नंबर १९ व १२९ हीं आहेत. हीं शेतें तह्मी मरे पर्यंत आपल्याकडे ठेवावीं ह्या गोष्टीला आमची हरकत नाहीं. पण तुह्मी मेल्या नंतर आह्मी वारस आहों. तुह्मी तीं शेतें विकूं नयेत किंवा गहाण वगैरे कोठें ठेवूं नयेत. तुम या चरितार्थाला जो पैसा लागेल तो आह्मी देण्याला तयार आहो. या उपर जर तुह्मी शेतें विकाल किंवा गहाण ठेवाल तर तो व्यवहार कायद्यानें रद्द आहे. ह्मणून सर्व लोकांच्या माहिती साठीं हीं जाहिरखबर दिली आहे. कळावें तारीख १९ एप्रिल १९०३ इसवी.

सही

जयराम वल्लद बाळाजी पाटील

राहणार किनखेड.

## नोटीस

बेशमी सिवराम गणपाजी कुळकर्णी राहणार पारस तालुके बाळापूर यास:

खालीं सही करणार गणेश गणपाजी राहणार गायेगांव प्रगणें बाळापूर यानक डुन नोटीस देण्यात येते कीं पारस येथें वडिलोपार्जित पारसीचे दुकानांत अजमास पंधरा जागा विकत घेतल्या आहेत व कांहीं कर्ज घेण्याचे आदाईत आल्या आहेत व कांहीं जागा आमचे स्वकष्टार्जित मिळाले ल्या आहेत व कांहीं वडिलोपार्जित जागा व इमारती आहेत. असें सदरहू वर लिहिल्या जागापैकीं तुह्मीं कांहीं जागा विकत आहात असें ऐकिवांत आहे सबब अशी तुह्मास नोटिस देण्यांत येते कीं वर लिहिल्या जागेपैकीं कोणतीही जागा किंवा इमारत वगैरे आमची परवानगी घेतल्या वाचून विकू नयेत. विकली असतां ती विक्री रद्द समजली जाईल व विकल्यामुळें जे आमचें नुकसान होईल ते सुद्धां भरून घेतलें जाईल. कळावें तारीख २४ माहे एप्रिल सन १९०३ इसवी.

सही

गणेश गणपाजी कुळकर्णी

दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

रा. रा. बळीरामसा वल्लद रतनसा साहू हें कळवितात कीं, मराठी शाळा पातुर्डा तालुके जळगांव या गावी मराठी सहावी इयत्ता आहे. आह्मी परगांवच्या मुलाकरितां मुद्दाम बोर्डींग स्थापन केलें आहे. ज्यांची शिकण्याची इच्छा असेल त्यांनीं येथें शिकण्यास यावें. त्यांच्याना खर्च २॥ रुपया पर्यंत येत जाईल. बोर्डींगाकरिता जागा रा० बापूसाहेब व्यंकटरावजी देशमुख यांचे घराजवळच यांनीं आपली स्वतःची इमारत्यासह दिली आहे. बोर्डिंगची सर्व व्यवस्था स्कूल कमटी आणि इतर संभावित लोक मिळून केली आहे. यावर सर्व देखरेख स्कूल कमटीची असून व्यवस्थाहि त्यांनीं आपले हातीं ठेविली आहे. मुलांच्या प्रकृति-विषयीं विशेष काळजी घेतली जाईल ही सोय ज्याना कुणब्याचे हातचे चालत त्यांच्या करिता आहे. वेदशास्त्री रा. रा. बाबा शास्त्री बाळापूरकर यांनीं बोर्डिंगचें मुलांस फुकट औषधी देण्याचें कबूल केलें आहे. तरी मुलांनीं ही संधी दवडूं नये.

## मुद्दाम वैश्य लोकांच्या हिता संबंधीं लेख नंबर ६

### सुवर्ण ( बनीय ) वणीक

बंगाल्यांतील वैश्य लोकांना सुवर्ण बनिये असें ह्मणतात. मागील खानेसुमारींत यांची एकंदर लोक संख्या ९७६४० होती. हे आपली मूळ उत्पत्ती अयोध्या प्रांतांतील रामगड गावाच्या सनक आढ्य नांवाच्या एका वैश्य पासून झाली आहे असें ह्मणतात. आर्य लोकांनीं अगदीं पहिल्यानें ज्या प्रांतांत आपला अमल बसविला त्या पैकींच अयोध्या हा एक प्रांत होय ह्या सुपीक प्रांतात वैश्य जातीय आढ्य कुळाची पहिल्यांदा वसाहत केव्हां झाली ह्या संबंधानें लेखी पुरावा मुळींच कांहीं सांपडत नाहीं. ह्याच्या विषयींचो आपणास सांपडणारी अगदीं पूर्वींची माहिती ह्मटली ह्मणजे सर्व हिंदुस्थानास हलवून सोडणाऱ्या बौध्य व ब्राह्मणी धर्म ह्या दोहोंमध्यें चालत असलेल्या तुमुल युद्धाच्या वेळची होय. ज्याचा शेवट बौध्य धर्माचा पाडाव होऊन ब्राह्मणी धर्माच्या पुनः स्थापनेंत झाला. राम व भरत ह्यांच्या सुची व पवित्र भूमीस आपले धर्म संबंधीं विश्वास कबूल करविण्यास बौध्य धर्माच्या चाललेल्या भगिरथ प्रयत्नाच्या वेळेस आदिनाथ केशवचंद्रसेन नांवाचा एक संपत्तीवान वैश्य रहात होता. यास सनक, सनातन, व सनत कुमार असे तीन मुलगे होते. यांचा व्यापार जरी एक नव्हता तरी ते तिघेही व्यापारी होते ह्या तिघांपैकीं सर्वांत वडील जो सनक त्याच्याच चरित्र क्रमाकडे आतां आपण वळूं. कारण ह्याच्याच पासून बंगाल्यातील सुवर्णवणीक ह्यांची उत्पत्ती झाली आहे. ह्या वेळीं बौध्य धर्माचा प्रसार झपाट्यानें होत असावा असें दिसतें. कारण लोक त्या वेळेस आपला धर्म सोडून भराभर बौध्य धर्माचा स्वीकार करीत होते. त्याचे पुष्कळ मित्र व नातलग बौध्य धर्मानुयायी झाले खुद्द त्याचा चुलता गणपती आढ्य यानें बौध्य धर्माचा स्वीकार केला. ह्या वेळचे अयोध्येचे राज्यकर्ते बौध्य धर्मानुयायी होते किंवा नाहीं हें खात्रीनें सांगण्यास कांहीं एक साधन नाहीं. पण जी अयोध्या एकदां ब्राह्मणी धर्माचे नंदनभुवन होऊन बसली होती त्या अयोध्येंत आतां बौध्य धर्माच्या झपाट्यानें होणाऱ्या फैलावामुळें त्या धर्मा विषयीं लोकांच्या मनांत इतका आवेश उत्पन्न झाला कीं तें ठिकाण सोडून जाणें बरें असें धर्मनिष्ठ हिंदु लोकांस वाटूं लागलें. अशा स्थितींत सनकानें (ज्या विषयीं तो धार्मीक, विद्वान, व वेद निपुण होता असें ह्मणतात) आपली जन्म भूमी सोडून ज्या ठिकाणीं आपल्याला आपल्या कुळ देवतांची शांतपणानें आराधना करिता येईल व आपला व्यापारही सुरक्षित पणें चालेल अशा भारत वर्षाच्या दुसऱ्या एखाद्या भागांत जाण्याचा निश्चय केला. आणि अशा भागा विषयीं विचार करीत असतांना बंगालचें राज्य खेरीज करून बाकीच्या सर्व ठिकाणीं बौध्य धर्मांचेंच प्राबल्य असल्याचें त्याला आढळून आलें. बंगालच्या गादीवर बौध्य धर्मीय पाल वंशातील राजे पुष्कळ होऊन गेले होते आणि त्यांनीं शेजारच्या मांडलिक राजांस पादाक्रांत करून सोडलें होते हें खरें. पण थोड्याच वर्षांपूर्वीं त्यांचा निर्वंश होऊन बंगालची गादी आदीसुर नांवाच्या राजाकडे नुकतीच गेली होती. हा राजा नुसता धर्मनिष्ठ हिंदु होता येवढेंच नव्हे पण आपल्या जात चाललेल्या ब्राह्मणी धर्माचें, उत्तर हिंदुस्थानांतून बोलावलेल्या विद्वान ब्राह्मणांच्या साह्यानें, पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न करीत होता ह्मणून सनकानें आपला रोख तिकडेच वळविला. ह्याच्याबरोबर ह्याचे जवळचे नातलग व त्याचा उपाध्या ज्ञानचंद्र मिश्र हाही गेला. ज्ञानचंद्र मिश्र हा एक सारस्वत ब्राह्मण होता. सनकाच्या बरोबर असलेल्या नातलगामध्यें आढ्य, शील, सेन, पाल व पाईन ह्या आडनावाचे लोक होते. हीं आडनावें बंगाल्यातील तसेच संयुक्त प्रांतातील वैश्यांत सारखींच लागू आहेत सनक, आदीसुराच्या दरबारीं गेला. आदीसुर हा बहुत करून ढाक्या जवळील विक्रमपूर गांवीं राहत असे. ह्याच्या दरबारीं गेल्यावर ह्या व्यापारी यात्रेकऱ्यावर तो इतका खुष झाला कीं, ह्यानें त्याला ब्रह्मपुत्रेच्या कांठचा एक लहानसा गांव इनाम दिला. तो गांव जरी सध्यां उध्वस्त झाला आहे तरी अजून सुद्धां त्याला सुवर्ण ग्राम अथवा सोनारगांव असेंच ह्मणतात. हें नांव तेथें जाऊन राहिलेल्या एका मोठ्या सोन्याच्या व्यापाऱ्याचें स्मारक होय. बंगालचे वैश्य आतां पर्यंत अग्रवाले ह्या नांवानेंच प्रसिद्ध होते. व अग्रवाले सुद्धां सोन्या रुप्याचा व्यापार करित तव, असें असूनही ह्यांना सुवर्ण बनिये असें नवीन नांव पडण्याचें कारण ते सुवर्ण ग्रामीं राहत होते हेंच होय.

अयोध्याच्या अग्रवाल्यांना सुद्धां बौध्य-धर्मामुळें आपलें स्थान सोडावें लागलें. हे लोक मांसभक्षण व सुरापान ह्यापासून पूर्ण पणें अलिप्त आहेत. ह्यांची राहणी फार स्वच्छतेची व नीटनेटकी आहे. त्यांचा पेहराव फार सभ्यपणाचा असतो. त्यांच्या स्त्रिया फार सुंदर असतात. एकंदर रितीनें त्यांच्या विषयीं विचार केला असतां असें आढळून येतें कीं त्यांच्या अंगीं व्यवहार चातुर्य व तर्कज्ञानशक्तिही बरीच असते. आणि ह्यामुळें ते ज्या कामांत हात घालतात त्यांत त्यांना क्वचितच अपयश येतें बहुतकांचीं घरें राजकी थाटांचीं असून त्यांचा खर्च जमा ही बराच मोठा असतो. सारांश त्यांच्या विषयीं सांगावयाचें ह्मटलें ह्मणजे ते फार बुद्धिमान आहेत. मुलश्री औदार्यानें भरलेली, मनोहर चालीरीति, सभ्यतेची वागणूक, कोणत्याही प्रकारचें काम करण्या विषयींची त्यांची धारणा शक्ती ह्या सर्व गोष्टींनीं आज ते जगांमध्यें श्रेष्ठ प्रतीच्या लोकांत गणले जात आहेत. बंगाल्यांतील सुवर्ण बनिये हे, इंग्रजींत ज्यांना ब्रोकर क्याश्ट असें ह्मणतात, त्यांच्याच तोडीचे होत. हे आणि अग्रवाले ह्यांची उत्पत्ती एकाच मूळ पुरुषापासून झालेली आहे असें असून ह्या दोहोमध्यें सध्यां कांहींच संबंध नाहीं ह्याचें कारण असें कीं, ते ऐकमेकांपासून दूर राहिलेत. ह्यांच्या वेगवेगळ्या संवयी, वेगवेगळ्या पडून गेलेल्या स्थानिक वहिवाटी व धर्मसंबंधीं मतें ह्यामुळें ते बहुतांशीं एकमेकांस परके वाटूं लागून ह्यांच्या मनांत परस्पराविषयीं फारच थोडी कळकळ व सरक्तपतेचें ज्ञान वसत आहे.

आतां ह्यांची इच्छा आहे कीं महा सभेच्या येत्या कानफरन्समध्यें आपले प्रतिनिधी पाठवावे व तेणेंकरून एकमेकांच्या मनांतील वाईट ग्रह काढून टाकून परस्परांचें चांगले गुण परस्परांच्या दृष्टोत्पत्तीस आणून निरनिराळ्या पोट भेदांचें संमेलन करण्याविषयीं मन वळवावें व तेणें करून बंगालच्या वैश्यांत व आग्रा व अयोध्येच्या वैश्यांत अधिक मेळ करावा. करितां चीनसुरा येथील ह्यांच्या सभेच्या सेक्रेटरीकडून वर लिहिलेल्या हकीकतींचें हस्तपत्रक आपल्या महासभेकडे आलेलें आहे. व त्यांनीं ह्याची एक एक प्रत आपल्या सभासदांकडे मता करितां पाठविली आहे. त्याप्रमाणें त्याची एक प्रत मजकडेही आली असून मला त्यांचें व आपलें संघे

लन होण्यास कांहीं हरकत नाहींशीं व ढग्या वरून मी ह्या गोष्टीस माझी संमती दिली आहे. तथापि ह्याचा येथ कान्फरन्समध्यें विचार व्हावयाचा असून त्यावेळेस आवश्य: लोकांचीं मतें जितकीं मिळतील तितकीं चांगलीच असें असल्यामुळें वैश्य वाचकवर्ग कृपा करून आपलीं मतें पत्रद्वारें ह्या आफिसांत "वैश्य" चाला अगर वैश्य महासभेच्या ज्वाइंट सेक्रेटरीला कळविण्याची मेहेरबानी करितील अशी पूर्ण आशा धरून हा लेख संपवितो.

एक वैश्य.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ३० शके १८२९

## खुला राजमार्ग

आकोल्याच्या सिव्हिल स्टेशनाच्या भागांत अधिकारिवर्ग राहतो आणि कांहीं दुसरे प्रतिष्ठित साहेब लोकही राहतात. या मंडळी पैकीं कांहींजणांचे बंगले सरकारी रस्त्याच्या बाजूनें आहेत. सरकारी रस्ते म्हणजे खरे राजमार्ग होत म्हणजे त्यांच्यावरून गाडीघोड्यांचीं व इतर वाहनें नेण्याची कोणालाहि मनाई नसते. या रस्त्यावर राजाचा जसा हक्क तसा रंकाचाही आहे. त्या राजमार्गावर कोणाला मज्जाव नाहीं. परंतु कित्येक बंगलेवाल्या अधिकाऱ्यांना रस्त्यावरील रहदारीनें त्रास होतो. आणि तशांत अलिकडे प्लेगामुळें ही रहदारी वाढली आहे आणि त्या मुळें गाड्यांच्या गडगडाट मोठी कटकटही करीत असेल. आणि म्हणून कांहीं बंगल्याच्या बाजूने रस्ते शिपाई लोक अडवूं लागले. पुष्कळशा सभ्य गृहस्थांच्याहि गाड्यांस जाण्याची मनाई होऊं लागली. त्यामुळें ही ओरड फारच लवकर बाहेर आली. कुमार श्री० रमणजी साहेब गेल्या नंतरच सरकारी सडकांवर असा मज्जाव होऊं लागला होता; पण ही गोष्ट मे. रस्तुमजी साहेब यांच्या कानावर गेली तेव्हां त्यांनीं लागलींच सर्व राजमार्ग खुले आहेत आणि जे दुसऱ्यांस, मनाई करितील त्यांचा योग्य जबाब घेतला जाईल असा लेखी हुकूम फिरविला आहे. या पुढें सरकारी रस्ते सर्वजणांस खुले राहतील ही आनंदाची गोष्ट होय. शहाण्यास हा शब्दाचा इषारा पुरा आहे परंतु आकोल्याच्या इतिहासांत अशा लेखी हुकुमाची जरूरी ही पहिल्यानेंच दिसून आली!

## प्लेग

आकोल्यास प्लेगाचा उपद्रव अगदीं कमी आहे तथापि दररोजची मृत्यूची हजिरी अजून कांहीं बंद होत नाहीं. ही गोष्ट खरी कीं प्लेगाचा प्रतिकार उष्णकाल पुष्कळसा करितो. प्लेगाची वृद्धि उष्णकालांत होऊंच शकत नाहीं. सूर्याचे किरण किंवा किरणांच्या अंशाची उष्णता प्लेगाचा रोग सारखा हटवीत जाते आणि हीच गोष्ट विशेष लक्ष्यांत घेऊन प्लेगावर कांहीं उपाय आमची वैद्यमंडळी शोधून काढतील तर लोकांवर फार उपकार होतील.

हा रोग आकोल्यास सध्यां कमी आहे पण दुसरी एक गोष्ट चिंता करण्या सारखी च घडून येत आहे. पेठेंत जसे उंदीर प्लेगाच्या आरंभीं मरूं लागले होते तसेच उंदीर हल्लीं नदीच्या पश्चिम भागच्या गावांत मरूं लागले आहेत. उंदीर मरतात ही गोष्ट भावी अरिष्टच ध्वनित करिते असें समजून लोक हवालदील झाले आहेत. कित्येक घरांत उंदीर मेल्याची सडकी घाण इतकी येते कीं तेथें क्षणभर देखील उभे राहवत नाहीं. लोक पुनः गांवा बाहेर जाऊं लागले आहेत आणि कांहीं कांहीं भागांत कित्येक प्लेगाचे मृत्युही झाले आहेत उंदिराची मरणवार्ता मोठी अशुभ होय.

या संबंधांत गृहशुद्धी विषयीं सूचना अवश्य करावी असें आम्हांस वाटत आहे. गृहशुद्धीचें महत्व इतकें आहे कीं तद्विषयक कांहीं विचारांची पुनरुक्ती प्रसंगाला अनुरूपच वाटेल. गृहशुद्धी म्हणजे अशी कीं, घरामध्यें हवा जितकी खेळती राहील तितकी चांगली होय. उन्हानें सर्व दुर्गंधी दूर होतात व दूषित द्रव्यें लयास जातात त्या अर्थी घरामधून सूर्यकिरण सारखे फिरते राहिले पाहिजेत. अस्वच्छ जागा, व पाणी मुरण्याचीं ओलसर स्थळें, हीं नाहींतशीं केलीं पाहिजेत. त्या शिवाय दुर्गंधि हवा दूर करण्यासाठीं धूपदीपही वारंवार लाविले पाहिजेत. असा अनुभव आहे कीं लिंबाचा पाला, गंधक व डांबर इत्यादि पदार्थ घरभर जाळून त्याचा धूर घरांत कोंडला म्हणजे या द्रव्यांनीं हवेचें संशोधन उत्कृष्ट होतें आणि म्हणूनच याचा उपयोग घरोघर होता होईल तितका अगोदर करावा. कांहीं लोक मोठी चूक करितात कीं, घरें सोडून एकदां बाहेर रानांत राहण्यास गेले म्हणजे ते राहण्याचीं घरें कुलूप लावून बंद ठेवितात. असें करण्या पासून गृहें रोगाचीं पक्कीं आश्रयस्थानेंच होऊन बसतात. अशा कठिण प्रसंगीं गृहशुद्धी विषयीं दररोजची विशेषच खबरदारी घेतली पाहिजे आणि या गोष्टींत अंतर पडेल तर त्याचा उपसर्ग एकाद्या चुकीमुळें बहुजनसमाजाला बाधतो.

## खोटेपणा.

मि० ली वारनर हे पक्के नेटिवद्वेष्टे आहेत. थोड्या दिवसापूर्वीं एका मिशनरी मंडळीच्या सभेंत भाषण करितांना ते सहजीं बोलले कीं नेटीव लोक म्हणजे लबाड व अप्रामाणिक आहेत, ते वर वर जें दाखवितात तें सर्व लटकें आहे. आणि ते वचनाचे घट नाहींत. असा नेटिवां संबंधी आपला मनमोकळा अभिप्राय देण्यापूर्वीं मि० ली वारनर यांनीं नेटिवांच्या हृदयाचा भेद फार चोकसपणानें केला असलाच पाहिजे. आणि आमच्यामते त्यांच्या मुखांतून असेच उद्गार निघावयाला पाहिजेत. कारण यांची मनोभूमी इतकी दूषित आहे कीं तेथें सुविचारांचें व सात्विक मनोवृत्तींचें पीक येण्याचा संभवच नाहीं. पण ही गोष्ट येथेंच सोडण्या सारखी नाहीं. ली वारनर यांनीं नेटिवांच्या सर्वच समाजाला वरील दोष लावले आहेत ते अगदीं चुकीचे आहेत. नेटीव लोकांमध्यें लबाड कोणीच नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं पण आमच्या मतें नेटीवच काय पण जे जे लोक पाश्चात्य सुधारणेच्या संबंधांत आले या सर्वांमध्यें हे दुर्गुण बलवत्तर झालेले दृष्टीस पडतील. पाश्चात्य सुधारणाच या दुर्गुणांच्या बुडाशी आहे. इंडियन लोकांपेक्षां युरोपिअन राष्ट्रांतलेच अधीक वरकरणी, लबाड व असत्यवादी निघतील. इंग्रजींतला मुत्सदीपणा म्हणजे असत्य भाषणाची शाळाच आहे. असत्य भाषणाची महती एवढी वाढली आहे कीं सभ्याचारांतली व शिष्ट संप्रदायाची एक उत्कृष्ट कला म्हणजे असत्य भाषणाची सफाई होय. इंग्रजींत अशा असत्यमय मुत्सदीपणाचें एक शास्त्रच बनलें आहे. अशा मुत्सदी खोटेपणाचीं पुष्कळच उदाहरणें देतां येतील. प्रत्यक्ष लार्ड सालिसबरी सारखे मुख्य मंत्री खोटें बोलले आहेत. एकदां असें घडलें कीं रशियांशी गुप्त तहनामा झाला आहे कीं काय अशा विषयीं लार्ड डर्बी यांनीं पार्लमेंटांत विचारणा केली तेव्हां लार्ड सालिसबरी बोलले कीं गुप्त तह वगैरे कांहीं झालेला नाहीं. पण लागलींच दुसरे दिवशीं वर्तमानपत्रांत त्या गुप्त तहाच्या सर्व शर्ती प्रसिद्ध झालेल्या लोकांनीं वाचल्या. तेव्हां मुत्सद्दीपणाला असत्य भाषण शोभा आणिते असेंच म्हणणें नीट दिसेल.

खोटेपणा इंग्रजी समाजांत विशेष दिसून येतो. त्यांच्या मध्यें अकृत्रिम प्रेमाला फारसा आश्रयच मिळत नाहीं. त्यांच्याशी परिचय घडला म्हणजे असें दिसतें कीं जो तो अपमतलबी विशेष आहे. त्यांच्या दांपत्य भागांत देखील लपंडाव असतो. नवरा बायको पासून पुष्कळशा गोष्टी गुप्त ठेवितो व बायको नवऱ्याला कांहीं कांहीं अंतस्थ बाबी कळून देत नाहीं. अत्यंत विश्वासाच्या ठिकाणीं देखील आंत एक गोष्ट तर बाहेर दुसरीच असे नाना प्रकार दृष्टीस पडतात. युरोपियन लोकांमध्यें वैवाहिक संबंधांत सुद्धां इंडियनांचा तो वर्णनीय निष्कपट प्रेमभाव दृष्टीस पडणार नाहीं.

त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयं ।
त्वं कौमुदी नयनयोरमृतं त्वमंगे ।

या भवभूतीच्या उक्तीचा उज्वळ दांपत्यभाव पाहण्याला युरोपिअन समाजांत स्वप्नीं तरी कितीशीं मिळतील. प्राचीन सतीची चाल या अत्यंत प्रेमभावाचा चिरकालीन पुतळाच आहे. व्यभिचाराला पाहतांच खून करणारी तरी मंडळी युरोपियन राष्ट्रांच्या गुन्हेगारांत आढळतील काय!

साहेब लोकांनीं नेटिवांस हसूं नये किंवा त्यांस असत्य भाषणाचा व दांभिकपणाचा दोष लावूं नये एवढाच अर्थ वरील लेखाचा आहे. पण हे दुर्गुण आमच्या लोकांत अधिकाधिक येत चालले आहेत ही गोष्ट मात्र आमच्या हातुन झांकून ठेववत नाहीं. पाश्चात्य सुधारणेच्या अनुकरणाचा हा दुष्परिणाम होय. या शिवाय या दुर्गुणाला आश्रय मिळण्याला मुख्य कारण म्हणजे दैनंदिन वाढणारी गरिबी होय. गरिबी पुढें न इलाज होतो. सर्व लाज आपोआप सुटते. आमच्या मध्यें धर्मशास्त्र असें सांगतें कीं आजाचें कर्ज नातवानेंहि दिलें पाहिजे. अलिकडे इंग्रजी संसर्गामुळें लेखी दस्तऐवज देखील नाकबूल करण्याची तयारी असते. पूर्वींचे तें सगळेंच निराळें! सावकारही दुष्टबुद्धी, व खोट्या व्यवहारांत निपूण आहेत. पूर्वकालीन सावकारही निराळेच होते! आतां जीवनकलह इतका माजला आहे कीं जो तो आपापल्या पुरतें पाहतो आणि दुसऱ्यांचा चुराडा करून आपली पोळी पिकवितो. सरकारी चाकरी साठीं किती तरी सोंगें आपणापैकीं पुष्कळ लोक आणितात! हांजी हांजी करण्या खालीं पुष्कळशा सरकारी चाकरांनीं सरळ वर्तनाला तिलांजली दिली आहे. अशांच्या वर्तनाच्या दर्शनामुळेंच मि० ली वारनर सारख्या लोकांस दोष देण्याची स्फूर्ती होत असेल. पूर्वीं व्यवहार फार साधे व सरळ असत. आतां व्यवहार नानाविध वाढले असून सर्व लोक या यांत्रिक कालामध्यें चाऱ्ही बाजूंनीं बांधल्या सारखे झाले आहेत. प्रस्तुत विद्यमान स्थितीला धरूनच सर्वांनें वर्तन घडत असतें. पण क्षणिक सौख्याला भुलून जाऊन आपण आपल्या पुरातन काला पासून चालत आलेल्या आणि आपल्या रक्तांत भिनून गेलेल्या उच्च व उज्वल नीतीला डाग लावणें बरोबर नाहीं. आपणांस लबाडी करण्याची कुबुद्धी ईश्वर न देवो ! व अशा पापवासनांनीं आमचें शुद्ध अंतःकरण न विटाळो! आपली नीतिमत्ता बिघडत चालली आहे याचा अर्थ आपल्या राष्ट्रास उतरती कळा लागत आहे. राष्ट्राचा सर्व जीव प्राण नीतींत आहे आणि ती जर आपण गमवूं तर आपलें स्वातंत्र्य व स्वराज्य यांस सर्वथा मुकूं. आणि म्हणूनच सांप्रत कालाचा भ्रष्टाचार दूर सारण्या इतके आपण सामर्थ्यवान् व नीतिमान बनलें पाहिजे. आपली धार्मिक उन्नति झाली पाहिजे आणि ऐहिक सुखाचा तुच्छपणा आपणांस वाटूं लागला पाहिजे आणि आपण आपल्या नीतीच्या मुख्या वाटा झाडून साफ सुफ ठेविल्या पाहिजेत.

## आमचे साहेब.

॥ झूठी संगत बहु नहि बाबा । साहेब साथी करना ॥

हा उपदेश अलीकडच्या काळांत आपणा सर्वांस फारच पटला आहे. ह्या उपदेशाच्या बाहेर तिळप्रायहि आपण वर्तन करीत नाहीं. आपण आपल्या साहेबांची मर्जी राजी राखण्यांत चूर असतो. साहेबा खेरीज इतरे जनांची संगती झूट आहे, कुच कामाची नाहीं अशी आपण आपल्या मनाशीं गांठ घालून ठेविली आहे. आमकाल आमच्या लोकांना ह्या मृत्यु लोकीं जर एखादें दैवत असेल तर तें आपले साहेब होय. साहेब हीच आपली मुख्य आराध्य देवता, कुलदेवता व ग्रामदेवता होय. आम्ही ह्या देवतेची पूजाअर्चा अत्यंत भक्तिपुरःसर करीत

असतो. आह्मी त्यांच्या पादसेवनाचा, भक्तिभजनाचा, नामकीर्तनाचा, व नित्य दर्शनांचा नित्य नेम ठेविला आहे. ह्याच देवतेचे सणवार व उत्सव तिथी आपण आनंदानें पाळींत असतो. ह्यांचींच कथापुराणें व स्तोत्रें आपण नित्यशः मुखोद्गत ह्मणतो. हें आपलें दैवत ह्मणजे ह्या कलियुगांतलें जिवंत व जलजळाट दैवत आहे. ह्याच्या उपासनेंत चुकून माकून जर कां अंतर पडलें तर ही देवता किती कोपायमान होईल व काय श्राप देईल याचा नेम नसतो! हिचा एक वार कोप झाला तर आपल्यास ह्या पृथ्वीच्या पाठीवर थारा मिळणार नाहीं, आपल्या साहेबाची मर्जी ही आपला खरा पाठीराखा होय, बिकट प्रसंगीं तीच आपल्यास मुक्त करील हें आपण पूर्ण ओळखून आहों, आणि ह्मणूनच आपण 'साहेब साधी करना' हेंच ध्येय होय.

पण आपणास मोठी भूल पडली आहे. आपण नुसत्या 'साहेब' या नांवानेंच फसलों आपला साहेब कोणचा ही आपणांस ओळख पटली नाहीं. आपल्या डोळ्यापुढें रात्रंदिवस भलतेच खोटे साहेब नाचत आहेत. आपल्या खऱ्या साहेबांची खोटीं सोंगें घेऊन आपल्यापुढें ते बतावणी करून आपणांस फसवितात. नामधारी साहेब आतांशा चोहींकडेच पसरत चालले आहेत. हे आपले साहेब नव्हत. आपला खरा प्रेमळ, जिवलग साहेब निराळा आहे. त्याचें असें वरपंगी आपल्यावर प्रेम नाहीं, याचें आपल्यावर अमित अहेतुक, शुद्ध, निर्व्याज प्रेम आहे. तो आपल्या खऱ्या भावाचा भुकेला आहे. तो आपणांस निर्वाणींहि अंतर देणारा नाहीं. तो डोक्याला टोपी, पायांत विजार बूट, अंगात कोट घालून व तोंडांत चिरूट धरून आपल्या पुढें येत नाहीं, तर तो दिगंबररूपी आहे. याचें ध्यान, रूप, रंग हीं अत्यंत अवर्णनीय आहेत. तो साधुसंताच्या हृदय मंदिरात वास करितो. त्याचा बंगला किती मोठा व मनोहर आहे याची आपणाला कल्पनाही नाहीं. असा आपला साहेब आहे. तो सर्व जगाचा, ह्या नामधारी साहेबांचाही साहेब आहे. त्याच्या नुसत्या पदरजाच्या धुळीनें, व याच्या पादचिंतनानें आपण आनंद सागरांत पोहूं, व आपली सर्व ईडापीडा दूर होईल. यास आपण विसरतां कामा नये. यांसच आपण अनन्य भावानें आळवावें. हाच साहेब साधी केला पाहिजे, व इतर भाराभर साहेबांची संगती सरोफार झुटी आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY APRIL

27 1903

---

THE Cotton industry of India does not show signs of a progressive industry. Gradually the whole of the textile manufacturing industry in India has become a stagnant, unproductive and losing concern. This mill industry receives a fatal check from the imposition of the duties on the weaving and spinning business in India. When the Custom Act was at first introduced to levy some new taxes on the imports in India, those who were interested in the cotton industry of England viewed the new imposition of a custom—duty with real and substantial apprehensions. The manufacturers of the Manchester—cloth saw therin a deadly blow to their commerce and succeeded in moving the Government of India to impose a counter vailing duty on the textile manufacture of India both in the process of weaving and spinning. The piece of legislation was enacted to equalize the burden of the custom—duties on foreign cloth by a corresponding duty on the cotton industry in India. This was done in the name of free—trade. The principles of free—trade were put forth to place the English as well as the Indian cotton industries on a common level. What was intended as an act of fairness to the vested interests in the manufacturing business of England has become a source of new dangers to the self—same industry in India. The food of English manufacturing interests has become the poison of the Indian cotton industry. This anomaly was due to the fact that the Indian manufacturing industry is still in an infant state and was never a worthy rival of the English one. The nascent industry of India required a special measure of protection in order to raise it to the high level to which the English industry has gone already. The free—trade policy is no doubt excellent provided all other things are equal. There is however no equality of a common footing. The Indian industry can hardly maintain its ground against the cheapness of the English industry. There is a great deal of dissimilarity in the positions of the two industries. Each industry requires a special treatment. The Indian industry requires a lift and a support from the Government before it can enter into competition with the English industry. At a time when our people ask for some special concessions and when the further growth of the Indian textile industry was no longer possible without such special protection the Government of India proceeded in the name of free trade to impose duties on the cotton industry in India. This was no fair play. The result was fore—doomed. The facts we see today were foreshadowed at the very time and point unmistakeably to the disastrous effects on the general prosperity of the mill industry in India. The past conduct of the Government has been monumental to the practical over-throw of the Indian interests when they clash with those of England. In a conflict of mutual interests, the Government of India is decidedly a Government for the Englishmen. India is ruled for the Indians as long as such a rule supports the English interests in India. But when a dispute arises it is no wonder that justice lies in the triumph of the mightier of the two.

But this narrow and selfish view must give way when the Indian empire promises to be the center of of the British dominions in Asia. The sacred principles of free—trade ought to teach our rulers the game of fairness to India. Mr. J. N. Tata has done a signal service to India when has taken the trouble of proving, to the satisfaction of every reasonable thinker, how the cotton industry of India suffer very largely from the cotton duties. Mr. Tata is well known as the philanthrophic millionaire of Bombay. He has published a volume in this connection and has sent a petition to the British Parliament under his own signature. He gives this as one instance of grand injustice and prays for the awakening of the British conscience to do justice to India. There are very great issues at stake. The cotton industry is in the first and foremost rank. Upon its progress depends the future advancement of India. We would like to conclude this demand for justice to India in the very eloquent words of Mr. J. N. Tata himself.

" In bringing to your notice this statical study I hope that you may be moved to do something to arouse the slumbering conscience of parliament in its treatment of India and as a first step to get England and India put on an identical footing with regard to duties and countervailing customs. The present policy is neither of Free Trade nor Fair trade and it affords an opening to cavillers to suggest that a dependency of 300 million inhabitants is being exploited for the benefit of the few millions inhabiting the British isles. The Empire is a financial and commercial assets to the Imperial country only and Imperialist policy cannot be congratulated on its success in uniting Englishmen in India and the people in the common feeling of injustice at the hands of the English Parliament. "

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— ऋतुमाना प्रमाणें उन्हाळा वाढत्या प्रमाणावर आहे. उष्णकाळांतले आजार ह्मणजे गोंवर, देवी, ताप वगैरे रोग थोडेसे अधिकच आहेत. प्लेगाचें मान फार कमी आहे, दररोज एक दोन माणसें प्लेगानें मरत असतात. दोषिक ज्वराचा प्रसार विशेष आढळतो. उष्णतेचे मान ८० अंशा पासुन १०८ अंशा पर्यंत असतें.

मे० ड्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर यांची स्वारी चिखलदऱ्याला गेली आहे.

येथील सेशन कचेरींत सध्यां अंत्री मलकापूरचा खुनी मोकद्दमा चालूं आहे. मुंबईचे बारिस्टर मि० ब्रन्सन साहेब हे आरोपी तर्फे काम चालवीत आहेत. सरकार तर्फे मि० प्राईस साहेब एक्स्ट्रा असि. कमिशनर हे काम चालवीत आहेत हा मोकद्दमा येत्या आठवड्यांत निदान तीन चार दिवस चालेल असा रंग दिसतो.

मे० रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर हे मेच्या १ ले तारखे नंतर जळगावास जाणार आहेत. साहेब बहादुरांचा मुक्काम कांहीं दिवस नरनाळ्या या किल्यावर होणार आहे.

रा० रा० गणपतराव महादेव करमरकर लांड रिकार्ड खात्याचें सेंटलमेंट क्लार्क हे कांहीं महिन्याच्या फर्लो रजेवर तीर्थ यात्रेला गेले आहेत.

रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे धारवाडास गेले आहेत. तेथें आज मुंबईची प्रांतिक सामाजिक सभा भरणार आहे आणि त्या सभेचें अध्यक्षस्थान राजश्री आण्णासाहेब हे अलंकृत करितील. ही निवडणूक मोठी उत्कृष्ट असून तिचा आह्माला मोठा अभिमान वाटतो.

रा० रा० मारुती हरी क्लार्क आफ कोर्ट यांनीं आपली रजा रद्द केल्यामुळें त्याची बदली यवतमाळ जिल्ह्याला झाली, आणि तेथील क्लार्क आफ कोर्ट रा० रा० गणेश वासुदेव निमकर हे फर्लो रजेवर गेले.

वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा तारीख ३ सेप्तेंबर पासुन सुरूं होईल. या परीक्षेला जाणाऱ्या उमेदवारांचे अर्ज ठराविक दाखल्यासह तारीख ७ जूनच्या अगोदर जुडिशिअल कचेरींत पोंचते झाले पाहिजेत.

चालूं सालीं खालील पांच गृहस्थ हैदराबादच्या हास्पिटल असिस्टंटच्या परीक्षेंत पसार झाल्या अन्वयें त्यांस चालूं महिन्यापासून वऱ्हाडांत चाकरीवर घेण्यांत आले:—

रा. रा.

पी. शंकरदास राजण्णा.
शेख अहमद अली.
केशव रामचंद्र काळे.
व्यंकटेश गोपाळ बापट.
त्रिम्बक गणेश बांडे.

---

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर. ५

१९०३

नादारी नियमा अन्वयें नादाराला नादार ठरविणें विषयीं याचे सावकारास नोटिशीचा नमुना.

( मि. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य साहेब कोर्ट वासीम यांचें कोर्टांत.

सर्वत्रास नोटीस देण्यांत येते कीं, माहादू वल्लद कताजी कुणबी राहणार मौजे बोरव्हा हमारा तालुके मंगरूळपीर हा नादार आहे असा आज तारीख १४ माहे एप्रील सन १९०३ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख ११ माहे जुलई सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारानीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जांचा निकाल करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व याजबद्दल ज्या साक्षीदारांस समन्स करण्याची इच्छा असेल या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून त्यांजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशीअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ करावी. आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी ह्मणजे दावा रजिष्टरांत दाखल होईल. तारीख १४ एप्रील १९०३ इ.

S. H. King

नादारी कोर्टाचे जड्ज्य.

जिल्हा वाशीम.

रा० सा० महाजनी— यंदाची सा-[ma]जिक परिषद् धारवाडास भरणार आहे व [ति]चें नायकत्व रा. सा. महाजनी सारख्या [सु]र व आस्थेवाईक गृहस्थांचे हातीं जाणार [अ]सल्यामुळें तिचें अभिनंदन करावें तितकें [थो]डें. रा० सा० महाजनी वऱ्हाडांत एका [स]माजसुधारक मंडळीचे अध्यक्ष आहेत. [त्यां]स सध्यांची परिस्थिति आणि तिजमुळें [सा]माजिक सुधारणेत उभ्या येणाऱ्या अड-[च]णी या दोहोंचेंही चांगलें ज्ञान असल्या[मु]ळें ते आत्यंतिक सुधारकां प्रमाणें भरधांव [धा]वणारेही नाहींत व स्वयंपर्याप्त गृहस्था[प्र]माणें आहे तेंच बरोबर आहे असा जप [क]रून स्वस्थ बसणारेही नाहींत तेव्हां यांचे [अ]ध्यक्षतेखालीं भरणाऱ्या सामाजिक परि-[ष]देचें काम महाराष्ट्रांतील परिस्थितीस योग्य [अ]सें त-हेनें पार पडेल, या विषयीं भीति [बा]ळगण्याचें नको. ज्ञा० प्र०

हस्तवाद्यें—झांज, टाळ, चिपळ्या, कर[ता]ळ, जलतरंग, घुंगरू, घागरी, घंटा आणि [ता]ल.

११ चर्मवाद्यें— मृदंग, तबला, डफ, [संब]ळ, खंजिरी, नोबद, ताशा मर्फा, चौघडा [डं]का व ढोल.

१४ तंतु वाद्यें— वीणा, बीन, रुद्र[वी]णा, एकतारी, सारंगी, सतार, सारमंडळ, [तं]बुरी, सरोद, कोका, रबाब, मेघमंडळ, [क]ऊन, आणि तुणतुणें.

गाणारे किडे— जपानांत एक प्रकारचे [गा]णारे किडे आहेत. त्यांना पोसून ठेवितात [व] त्यांच्या गाण्याच्या गुणा प्रमाणें किंमत [ठे]ऊन विकतात. असा धंदा करणारे तिकडे [ब]रासरी ३००० वर लोक आहेत.

खर्पूस मार— मास्तरानें मारलें अशी मुलानें बापाजवळ कागाळी करितांच बाप क्रुद्ध होऊन शाळेंत गेला आणि यानें त्या मास्तरच्या तोंडांत भडकावल्या. दोघांची खूप झोंबी झुंपली. लोक जमून यांनीं दोघां ना अलग केलें. ही गोष्ट कलबुर्ग्यास घडली.

पापणीतून विटाळाचें उत्सर्जन— एका जू जातीच्या १६ वर्षांच्या वयाच्या मुलीची हकीगत खालील प्रमाणें आहे. तिची प्रकृति अशक्त व ती अमळ निस्तेज व मंद प्रकृतीची असून तिला प्रथम तेरावे वर्षीं ऋतु प्राप्त झाला. तेव्हां पासून प्रत्येक महिन्यास पाळीचे आधीं दोन तीन दिवस प्रत्येक डोळ्याचे खालचे अंगास एक तांबडी [illegible] व्हावयाची व ती मोठी होऊन रक्ताचे [illegible] जाऊन थोडें रक्त गेल्यावर [illegible] पांचळी जात असे. हा सर्व क्रम [illegible] सोर्ष्यंत चालून पाळी नंतर दोन तीन दिवसांनीं त्या जागची पूर्ववत स्थिति होई. कानांतुन वगैरे आर्तवोत्सर्जन झाल्याचें उदाहरण क्वचित् वाचण्यांत येते, त्याच जातीचें प्रकृति वैचित्र्याचें हें एक विलक्षण उदाहरण होय.

खरें होवो— हिंदुस्थानांतून बाहेर घा-टलेला संपत्तीचा पुर, उद्योगधंद्याची हानी व वारंवार पडणारे दुष्काळ, हे पाहून आणि असा उत्तम देश अशा स्थितींत येणें हा जगांतील सर्व सुधारणेस कळंक आहे, असें

अकाडेमी ऑफ सायन्स ही संस्था ५८ लक्ष पौंड खर्चून हिंदुस्थानांत मोठमोठे कालेज बांध-णार आहे; व हिंदुस्थानांतील मुख्य शहरांत औद्योगिक शाळा स्थापून तेथें विद्यार्थ्यांस शेती, कला वगैरेंचें शास्त्रीय शिक्षण देणार आहे ह्मणतात. हें खरें असेल काय ?

विलक्षण चाल— कोइमतूर जिल्ह्यां तील गौडन नांवाच्या जातींत पुढील विलक्षण चाल आढळून येते. आपल्या घरांत कुरूप व व्यंग मूल असणें वाईट, अशी त्या जातीची समजूत असून मूल उपजतांच तें कुरूप असलें कीं, ते 'मोडवंडी' नांवाचे लोक आहेत त्यांचे स्वाधीन करितात; व त्यांच्या पोषणासाठीं प्रत्येक कुटुंब कांहीं धान्य त्यांस देतें. या प्रमाणें दरगांवांत कुरूप मुलांचें एक अर्फनेजच असतें. कोणत्याही घरांतील कुरूप व व्यंगमूल उचलून नेण्याचा 'मोडवंडी' लोकांस हक्क आहे, असें समजलें जातें. परंतु पुष्कळ वेळां मूल किती ही कुरूप असलें तरी आईबापांस तें त्यांस देववत नाहीं मुलाचें लग्न झालेलें असलें ह्मणजे मात्र त्यास नेण्याचा मोडवंडीस अधिकार नाहीं, अशी रीत असल्यामुळें मायळू आईबाप अशा लहान मुलांचें अगदीं लहानपणीं लग्न करून टाकतात!

चमत्कारिक खेकडा— लॉबस्टर नांवाचा खेकडा एका अंधेऱ्या जागेंत ठेवला तर तो जसजसा मरूं लागतो तसतसा त्याचे अंगांतून फॉस्फरसासारखा उजेड निघूं लागतो,

मोठें वादळ— ऑफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर नुकतेंच झालें. आठ दिवस सारखीं वाळूचीं वावटळें उडत होतीं; व वातावरण इतकें भरलें होतें कीं, दिवसाही दिवा लावून वाचावें लागे!

बोगद्यांत कढत पाणी— इताली व स्वित्सरलंड यांचे दरम्यानचे आल्प्स पर्व ताच्या सिंप्लन पर्वतामधून एक १४ मैल लांबीचा जंगी बोगदा पोखरण्याचें काम चाललें आहे. तो थोडासा खोदल्या नंतर पाहतात तों डोंगराचे माथ्यावरून अंत झिरपून आलेलें व चुन-खडीच्या थरांतून जाणारें आधणाचें पाणी आंत वहात आहे ! त्याची उष्णता इतकी होती कीं दोन मिनिटें मनुष्य बोगद्यांत राहील तर तो भाजूनच निघावयाचा ! पुढें याचा पाट वाढून बाहेर आणला व त्याचेच जोरावर पाणी गोठून हवाही गार करण्याचीं यंत्रें सुरू करण्यांत आलीं आहेत ! हें आधणाचें पाणी त्यांतून इतकें निघत आहे कीं, एका मिनिटांस १५ हजार ग्यालन प्रमाणें तें पाटांतून जात आहे !

राज्यपदाचा कंटाळा— श्रीमंत होळ कर सरकार प्रमाणें नाभा संस्थानच्या महा राजास राज्यश्रीचा वीट येऊन उपरती झाली आहे व ते आपल्या राज्याचा त्याग करून हरिहरि करणार आहेत ह्मणतात. राजांच्या मनास इतकी उद्विग्नता अलीकडे का वाटूं लागली आहे कोण!

चावट पोरांचा उद्योग—मुंबईत अलि-कडे चावट पोरांची एक टोळी जमली आहे. [illegible] तेथून काढून दुसऱ्याचे दारापुढें नऊन ला-वावयाची, दुसऱ्याची तिसऱ्याचे दारापुढें, असा धंदा या टोळीनें सुरू केला आहे.

दंत वैद्यास वेड लागलें-डलुथ ये-थील दंत वैद्य एकाएकी वेडा झाला. व रस्त्यानें जो सापडेल त्याला धरून त्याचे दात उपटूं लागला. चार पांच इसमाचे त्यानें असेच दांत उपटले शेवटीं एका खंबीर गड्याशीं गांठ पडली. त्यानें वैद्याजास चतु-र्भुज केलें.

विचित्र—चिकागो शहरांत ज्यांना मुलें बाळें आहेत त्यांना रहावयास घरें मिळत नाहींत कारण घरांचे मालक अशा लोकांना आपली घरें भाड्यानें देत नाहींत. शेवटीं जे कोणी घरधनी मुलांबाळांना आडकाठी क रील व आपलें घर भाड्यानें देणार नाहीं त्याला २० पौंड दंड होईल असा फायदा करण्या विषयीं शिफारस झाली आहे.

ग्यासचा प्रदीप्तपणा-जर्मनी देशांत सिम्रल करितां असेटिलिन नामक ग्यास वापरतात. ह्या ग्यासांत आक्सिजन असतां त्या दिव्याचा उजेड पहिल्याच्या तिप्पट जास्त पडतो. ह्या उजेडानें दिवसा पांच मैल आणि रात्रीं १५ मैलावरील गाडी वगैरे दिसते.

नवीन औषधी-क्षयरोग्याच्या धमन्यां तून सिनामेट आफ् सोडा हें द्रव्य घातलें असतां तो रोगी पुष्कळ थकला असला तरी बरा होतो असा अनुभव आला आहे ह्मणतात.

दोन डोक्याच्या मुलाची गोष्ट—एका रामबक्ष नांवाच्या इसमास दोन डोक्यांचें मूल दिल्ली दरबारचे संधीस झालें. तें एका साहेबाच्या आग्रहामुळें दिल्ली येथील प्रद र्शनांत पाठविण्यांत आलें, दरबार संपला प्रदर्शन आटपलें तरी तें दोन डोक्याचें मूल त्याचें आई बापास मिळालें नाहीं ह्मणून त्या मुलाचे आईबाप मोठ्या फिकीरींत आहेत व त्यांना असें वाटत आहे कीं तें मूल इतर वस्तू प्रमाणें लिलावांत विकलें गेलें किंवा हिंदुस्थानांतील चमत्कारिक वस्तु ह्मणून कोणी बड्या साहेबांनीं तें विकत घेऊन बिलायतेची हवा दाखविण्यास नेलें. या गोष्टीच्या चौकशीबद्दल जिल्हाधिकाऱ्याकडे विनंती केल्यावर कळतें, जें जें ऐकावें तें चम-त्कारिकच ह्मटलें पाहिजे.

नवी युक्ती—ज्वर मापण्याची नळी काखेंत घातल्यावर, ज्वर भयप्रद वाटतांच तींत घंटा वाजावी, अशी नवी युक्ती निघाली आहे. ही युक्ती फारच सुरेख आहे.

शिंकविणारें झाड-दक्षिण आफ्रिकेंत एक शिंकझाड आहे तें कोणी तोडूं लागला कीं, त्याचे कण नाकांत जाऊन माणसास एकसारख्या शिंका येत सुटतात. त्याच्या लांकडाचा रंग भगवा असतो. त्याला कीड लागत नाहीं. त्याचा धुमा कडू लागतो. तें लांकूड पाण्यांत तरंगत नाहीं.

स्त्री स्वातंत्र्य—इच्छा असल्यास अवि-वाहित राहाण्याबद्दल जपानांतल्या स्त्रियांस तेथील राजानें मोकळीक दिली आहे. आज-पर्यंत असें असे कीं, अमुक वयापर्यंत स्त्रीचें लग्न झालें नाहीं तर सरकार तिचा विवाह करून टाकीत असे.

कसोटी पहा:— सोन्याची परीक्षा अग्नीनें होते; स्त्रियांची परीक्षा सोन्यानें होते; व पुरुषांची परीक्षा स्त्रीनें होते असें एका मार्मिक पंडितांचें मत आहे.

घोड्याचे दहा रंगः—

१ पाढरा.

२ बांदा ह्मणजे काळा व पांढरा.

३ अबलख ह्मणजे काळा व तांबडा.

४ अस्मानी ह्मणजे निळा.

५ सुरंग ह्मणजे ढग-अस्मानी.

६ संदली ह्मणजे गर्द अस्मानी.

७ कर्डा ह्मणजे काळसर.

८ कोसा ह्मणजे जास्त काळसर.

९ गंगा ह्मणजे पांढरा शुभ्र.

१० सब्जा ह्मणजे तांबडा.

पंच पक्वान्नें:— १ घीवर २ लडू ३ खाजा ४ जिलबी ५ गळी हीच ग्रंथांत आहेत. यांत आपली श्रीखंड बासुंदी कोठेंच दिसत नाहीं.

दुनियेंतील अति मोठा धबधबा.

युरोपातील आल्पस पर्वतावर सेरोसोला नांवाचा एक धबधबा आहे. त्याचें पाणी २४०० फुटांवरून पडतें. तो दुनियेंतील अति मोठा धबधबा होय असें मानीत असत. पण अमेरिकेंतील मेक्सिको देशांत दुरंगो नांवचें एक संस्थान आहे. त्यांत सन क्यतन कन्यय-जवळ एक अत्यंत मोठा धबधबा आहे. अलीकडे कांहीं लोक बरांका प्रातां-तील एकिडेल्या जुन्या सुप्रसिद्ध नारायणजल नांवाच्या शोधार्थ फिरत होते इतक्यांत त्यांस एक मोठी पाण्याची गर्जना ऐकूं आली. तेव्हां ते लोक पुढील पर्वत चढून एका महा दरींत मोठ्या प्रयासानें उतरले, तो एक मोठा धबधबा त्यांच्या नजरेस पडला. तो कमींत कमी ३००० फूट उंच आहे.

मुदत वाढली— आपले व्हाइसराय साहेब लार्ड कर्झन यांची मुदत आणखी दोन वर्षें वाढविली, असें बऱ्याच खात्री लायक आधारावरून प्रसिद्ध झालें आहे. लार्ड कर्झन हे या मुदतींत पुष्कळ कामें करीत जातील आणि राज्यव्यवस्थेंत सुधार णा करितील यांत संशय नाहीं. लॉर्ड कर्झन अलीकडे बरेच लोकप्रिय झाले आहेत. आणि जरी अद्यापि त्यांजवर लोकांची भक्ति बसावी तशी बसली नाहीं तथापि त्यांचे हातून आपलें थोडें तरी कल्याण झाल्यावाचून राहणार नाहीं.

सोनें विरघळतें-मेलेनिक असिडांत सोनें टाकलें असता तें साखरेप्रमाणें विरघळतें असें ह्मणतात.

आळवांच्या कांद्याचा गुण—या कां-द्याचा लेप प्लेगच्या गोळ्यावर केला असतां गोळा बसतो. उंदीर, घुशी हा कांदा खाऊन मरे होतात असा एकास शोध लागला आहे. मुद्दाम अनुभव घ्यावा.

REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक।...............................८२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........८१ ०६
दुसरे खेपेस.... ........८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 8 as
Repetition Per line ...2 as

VOL XXXVII AKOLA MONDAY 11 MAY 1903 NO 18

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ११ माहे मे सन १९०३ इ० अंक १८

## नोटीस

मे छनुखा वा। कालेखा मुसलमान फ० ग्रे० का० वस्ती व भुळगाव जाहागीर तालुके आकोले यांस खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास ता. ११ आगष्ट सन १९०२ रोजीं आममुकत्यारपत्र मी दिलें होतें तें आज तारीखे पासून रद्द केलें आहे तर आज तारखे पासून तुम्ही माझे करितां कोणतेच प्रकारचा व्यवहार करू नये ही नोटीस दिली सही तारीख ३।५।०३ इ.

( सही )

सहीची निशाणी दत्ताजी वल्द रामचंद्र पाटील राहणार बाभुळगाव जाहागीर यांचे खुद्द हातची अस.

## जाहिरात.

खालीं सही करणार याजकडून या जाहिरातीनें सर्वत्र लोक शेट साहूकार यास कळविण्यांत येते कीं मी छनू वा। कालेख मुसलमान फ० ग्रे० का० वाती बाभुळगांव तालुके आकोलें यास आममुकत्यारपत्र तारीख २।८।०२ इ. दिले होते ते आज तारखे पासून रद्द केले आहे तर माझे नावानें आतां यापुढें कोणताही व्यापार पैश्या संबंधीं केल्यास तो बातल समजला जाईल ही जाहिरात दिली ता० ३।५।३ इ.

सही

निशाणी दत्ताजी वा। रामचंद्र पाटील राहणार बाभुळगांव जाहागीर तालुके आकोलें याची अस.

## नोटीस

रा. रा. दतु वल्द विधाजी ठाकरे राहणार निमकरदे तालुके बाळापूर यांसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं बोरवाकडीचे शेत एकंदर १२ बैलांचे हिश्याचे पैकीं ५ बैलाचा हिस्सा इतर लोकांचा असून ७ सात बैलाचा हिस्सा तुमचा आहे तो तुम्ही मला ३ हप्ते झाले २३३ रुपयांस खरेदी दिला मात्र खरेदीखत लिहिण्याचें राहिलें होतें इसारा चे रुपये पैरच लोकांसमक्ष मी दिले असें असतां अलिकडे तुम्ही नफ्याचे लालचीनें ते शेत खरेदी देण्याचे नाकबूल आहांत इतकेच नाहीं पण इसाराचे ५० रुपये ही नाकबूल आहांत हें आपल्या सारख्यास योग्य नाहीं जेव्हां तुमचा व माझा पक्का सवदा झाला त्याच वेळेस तुम्ही सांगितल्या वरून मी या शेतांतील पऱ्हाट्या उपटून त्याची वाही वगैरे केली हे सर्व लोक जाणार आहेत. तर असें न करितां त्या शेताचे खरेदीखत रजिस्ट्रर कचेरींत लिहून देऊन आपले २३३ रुपया पैकीं ५० रुपये वजा जाता बाकी राहिलेले १८३ रुपये सबरजिस्ट्रार कचेरींत मोजून घ्यावे. असें आठ दिवसाचे आंत न केल्यास मी रीतशीर कोर्टांत फिर्याद करून कोर्ट खर्च व नोटिसीचा खर्च तुमचेपासून भरून घेईन कळावें ता० ७।५।०३ इ०

सही

सखाराम वा। खंडुजी पाटील बोरवाकडी तालुके बाळापूर दस्तूर खुद्द.

पं० नादारी मुकदमा नंबर ३
१९०३

नादारी नियम अन्वये नादाराला नादार ठरविणें विषयीं अर्जाचे सावकारास नोटिशीचा नमुना.

जी

विद्यमान सी. एच. प्राईस साहेब बहादुर नादारी कोर्टाचे जड्ज्य अकोलें यांचे कोर्टांत.

खालीं लिहिलेले सावकार व सर्वत्र लोक यास.

नोटीस देण्यांत येते कीं बापु सोनाजी हाली वस्ती ताजनापेठ अकोलें हा नादार आहे असा आज तारीख ४ माहे एप्रिल सन सन १९०३ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख २० माहे जून सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमुन देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यानीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या त्या नोटिशींत ज्या अधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याज बद्दल ज्या साक्षीदारांस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतीज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल अफिसऱ्या पुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ करावी. आणि ती यादी त्याला मार्फत कोर्टांत पाठवावी ह्मणजे दावा रजिष्टरांत दाखल होईल.

अर्जदाराच्या सावकारांचीं नांवें—

१ व्याहारीलाल मगुलाल दुकान आकोलें- १००
१ मोतीलाल बनसीलाल दुकान आकोलें – ४०
१ रामचंद्र अमृतराव बुटी दुकान आकोलें-६५
१ लतीब कच्छी दुकान आकोलें -६०
१ विलायत हुसेन हैदरअली वस्ती आकोलें –३०
एकूण रुपये ३९५

V. N. Daudekar
जड्ज्य आकोला

## पत्रव्यवहार

लिहिण्यास आनंद वाटतो कीं आकोट ग्रामवासी मंडळीनें मंगळवारीं श्रीशिवजयंती प्रीत्यर्थ रा० रा० शिरोळकरकृत "पानपतचा मुकाबला" नाटकाचा प्रयोग करून दाखविला. त्यांत भाऊ साहेब, जनकोजी, मल्हार राव वगैरे मंडळींचीं कामें फारच अप्रतीम वठलीं. त्याच प्रमाणें मुसलमानी दरबारांतील ही कामें प्रेक्षणीय उठलीं. मंडळीचा नाटक करण्याचा धंदा नसून त्यांत त्यांनीं प्रवीणता दाखविली ह्मणून त्यांचें गौरव करावें तितकें थोडेंच. बुधवारीं श्री शिवजन्माबद्दल रा० रा० चिंतामण शास्त्री ठकार यांचे "परित्राणाय साधूनां" या गीतेतील श्लोकाधारें सुश्राव्य पुराण झालें. रात्रौं महाराजांपुढें गायन झालें. गुरुवारीं सायंकाळीं वेदघोष व कीर्तन झालें. शुक्रवारीं प्रसिद्ध नारायण शास्त्री यांचें कीर्तन झालें येणें प्रमाणें शिवाजी महाराजांबद्दल अकोटवासी मंडळीनें आपलें प्रेम व्यक्त करून दाखविलें.

ता. २।५।०३ "अकोट वासी"

## मधुपानामृतम्

कोणीहि सद्गृहस्थ केव्हांही आपल्या घरीं आला तर त्याचा आपण मनापासून मोठा आदरसत्कार व मानमरातब करितों. आपण उठून उभे राहतों व त्यास या, बसा ह्मणून कुशल प्रश्न करितों. तो मनुष्य उन्हातान्हाचा आला असल्यास त्यास थंड पाणी पिण्यास देतों; व प्रसंगानुसार नुसतें पाणी न देतां पाण्यास आधार ह्मणून थोडेंसें खाण्यास देतों; निदान कांहीं नाहीं तरी गुळ किंवा साखर देण्याचा रिवाज आपल्याकडे फार जुना आहे. पुढें संभाषणादि काम आटोपल्यावर शेवटीं त्यास पानसुपारी देऊन त्यास दारापर्यंत पोहोंचवावयास जातो. येणेंप्रमाणें अथ पासून इतिपर्यंत आलेल्या गृहस्थाच्या तैनातींत राहून त्यास आपल्या मधुर बोलानें व गोड कृतीनें सुखवितो. असा आपला पूर्वापारचा गोड शिष्ट संप्रदाय आहे.

पण त्यांत अलीकडे बरीच नकोती सुधारणा झालेली आहे. अलीकडचे लोक फार बेपर्वा दिसतात. त्यास मनुष्याची कदर नसते. त्यास लोकांचा अपमान करण्यांतच थोडेसें भूषण वाटतें. आपण दुसऱ्याचा मान राखला ह्मणजे तो आपला स्वतांचाच राखला हें ते विसरतात. लोकांच्या मनांत एकमेकांबद्दल प्रेमा नसून उलटा द्वेषभाव मात्र असतो. एकमेकांचें लक्ष्य दुसऱ्याचीं छिद्रें धुंडाळण्यांत असतें, पण त्यांचें अंगीं असलेला गुण मात्र ते कधींच ओळखत नाहींत. अलीकडचे लोक फार कायसाधु दिसतात. आपल्या मतलबापेक्षां ते जास्त कांहीं ओळखत नाहींत. ताका पुरतें रामायण, ज्यास्त ते गरज ठेवीत नाहींत. यांच्या येथें कधीं अतिथीचें उष्टें पडेल किंवा कोणाचा कधीं हात धुतला जाईल तर शपथ. पूर्वीचे लोक अन्नदानाचें फार पुण्य समजत व कोणीहि आला गेला तरी त्यास भाजी भाकरी मिळाली नाहीं असें कधीं झालें नाहीं. पण हल्लींची शोचनीय स्थिती येण्याचें कारण आपलें वाढतें दारिद्र होय व या दारिद्र्यामुळेंच लोकांच्या आचार विचारांतहि असा क्षुद्रपणा आला आहे. असो.

अलीकडील शिष्ट संप्रदाय ह्मटला ह्मणजे चहा काफीची बशी ( पेला ) पुढें करावयाचा. व त्याच्या पानानें संतुष्टि झाली कीं बिस्कुट व आगपेटी देऊन संपूर्णता करणें. चहा काफीसारखे पदार्थ वस्तुतः शरिरास अपायकारक आहेत. गोड लिंबाचे सरबताची सर्वी व संतुष्टी कोणीकडे ! व त्या चहाकाफीची कोणीकडे ! गोष्ट प्रत्यक्ष अनुभवून पहावी. मद्य, चहा, बिस्कुट, हीं व्यसनांत गणली जातात, तशी गोष्ट साखर पाणी, मद्य यांची नाहीं. लोकांनीं ह्या दुष्ट पदार्थांचें सेवन करूं नये अशी आमची त्यास आग्रहपूर्वक सूचना आहे ह्यांच्या घातुक परिणामाचीं उदाहरणें अनेक दाखवितां येतील. ह्या ऐवजीं मधाचा उपयोग केला तर फार चांगलें होईल. मधुपानाची मातबरी पुष्कळांस माहीत नाहीं ह्मणून ती आह्मी मुद्दाम सांगत आहों. मधाच्या उपयोगाबद्दल भिषग्विलासांत खालील संग्राह्य माहिती दिलेली आहे.

मधाचा उपयोग–मधाचे अंगीं अंशतः अन्नाचे धर्म आहेत, ही गोष्ट फारच थोड्या लोकांना माहीत आहे. मधाचा पाक लौकर होऊन तो रसांत जलद शोषला जातो. पण विशिष्ट पदार्थ अथवा साखर ह्या ऐवजीं मधाचें पचन जलद होतें, ह्याचें कारण असें कीं, त्यास अंशतः मधमाशा पचनाच्या स्थितीस आणून ठेवितात त्या स्थितींत [illegible]

पदार्थ येण्यास बराच वेळ लागतो. मधाचे अंगीं औषधी गुणहि पुष्कळ आहेत, मधाचे अंगीं सारक व वेदनाशामक धर्म आहेत. विशेषतः लहान मुलांना अशा उपयोगासाठीं तो देणें अत्यंत प्रशस्त होय. आमच्या बाळ-बाळिंतांना ह्या मधाच्या अंगच्या विशेष धर्मांची चांगली ओळख होती असें दिसतें, मधाचे अंगीं उत्तेजक धर्म असून सुरेचे दुर्गुण नाहींत. अर्थात, चहा, काफी, इत्यादि पानांचे ऐवजीं रोज 'मधुपान' करणें अधिक फायद्याचें होय. मध मात्र भेसळ न वापरतां खात्रीचा मिळविला पाहिजे. सुदैवेंकरून हिंदुस्थानांत तो पुष्कळ मिळतोहि. पेलाभर गरम पाण्यांत चमचाभर मध टाकून रोज पीत गेल्यास चहाचें काम होऊन मलशुद्धि चांगली होते, भूक लागते व हुषारीहि वाटते. ह्यांतच थोडें दूध घातल्यासहि चांगलें. पण, पाश्चिमात्य ढंगाच्या नादीं लागलेल्या आमचे लोकांच्या ध्यानांत हें येईल तेव्हां खरें ! मधुमिश्रित पानास अमृत पानाची उपमा खरोखरच शोभते.''

दूध, गूळ, साखर व मध असें सोन्या सारखे जिन्नस टाकून देऊन चहा, काफी, कोको, मद्यादि पदार्थ आपण जवळ करितो हो केवढी आपली चूक होत आहे. चहा काफी सोडून तूप, दूध, मद्द सेवन करण्याची आपण मना पासून सुधारणा केली पाहिजे. ...सेच धूम्रपान करण्यापेक्षां आपला चतुर्दश गुणांनीं युक्त असा तांबूल शरिराचा थकवा दूर करील, व जिवास हुषारी देईल. आपल्या देशांचे दारिद्य व ऱ्हास अशा आपल्या वागणुकीनें दूर होऊन आपणा सर्वांस सुखाचे दिवस लाभतील म्हणून आपण सर्वांनीं स्वदेशी वस्तूची, व स्वदेशी चाली रीतींची चाड बाळगिली पाहिजे.

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख शुद्ध १९ शके १८२९

## रक्तपिती

रक्तपितीचा रोग फार वाईट आहे. तो प्रथम जडतो तेव्हां दुसऱ्याच्या स्पर्शानें किंवा संसर्गानें जडतो असें क्वचितच घडतें. बहुधा हा रोग अनुवंशिक असतो. ज्याला हा रोग असतो त्याच्या पूर्वजामध्यें या रोगाचा अंकुर पूर्वी होता असें आढळून येईल. या रोगांत रक्त दूषित होत असतें आणि या रोगाची आपत्ति म्हणजे ईश्वरी कोपाचेंच लक्षण होय. रक्तपितीच्या रोग्याला एक वेळ मृत्यु बरा वाटेल इतकी या रोगाची पीडा दुःसह असते!

कांहीं वर्षापूर्वीं या रोगा संबंधानें एक कमिशन बसलें होतें आणि तेव्हांच असा सिद्धान्त ठरला होता कीं हा रोग स्पर्श फारसा भरंवसा नाहीं. रक्तपितीवाल्याच्या सुश्रूषे संबंधानें आमच्या देशाचा रिवाज अगदीं निराळा आहे. त्याला वाटतील तितकें औषधोपचार करावें; पण त्याची राहण्याची जागा निराळी पाहिजे. त्याचा संसर्ग अन्नोदकाशीं होतां कामा नये आणि त्याचा कपडालत्ता देखील अगदीं वेगळा ठेवावयाचा. ही व्यवस्था रोग्याला सुखावह असून त्याच्या अलिप्तपणानें त्या रोगाची बाधा दुसऱ्यास फार कमी होते.

ही जुनी पद्धती अगदीं मोडत चालली आहे. अलिकडे हे रोगी लोकांमध्यें फार मिसळूं पाहतात. त्यांच्या पासून कोणी दूर अंतरावर जाऊन बसला तर तें त्याला मोठें वैषम्य वाटतें. रक्तपितीचें दर्शनही डोळ्याला फार किळस आणणारें असतें हें पुष्कळदां रोगी विसरतात. असा अनुभव आहे कीं या प्रकारच्या रोग्याला निराळेपणा आवडत नाहीं. त्याची सारी हांव सर्व पदार्थांमध्यें हात घालण्याकडे असते. दुसऱ्यास स्पर्श करावा अशी उत्कंठा त्या रोग्याच्या मनांत विशेष जागृत असते.

रक्तपितीच्या रोग्या संबंधानें सरकारी कायदा आहे. हा कायदा या प्रांतीं लागू करण्यात आला आहे. हा १८९८ चा ३ रा कायदा आहे. त्याच्या अंमल बजावणीचा काल या प्रांताला प्राप्त झाला ही दुःखाची गोष्ट होय. परंतु सार्वजनिक कल्याणासाठीं ही गोष्ट फार अगत्याची आहे. या पुढें जिल्ह्याच्या सदर स्टेशनच्या मुनसिपल हद्दींत, तसेंच खामगाव, शेगाव, आकोट व कारंजा येथील मुनसिपालिट्यांच्या हद्दींत आणि शिकंदराबाद, औरंगाबाद व बेलारम येथील छावण्यांत हा कायदा चालू केला आहे. या ठिकाणीं जे मेडिकल आफिसर असतील त्यांस रक्तपितीच्या रोग्यांचें इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या हद्दींच्या आंत कोणाही रक्तपितीवाल्यानें एखादा खाण्याचा पदार्थ, पिण्याचें पेय किंवा वापरावयाचा कपडा विकण्यासाठीं तयार करूं नये, किंवा विकत बसूं नये. तसेंच त्यानें सार्वजनिक विहिरींत किंवा तलावांत स्नान करूं नये, कपडा धुऊं नये किंवा आपल्या हातानें पाणी काढून घेऊं नये. आणि त्याचप्रमाणें भाड्याच्या वाहनावर बसूं नये भाड्याच्या गाडींतून फिरूं नये किंवा भाडेवाल्याचा धंदाही करूं नये.

जे रोगी निराश्रित असतील, ज्यांच्या औषधपाण्याची सोय होण्यासारखी नसेल व जे त्यांचें स्वतांचें घरदार नसल्यामुळें भटकत असतील अशा रोग्यांस नागपूरच्या इस्पितळांत सरकार तून पाठविण्यात येईल. सरकारी कायद्याची योजना प्रथम दर्शनीं फार कडक वाटेल पण सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें असा कायदा फार अगत्याचा आहे. ज्याला रक्तपिती होते त्याच्याकडे सर्वांनीं दयार्द्र दृष्टीच ठेविली पाहिजे पण तसें करितांना त्यांचा संसर्ग न होईल इतकी खबरदारी अगोदर घेतली पाहिजे.

## कर्नल मेकंझी साहेब

कर्नल मेकंझी साहेब हे विलायतेंत निवर्तले असें दुःखकारक वर्तमान नुकतेंच इकडे यांचा जन्म चिखलदऱ्यास झाला होता. यांस या प्रांताचा मोठा अभिमान असे आणि इलिचपूर जिल्ह्यांत व मुख्यत्वें करून मेळघाटांतील कुर्कु लोकांमध्यें या साहेबांस फार मान असे. आकाशांत अल्ला व खालीं मेकंझी साहेब असें पुष्कळ लोक तोंडानें बोलूनही दाखवीत. वऱ्हाडांतील अधिकाऱ्यांमध्यें त्यांच्या तोलाला तोल देणारा अधिकार मिळणार नाहीं. यांची कारकीर्द फार वर्णनीय अशी झाली. असिस्टंट कमिशनरी पासून डिपुटी कमिशनर, जुडिशिअल कमिशनर, रेव्हिन्यु कमिशनर व शेवटीं अलिशान रेसिडेंट अशा उच्च उच्च अधिकारापर्यंत ते आपल्या कर्तबगारीनें, हिंमत बहादरीनें व अक्कल हुशारीनें चढले होते. यांच्या मर्जीला जीं माणसें उतरलीं तीं हल्लीं या प्रांतीं मोठमोठ्या अधिकारावर बहाल आहेत. हे लष्करी बाण्याचे अंमलदार होते; आणि कोणावर कृपा केली म्हणजे त्यांच्या जन्या राहशती प्रमाणें ते त्याला लौकिकाला व श्रीमंतीला चढवीत. कर्नल मेकंझी साहेबांच्या अंगीं गुणाप्रमाणें दोषही कांहीं होते पण त्यांच्या तोडीचे सरदार आतां पाहण्यास मिळणार नाहींत. यांस माणसाची पारख चांगली असे यांस लोकप्रिय असण्याची होस मोठी होती. त्यांच्या मरणामुळें आमच्या प्रांताची एक जुनी सांखळी तुटली असें आम्हांस वाटतें,

थोड्या वर्षापूर्वीं हे पेनशन घेऊन गेले तेव्हां यांची शरीरप्रकृति चांगली सदृढ व बळकट होती व हे पेनशनीचा उपभोग पुष्कळ वर्षें घेतील असा अंदाजा होता. आमच्या इकडील साहेब लोक विलायतेस जाण्यापेक्षां आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध इंडियांतच घालवितील तर त्यांची आयुर्मर्यादा वाढेल असें आम्हांस वाटतें. ईश्वर मेकंझी साहेबांच्या आत्म्यास उत्तम गती देवो !

## भाऊबंदकी

इंग्लंड आणि इंडिया हे एकाच साम्राज्याचे विजयध्वज होत. ह्यापैकीं कोणा एकासही जो कोणी अटकाव करील तो त्या एक छत्री राज्याचा शत्रू ठरेल. व त्याचें शासन करण्या करितां हे दोन्ही ध्वज सारख्याच त्वेषानें पुढें धांव मारतील. इंग्लंड आणि इंडिया हे त्या राज्याचा एकच जीव आहे. एकास कांटा बोंचला तर दुसऱ्याच्या डोळ्यास तात्काळ पाणी येणार हें निःसंशय आहे; एकाची जी नफानुकसानीची बाबत तीच दुसऱ्याची होय म्हणजे साम्राज्याच्या बाहेरच्या लोका संबंधानें पाहतां इंग्लंड आणि इंडिया यांत कांहीं इतकाही आपपर भाव उरलेला नाहीं. कांहीं काला पूर्वीं इंग्लंड व इंडिया यांचें हिताहित परस्पर विरोधी होतें. परंतु सुदैवानें म्हणा वा दुर्दैवानें म्हणा प्रभुसत्तेनें ही दोन्हीही राष्ट्रें एकवटून एक छत्री खालीं आलीं व तेव्हां पासून त्यांच्या हिताहिताची गोष्ट विरोधी राहिली नाहीं. ह्या साम्राज्यास कशापासूनहि धक्का पोहोंचूं नये अशा साठीं हे दोन्ही आधारस्तंभ मजबूत गाडले पाहिजेत. व जेणें करून याची तन दुरुस्ती राहील अशी

परंतु हा विचार परकी राष्ट्रांच्या हिताहित संबंधा पुरताच आहे. इंग्लंड आणि इंडिया हे ह्या एका दृष्टीनें एकच आहेत तरी इतर पुष्कळ बाबतींत ते वेगवेगळे आहेत हें आपण कधींहि विसरतां कामा नये. दोन सख्खे बंधु हे एकाच कुटुंबांतील जीव आहेत व त्या कुटुंबाचें सुखदुःख व धनदौलत ही दोघांची सारखीच आहे. दोघेहि सर्व गोष्टींचे सारखेच वाटेकरी व भोक्ते आहेत. म्हणजे कुटुंबाच्या दृष्टीनें पाहतां ते दोघे एकच होत. परंतु त्यांच्या परस्पर संबंधांत ते निरनिराळे आहेत. त्यांचा एकमेकांचा जिव्हाळा असणें, त्यांची मनें एक असणें, त्यांचा एकमेकावर लोभ असणें इत्यादि गोष्ट फार स्तुत्य होत. व जों पर्यंत ते एक दिलानें वागतील व परस्परांस सुखी व आनंदी राखतील तों पर्यंत सर्व कांहीं ठीक आहे. पण इतका मनाचा प्रेमळपणा व्यवहारांत शक्य नसतो. काल्पनिक बंधुप्रीतीचे लोट प्रत्यक्ष व्यवहारांत वाहत नाहींत. म्हणून आपल्यास व्यवहारातलाच विचार केला पाहिजे. आणि अशा दृष्टीनेंच इंडियाची व इंग्लंडची पुरी भाऊबंदकी आहे. ही आपली भाऊबंदकी चांगली उगविली पाहिजे. व आपला हिस्सा आपणांस मिळविला पाहिजे. परंतु आपसांत आपण किती ही भांडलों तंडलों तरी आपल्यांत तिसऱ्याचें बोट न शिरकेल अशी खबरदारी घेणें मात्र जरूर आहे, आणि एवढी आपण घेतली म्हणजे मग आपणास भांडणा करितां कंबर बांधण्यास हरकत नाहीं. ते व आपण एक तर खरेच पण ते कंठाळीला मात्र हात लावू देत नाहींत. अर्थात् त्यांचें पोट भरल्यानें आपलें कसें भरणार!

भाऊबंदकीचे तंटे आपण व्यवहारांत पदोपदीं पहातो; कोणी गुण्या गोविंदानें व निःष्काम बुद्धीनें दुसऱ्यास त्याचा योग्य हिस्सा देईल ही गोष्ट होणें नाहीं. मनुष्य स्वभावच असा आहे कीं, तो लालचींत सांपडायाचा. त्याच्या तोंडास पाणी सुटलें म्हणजे मग त्याच्या वासना फार बळावतात व त्यामुळें त्याच्या करणीची ग्रास युक्तायुक्तता दिसत नाहीं. आपण अज्ञान आहोंत हें पाहून इंग्लिश लोकानीं आपल्या तोंडावरून व डोक्यावरून हात फिरविण्याची बुद्धि धरली तर कांहीं नवल नाहीं. मनुष्य कितीहि न्यायी असला तरी स्वहिताची गोष्ट पुढें आली कीं त्याची न्यायबुद्धि आंधळी होतेच. आतां आपलें आपणांस कळूं लागलें आहे, त्या अर्थीं आपला वाटा आपण त्यांज पाशीं मागणें अगदीं रास्त आहे. यांत कांहीं एक वावगें नाहीं. ते देत नसले तर आपण त्यांच्याशीं वाद घालणें हें आपलें कर्तव्य आहे व तें आपण केलें पाहिजे. ह्यांत आपण जी करूं नये ती गोष्ट करीत आहों अशी जी कित्येकांस शंका व भिती वाटत आहे ती अस्थानीं होय.

इंडिया व इंग्लंड यांची भाऊबंदकी फार मोठी आहे. राष्ट्राची भाऊबंदकी सहसा लवकर मिटणारी नसते. आपणास इंग्रजाशीं पुष्कळच वर्षें व नेटानें लढलें पाहिजे. आपण सध्यां सर्वस्वी खालावलेले आहों. आणि म्हणून आपणांस प्रत्येक गोष्टींत पर्वता एवढ्या दुर्गम अडचणी प्राप्त होतील त्यांस आपण डगमगतां कामा नये. आपली मंत्राळें पुष्कळदां

कडून घेणें निघत होते. तशी दिवाळे की-

in the Vice-Regal Council there

a permanent lease is no treaty

होतां कामा नये व आपल्या सतत उद्योगांत खंड पडतां कामा नये, आपण दृढ निश्चयानें व एक निष्ठेनें आरंभलेलें कार्य करूं या मग यांत यशश्री देणार परमेश्वर समर्थ आहे.

आपल्या ह्या भाऊबंदकीच्या तंट्यांत आपण पुष्कळच गोष्टी मागणार हें उघड आहे. कारण आपण सर्वथा नागविल्या सारखेच झालों आहों. आपले इंग्रज बंधू जे सुखैश्वर्य भोगीत आहेत त्याच्या शतांश तरी आपणांस तें लाभलें आहे काय? आपणांत व त्यांच्यात किती जमीन अस्मानचें अंतर आहे पहा! ते स्वतंत्र आहेत पण आपण दुसऱ्याच्या हाता तोंडानीं पाणी पीत आहों; ते सुखी तर आपण दुःखी. ते सुग्रास खाऊन पोटा वरून हात फिरवतात, तर आपण पोटाची आग शांत न झाल्यामुळें ती हातानें दडपत आहों. त्यांच्या तिजोरींत हिरेमाणकें झळकत आहेत आणि आपल्या तिजोऱ्या रिकाम्या खंक पडल्या आहेत. त्यांच्या घरांत नाना तऱ्हेचे कारखाने आहेत. आणि आपल्या घरात पीठ पाडण्याची चक्की सुद्धा राहिली नाहीं. अशा एक ना दोन गोष्टी. जो जों आपण विचार करूं तों तों आपलें काळीज फाटूं लागेल. अरे! आपली कितीहि खर्च केली तरी न संपणारी इतकी संपत्ती होती ती कोणी नेली! आपल्या रोजगार धंद्यावर कोणी पाय आणिले! आपलें सर्व सुख कोणी हिरावून नेलें! आपण फसलों! ह्या आपल्यास आपल्या भाऊबंदांनींच ह्या दीन स्थितींत आणिलें. आपल्या दारिद्र्यामुळें, आपल्या कमकुवतीमुळें, आपल्या रणभीरूपणामुळें, आपल्या निरुद्योगी व आळशी स्वभावामुळें ते आपणांस कःपदार्थ लेखतात. त्यांस आपण बंधू शोभत नाहीं. ते आपणावर हुकमत गाजवीत आहेत व आपण त्यांच्या घरीं बंद्या गुलामाप्रमाणें नांदत आहों. या सर्व गोष्टींचा आपण पुरता विचार केला पाहिजे. आपलें सर्वच वाघाच्या तोंडांत गेलें आहे तें आपणास त्याच्या तोंडातून बाहेर काढायाचें आहे. या साठीं आपली तयारी मोठी पाहिजे आपण आपली सुधारणा केली पाहिजे. जे गुण आपणांत नाहींत ते आपण साध्य केले पाहिजेत आणि अशा रीतीनें आपण आपला हा भाऊबंदकीचा गड जिंकला पाहिजे. आणि हें काम आपण लांबणीवर टाकूं तर पुढें मागें आपल्या पोराबाळांस फारच जाचणार आहे. व कदाचित् कालांतरानें आपला मागणीचा हक्क कायद्या बाहेरहि जाण्याचा संभव आहे.

# The Berar Samachar

MONDAY MAY 11 1903

IN the latest number of 'East and West' we have from the pen of Mr. J. D. B. Gribble J. C. S. an interesting article on the recent Berar settlement. The author speaks with authority and we have before us a precise statement of facts and figures which take us behind the curtain & show what was passing behind the scene before the Berar question was finally settled in December last. When the Berar settlement was first announced in the Vice-Regal Council there was

circle. All praised Lord Curzon for the liberal and generous manner in which His Excellency took on a permanent lease this province upon the annual payment of 25 lacs of Rupees. It was pointed out to His Highness the Nizam that in no one year there was a larger income than 9 lacs of Rupees paid to the Hyderabad treasury; so an annual payment of 25 lacs of Rupees for all time to come is a decided gain to the Nizam's treasury in addition to his rights of sovereignty which will be acknowledged every year by salute of guns and hoisting of the Nizam's flag at the head quarter of this province. This liberality of the Government could not, however, silence our questioning hearts. There was a doubting and misgiving. We could not permit ourselves to think that His Highness the Nizam parted with the province with a jolly heart. We could not get over the past trend of events in which there was an unambiguious demand for the restoration of these provinces. There was, of course, the supreme necessity of retaining this province,—a necessity which can only be justified on the grounds of moral and political exigencies. These grounds, if rightly paraphrased, will reassert that might is ever right.

Mr. Gribble has most graphically described the hesitating mood of His Highness the Nizam when he acceeded to the proposal of the permanent lease. He observes:—

"The preliminary negotiations over, the Viceroy came to Hyderabad and spent three weeks—shooting—during the month of April 1902. Before he went to his shikar camp Lord Curzon had a private interview with the Nizam, in which he orally repeated the same proposition. The Nizam at first asked whether it was not possible for him to get the province back, or that the treaty should be annulled. On being told "No," he expressed his consent to the proposed arrangement (orally,) and the some evening was eulogised by the Viceroy at a banquet as a Prince who never went back from his word."

We can easily see from the above quotation that the request of a paramount Lord was more than a command. Mr. Gribble finds fault with the government of India for the illiberal manner in which the Nizam was persuaded to accept the 25 lacs. He gives no credit to the government for handing over the working balance of 41 lacs. on the ground that it clearly belonged to the Nizam. He analyses the generosity of the government in the following eloquent strain:—

"In fact, so unaccountable has this unwonted generosity appeared to outsiders, unacquainted with the real facts, that some of the papers have actually asked the question, "Why, if the actual surplus given to the Nizam has hitherto been only 9 lakhs should we pay him 25 hereafter? Why should the Indian tax—payer be made to bear the burden of the Government of India's generosity! Surely, this is robbing Peter to pay Paul! But the Indian tax—payer need not be frightened. He should remember that we live in the land of *Maya* or Illusion. Here also things are not what they seem!"

Mr. Gribble does not stop here. He further discusses that the *agreement of a permanent lease is no treaty*

and is therefore amenable to the decision of a judicial tribunal. He charges the government of India of misrepresenting the real financial condition of the province and thinks it proper that His Highness should not rest satisfy unless the payment of 50 lacs of Rupees is promised by the Government of India. Otherwise the present agreement deserves to be set aside in Equity, justice and good conscience.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—उन्हाळा प्रखर होत चालला आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. अभ्रें वारंवार येतात. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं. गेल्या दोन दिवसा पासून हवेंत थंडपणा अधीक वाटतो.

मे० हेअर साहेब कमिशनर हे गेल्या मंगळवारीं आकोल्यास आले. येथील लँड रिकार्डाच्या आफिसाची छाटाछाट करण्याच्या व्यवस्थेसाठीं ते आले आहेत व या पुढें हें आफिस कमिशनर साहेबांच्या प्रत्यक्ष देखरेखी खालीं ठेवण्यांत येणार आहे.

मे० रुस्तुमजी साहेब डिपुटी कमिशनर यांची स्वारी जळगांवाकडे गेली असून आतां पुढें नरनाळ्यास जाणार आहे.

आज रोजीं आकोला जिल्हा—बोर्डाची जनरल सभा भरणार आहे.

रा० रा० त्रिंबक गणेश परांजपे यांच्या वरील प्रकरणांची चौकशी येत्या १८ वे तारखेला सुरूं होईल.

बुलढाण्याचे सिव्हिल सर्जन आनररी क्याप्टन जेम्स मारिसन हे येत्या १६ वे तारखें पासून चार सप्तकांच्या हक्काच्या रजेवर जाणार असून यांच्या जागीं असिस्टंट सर्जन कलीपाडा चक्रवर्ती हे सिव्हिल सर्जन होतील.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस वणी जिल्ह्याचे जिल्हा रजिस्टार नेमण्यांत आलें.

खान बहादूर शेर महमदखान तहशिलदार वाशीम यास येत्या १९ वे तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली असून त्यांच्या जागीं मि० सय्यद फरुक हुसेन नायब तहशिलदार बाळापूर यांस तहशिलदार नेमण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८- |
| सोनें २४।= | चांदी ६२॥ |
| ज्वारी ४५।५० | जवस १०० |
| गहू | ९० ते १०० |
| बाजरी | ५५ |
| मीठ | ३८=॥ रु. मण |
| चणे | ३॥= रु. मण |
| तूप | ७॥रु. मण |
| तेल | ६॥। रु. मण |
| रुई | ५२।५३ |

## नोटीस

बेशमी हिरालाल चुनीला दुकान आकोला मालक हिरालाल चंद्रभान राहणार छावणी इंगोली यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमच्या दुकानचें हुंडीबद्दलचे रुपये १००० ( एक हजार ) तुह्मा कडून घेणें निघत होते. तुह्मी दिवाळें काढल्यामुळें व तुह्मी फार आर्जव केल्यामुळें आह्मी तुह्माकडून रोख नगदीचा २५० रुपयांचा आंकडा घेतला व बाकीचे ७५० रुपये तीन सालबंद्यांनीं घेण्याचे ठरले. परंतु तुमचा आंकडा पटला नाहीं व तुह्मी ७५० रुपयाबद्दलचा देखील लेख करून दिला नाहीं. २५० रुपयांचा आंकडा पटविण्याची जबाबदारी तुमची होती. तुह्मी अशा रीतीनें फसविल्यामुळें आह्मी आंकड्याचा सालबंदीचा ठराव रद्द केला आहे. हुंडीबद्दलचे रुपये १००० व इतर नुकसानी नोटिशीच्या व कोर्ट खर्चां सुद्धां तुह्माकडून कोर्ट मार्फत वसूल केले जातील. कळावें. तारीख १० मे सन १९०३ इसवी.

सही

डालूराम चुनीलाल साहू

दुकान आकोला.

## नोटीस

लुल्या वा॥ धऱ्या जात माहार राहणार मौजे चिखलगांव तालुके आकोला यांसः—

भदु वा॥ निंब्या जात माहर धरम्या वा॥ भदु माहार राहणार मौजे म्हैसपूर तालुके आकोला यांजकडून कळविण्यांत येते कीं तुमची लेक नामे मुक्ती व आमचा लेक नामें धरम्या या दोघांचें लग्न करून देण्यास सुमारे ९।१० वर्षें झालें असतील व लग्न झाल्यावर कांहीं दिवस येणें जाणें राहिलें. परंतु हल्लीं दिपवाळीचे मिशानी नेल्यावर आह्मी तुमचे घरीं येऊनहि तुह्मी मुक्तीस आमचे बरोबर रवाना केली नाहीं सबब नोटिसीनें कळवितों कीं ही नोटीस पावल्या पासुन १२ दिवसांचें आंत आमची सून आमचे घरीं आणून दाखल करावी जर न कराल तर लेखी जबाब द्यावा. अगर न जबाब दिले तर तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून ताब्यांत घेण्यास जो खर्च लागेल त्या समेत तुह्मास द्यावा लागेल आणि मुक्ती ही आमचे ताब्यांत घेण्यांत येईल हे कळावे आणि तुह्मी फार विचार करून जबाब द्यावे कळावें ता. ९ मे सन १९०३ इसवी. सही

भदु वा॥ निंब्या जात महार राहणार

म्हैसपूर नि० खुद.

धम्र्यो वा॥ भदू महार राहणार म्हैसपूर

निशाणी खुद्द.

## नोटीस.

नोटीस बेशमी चिमनराव त्रिंबुकराव पांडे मुकाम रिसोड तालुके वाशीम. यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्याकडे आमचे हिशेब रुजु करून बाकी घेणें निघालेले रुपये १८८ अक्षरी एकशें अठ्ठयाशी मित्ती कार्तीक शुद्ध १ संमत १९५७ च्या सालाचे व आज मित्ती पावेतो व्याज २९ मिळून २१७ अक्षरी दोनशे सतरा नोटीस पावल्या दिवसा पासून पंधरा दिवसाचे आंत पाठवून द्यावे असे न केल्यास कायदा प्रमाणें तजवीज केली जाईल कळावे, तारीख १० माहे मे सन १९०३ इसवी.

सही

धीवराज सुरजमल

दस्तुर जगन्नाथ.

## वर्तमानसार

## भुतांचा राज्यकारभार

धंदेशिक्षणाच्या प्रगतीचें भूत— जितक्या पुष्कळ जिनसा जितक्या थोड्या वेळांत तुह्मी कराल तितकें चांगलें, हें तत्व मी लोकांच्या डोक्यांत भरून दिल्यापासून विकत घेणारांना ताबडतोब निरुपयोगी होणाऱ्या अशा जिनसा तयार करण्यामध्यें लाखों लोक आपलें आयुष्य फुकट दवडूं लागले आहेत.

२ श्रमविभागाचें भूत— मी मनुष्यांना निवळ यंत्राप्रमाणें करून ठेविलें आहे.

३ आगगाड्यांचें भूत— मी लोकांना इतकें वेडें करून सोडलें आहे कीं आपण जेथें आहों तेथेंच आपली स्थिति सुधारण्याचें त्यांच्या डोक्यांत कधींही न येतां आपण एका तासांत पंचवीस मैल प्रवास करूं शकतों याबद्दलच त्यांना भूषण वाटूं लागलें आहे.

४ मुद्रणकलेचें भूत— सगळ्या जगांतील मूर्खपणाच्या आणि वेडगळपणाच्या गोष्टी एकत्र करून जितक्या जास्त लोकांना कळतील तितक्या लोकांना कळविण्याची मी तजवीज केली आहे.

५ औषधाचें भूत—मी लोकांच्या मनांत आपल्या शरीराबद्दल इतकी कळकळ उत्पन्न करून ठेविली आहे कीं त्यांत गर्क होऊन ते आपल्या आत्म्याची कधींच काळजी घेत नाहींत.

६ सुधारणेचें भूत— माझ्याशिवाय इतर भुतांना कोणीही विचारिलें नसतें. मी सर्व लोकांच्या मनांत असें भरवून दिलें आहे कीं धंदेशिक्षणाची प्रगति, श्रमविभागाचें तत्व, आगगाड्यांची सोय, छापखाने, आणि दवाखाने हीं एक प्रकारचीं मनुष्यांला भूषणें आहेत; त्याशिवाय मनुष्याचें जिणें व्यर्थ होय. हें तत्व जर मी लोकांच्या डोक्यांत भरवून दिलें नसतें आणि सुधारलेल्या मनुष्याला या गोष्टी अवश्य आहेत असें जर लोकांना भासवून दिलें नसतें, तर ह्या बाकीच्यांना कोण विचारीत होतें?

७ शिक्षणाचें भूत— स्वतःचें वर्तन वाईट असूनही दुसऱ्यांना सद्वर्तनाचें सुशिक्षण देण्याची कला मी जगांत प्रचलित केली आहे.

८ दानधर्माचें भूत— लोकांच्या बरोबर लाखों रुपयांचे दरवडे घालून त्यांतून पांच रुपये धर्म केला ह्मणजे तो धर्मात्मा होय असें मानण्याला मी लोकांना शिकविलें आहे.

९ कायद्याचें आणि राज्यव्यवस्थेचें प्रचंड अक्राळविक्राळ भूत—पूर्वी लोक एकमेकांच्या चोऱ्या वगैरे करीत होते, परंतु मी आतां लोकांची अशी समजूत करून दिली आहे कीं, एकमेकांनीं एकमेकांची चोरी करण्यापेक्षां, चोरी करण्याचा, दरवडे घालण्याचा, लुटण्याचा आणि खून करण्याचा अधिकार फक्त एकाचकडे दिला तर त्यांत जास्त फायदा आहे. व या गोष्टी त्या एका इसमानें कशा कराव्या, याबद्दल त्याला कायद्याच्या नांवाखालीं नियम ठरवून दिले आहेत. सारांश मी दरवड्याचें आणि खुनाचें स्वरूप बदललें आहे.

चमत्कार—एका मुलीची अशी चमत्कारिक हकिकत सांगतात कीं, त्याला त्याचे कान जनावराप्रमाणें हालवितां येतात. ह्याप्रमाणेंच त्यास आपले केस वाटेल तेव्हां ताठ उभे करितां येतात. ही खरोखरी फारच अद्भुतशक्ती होय.

उपासमारामुळें अंधत्व— मुंबईंत आंधळ्या करितां जी शाळा आहे त्यांत हल्लीं १९ आंधळीं मुलें आहेत व त्यांस निरनिराळीं उपयुक्त कामें शिकविण्यांत येत आहेत. त्यांतील एक मुलगा एका तासांत १०० सुयांत दोरा ओवतो. तीं मुलें जन्मतः आंधळीं नव्हतीं. गेल्या दोन भयंकर दुष्काळांत उपासमार झाल्यामुळें तीं आंधळीं झालीं! त्यांपैकीं एक मुलगा मुंबईंत कामकाज पहाण्यास कांहीं दिवसांपूर्वीं आला. त्यावेळीं त्याचे डोळे त्यांनें काढलेल्या उपासांमुळें अशक्त झाले होते. त्यानें मुंबईच्या बंदरांत गोदीवर चाकरी धरली, परंतु एके दिवशीं त्याला सगळीकडे काळोख दिसूं लागला आणि त्याची दृष्टी कायमचीच गेली! भुकेचा अंमल नेत्रेंद्रियावर होऊन डोक्यांतील मेंदु कसा कायम राहिला ईश्वर जाणे, पण निदान या अभागी मुलांची तरी अशी स्थिती झाली खरी!

हिंदुस्थानचें दुर्दैव— हिंदुस्थानांत लागणाऱ्या बुद्ध, श्रीकृष्ण, शिव, गणेश यांच्या मूर्ती आजपर्यंत इंग्लंड व जर्मनी या देशांतून येत असत; परंतु तो व्यापार त्याचे हातांतून काढून फिलाडेल्फियाच्या अमेरिकन कारागिरांनीं आपल्याकडे घेतला असल्याचें कळतें.

जुन्या बाटलीची किंमत— १७८२ मध्यें स्थापन झालेल्या एका कंपनीच्या अगदीं पहिल्या प्रथम निघालेल्या एका सोडावाटरच्या बाटलीचा लिलाव झाला. त्याची २५॥ गिनी किंमत आली.

रत्नांगी विलासवती— अमेरिकेची रंगभूमि सुशोभित करणारी एक विलासवती नटी रत्नांच्या आंगठ्यांची मोठी भोक्ती आहे. तिच्या साऱ्या बोटांतून किती तरी हिरें माणकांच्या आंगठ्या चकचकत असतात. पण प्रत्येक हाताला देवाच्या कार्पण्यामुळें बोटें पडलीं पांच पांचच! या मुळें या शोकीनीनें तळहाताच्या पाठीवर साखळीच्या बंदांनीं रत्नखचित पदक घालण्याची टूम काढली आहे! एवढेंच नव्हे तर बोटांची नखें वाढवून त्यांना भोकें पाडून कानांतील डूल, बाळ्या वगैरे प्रमाणें जडावाच्या बाळ्या नखाला अडकवून लोंबत्या सोडण्यांत ती मोठा अभिमान बाळगते! हौस ती ही!

आरोग्यदृष्ट्या उपवासाचा उपयोगः— सर्व धर्मांमध्यें उपवास करण्यास सांगितलें आहे. त्याचें, धर्मदृष्ट्या, एक कारण असें कीं उपवासानें मनुष्याच्या विषयादि सुखाकडील वासना बलवत्तर न होतां त्याचेकडून पापाचरण घडूं नये. दुसरें कारण असें कीं, त्याचें आरोग्य राहण्यासही आपासून मदत होते पुष्कळ रोग होण्याचें कारण फाजील खाण्यामुळें झालेलें अजीर्ण होय. उपवास आठवड्यांतून एकदां अगर पंधरवड्यातून एकदां केला असतां हें अजीर्ण आपोआपच दूर होऊन आरोग्य बिघडत नाहीं, इतकेंच नव्हे, पण, कांहीं विकृति झाली असल्यासहि दूर होते. उपवास शक्य असल्यास निर्जळा करावा. अथवा त्या दिवशीं साबूदाणा, फळें इत्यादि अल्पाहार करावा.

विचित्र सृष्टी—गेल्या आठवड्यांत लेह येथे दोन ब्राह्मण स्त्रिया प्रसूत होऊन प्रत्येकीस एक एक मुलगा झाला. पैकीं एका मुलास गुह्येंद्रिय नाहीं इतकेंच नव्हे तर तशा प्रकारची आकृती किंवा खूण ह्या जागेवर कांहींच नाहीं—असें लागलींच समजून आल्यावरून येथील डाक्तराचे सल्यानें त्या मुलास तावडतोब पुण्यास रवाना केलें. तेथें चारपांच डाक्तरांनीं मिळून त्या जागीं ' आपरेशन ' ( नवें इंद्रिय ) करून मुलास दवाखान्यांत आपल्या देखरेखीखालीं ठेवून घेतलें आहे असें कळतें. दुसऱ्या मुलास एकच कान असून दुसऱ्या कानाच्या जागीं भोंक वगैरे कांहीं नसून फक्त त्या ठिकाणीं वर उचललेला असा कांहीं मांसल भाग आहे. सात आठ दिवसांपूर्वीं कोणा एखाद्या विचित्र ग्रहाचा असा कांहीं योग जुळून आला असल्यास फलज्योतिषांनीं त्याचा तपास लावून कळवावें!

योगाभ्यासी—मुंबई येथें एक योगाभ्यासी आला असून त्र्यंबकेश्वर समाचार छापखान्यांत त्यानें सर भालचंद्र कृष्ण वगैरे नामांकित मंडळीच्या समक्ष कांहीं चमत्कार करून दाखविले. प्राणायामानें तो जमिनीपासून तीन चार फूट अंधांत्री राहूं शकतो असें ह्मणतात.

द्राक्षवेलाची खुर्ची—कॅलिफोर्नियन माळ्यानें द्राक्षवेलाचें पोषण अशा रीतीनें केलें कीं, त्या वेलाची एक चांगली खुर्ची तयार झाली. मग त्यानें ती मुळापासून कापून वाळवून तीस चांगली साफसूफ करून रोगण दिलें. ही फार बळकट झाली असून तिचें वजन १०० पौंड आहे. हिची उंची ३ फूट ४ इंच व रुंदी २९ इंच आहे.

मुलानें शहाणपण शिकविलें— रशिया देशच्या सध्यांच्या बादशहाचा आजा तिसरा निकोलस हा घोड्यावर बसून मास्को शहराजवळील एका खेड्यांतून चालला असतां सहजगत्या त्याचे हातून त्याचा चाबूक खालीं पडला. आपणच खालीं उतरून तो उचलून घेण्याचा कंटाळा करून बादशहानें जवळच्या शेतांतील एका शेतकऱ्याच्या मुलास हांक मारून तो उचलून देण्यास सांगितलें. मुलगा बादशहाच्या जवळ आला व त्यानें धिटाईनें बादशहास " आपण कोण ? " ह्मणून विचारलें. बादशहास त्याच्या धिटाईचें आश्चर्य तर वाटलेंच, परंतु तसें कांहीं एक न दाखवितां त्यानें शांतपणें मी रशियाचा बादशहा निकोलस असें उत्तर दिलें. तेव्हां मुलगा पुन्हा मोठ्या गंभीरपणानें ह्मणतो, " आपल्या हातचा चाबूक जर आपणास नीट संभाळवेना, तर आपण इतकें मोठें राज्य कसें संभाळणार ? " बादशहास त्याच्या ह्या बोलण्याचा राग आला नाहीं, उलट कौतुकच वाटलें व राजधानींत जातांच त्यानें ह्या मुलास आपलेकडे बोलावून नेऊन त्याचे शिक्षणाची व्यवस्था केली. त्या मुलाची प्रवृत्ति चित्रकलेकडे होती. त्या कलेंत त्यानें फार प्राविण्य मिळविलें आणि आज तो फारच नामांकित असा रशियन चित्रकार आहे. त्याचें नांव ई वा सोवुस्की. या गोष्टी पासून पुष्कळच गोष्टी शिकण्या सारख्या आहेत.

गमतीची समज—भूकंपासंबंधानें मुसलमानांमध्यें अशी समजूत आहे कीं, पृथ्वी ही एका गाईच्या शिंगावर तोललेली असून मुसलमानीं नव्या वर्षाचे आरंभीं त्या शिंगास थोडासा विसावा देण्याकरितां ती दुसऱ्या शिंगावर घेते व त्यामुळें धरित्री हलते.

भयंकर साथ—पावाळिन बेटांत देवीची सांथ इतकी जोरानें उद्भवली आहे कीं माणसें मरणें व मेलें पुरणें यांचा मेळ ठेवणें कठीण पडूं लागलें आहे!

ढेकणांची चैन— जैन लोक कोणत्याही प्रकारची प्राणिहत्या करीत नाहींत हें सर्वांस मशहूर आहेच. सुरतेच्या कांहीं जैन रहिवाशांनीं आपापल्या घरांतील ढेंकूण पकडून ठेवले आहेत, यांची पोटापाण्याची तजवीज त्यांनीं अशी केली आहे कीं दोन तीन मनुष्यें त्यांचे साठीं मुद्दाम ठेवलीं असून त्यांस पुष्ट करण्यासाठीं त्यांस खुराक देण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. या मनुष्यांनीं आपल्या बिछान्यांत ढेंकणांची ही वसाहत ठेवून त्यांचे आपल्या शरीरावर पोषण करावें असा करार झाला आहे.

जंगी चित्र—दिल्ली येथील दरबारसंमारंभाचें एक जंगी चित्र कापडावर काढण्याचें ठरलें असून तें काम सिमला येथील मि० मॅंन्झी नांवाच्या गोऱ्या चितऱ्यास मिळेल असा 'पायोनिअरचा' अंदाज आहे! रविवर्म्यासारखे उत्कृष्ट इंडियन चितारी असतांना हें काम गोऱ्याकडे जावें हें इंडियन कारागिरीस उत्तेजन देण्याचा आव घालणाऱ्या लॉर्ड कर्झनसाहेबांस शोभतें काय?

चांगली फसवणूक—प्लेगमुळें बहादुरगंज येथील सर्व लोक बाहेर गेले. गांवांत एक श्रीमान महाजन राहिला होता. त्यास एका रात्रीं एक चमत्कारिक आकृति दिसली. त्यानें कोण आहे? असें विचारतांच त्या आकृतीनें उत्तर दिलें, ' मी प्लेगरोग आहे. तुला पैसा हवा असेल तर मी तुला पछाडणार. प्लेग नको असेल तर मला तुझी संपत्ती दे! हें ऐकून महाजनानें घाबरून आपला पैसा कोठें आहे तें दाखविलें. तेव्हां त्या आकृतीनें तेथील २० हजारांचा ऐवज घेऊन पोबारा केला! पण ही फसवणूक महाजनाचे पुढें लक्षांत येऊन त्यानें पोलिसास वर्दी दिली. नंतर तपास होऊन या संबंधानें ५।६ चौकीदार व पोलिस अटकेंत असून या लबाडींत एक पोलीस इन्स्पेक्टरही सांपडला आहे.

याचें नांव भक्ति— पंढरपुरास प्लेग सुरूं होण्यापूर्वीं पासून एक २० वर्षें वयाचा सोनाराचा मुलगा विठोबासमोर सतत भजन करीत आहे. त्याला तहान भूक किंवा शरीराचें भान नाहीं. ह्या मुलास प्लेगच्या २।४ गांठी आल्या होत्या पण त्या आपोआप नाहींशा झाल्या.

REGISTERED N. No.

आकोल्यातील लोकांस..................१ रु.
बाहेरगांवी टपालहाशिलांसह........ २ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका ........................ ०२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०१
दुसरे खेपेस.... ..... .....०१

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 18 MAY 1903 NO 19

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १८ माहे मे सन १९०३ इ० अंक १९

## NOTICE

Notice is hereby given under sec 44 (1) of the Berar Municipal Law to the inhabitants of Akola that this Municipality in its Special Meeting held on 21st April 1903 has proposed to imopse an octroi on the import of goods specified in the schedule attached hereto and that simultaneously with the introduction of the proposed tax the Grain Market cess in force, is intended to be abolished although weekly market fees will continue to be levied by way of rent for the use of the weekly market site.

Those whom it may concern to object to the above proposals are hereby invited to submit their objections in writing to the undersigned within 30 days from this day so as to enable this Municipality to consider them at a Special General Meeting to be held after the expiry of the period.

Akola 13—5—03

(Sd) *V. N. Dandekar*
Vice-Chairman
Akola Municipality.

*V. A. Kane*
Secretary
Akola Municipality.

### OCTROI RULES

*General*

1. The articles named in the Octroi schedule as liable to duty are liable to pay that duty wherever produced as soon as they enter the Octroi cordon as determined by the position of the out-posts save in cases where exemption is hereinafter allowed.

2. Octroi duty will be taken by Moharirs or other persons (hereinafter called the Octroi officers) in charge of the Octroi posts which are or may hereafter be established at such places as the Municipal Committee has determined or may from time to time determine provided that such posts shall not be beyond the Municipal limits. The officer charged with supervision of Octroi in the town is hereinafter called the "Octroi Darogah."

3. Every Octroi officer shall either wear a badge indicative of his office, or shall have with him ready to be displayed the order appointing him, which shall be under the signature of the Secretary of the Municipal Committee or any other person authorized in that behalf by the Municipal Committee.

4. Octroi duty on goods liable to such duty must be paid in Government currency. The Octroi officers shall not receive goods of any description either in payment of, or as security for the payment of duties leviable under the Octroi schedule.

5. A copy of the Octroi schedule printed or legibly written in Marathi together with a list ( to be corrected every Monday and dated and signed as correct by the Octroi Darogah ) of the prices of all articles liable to duty at *ad valorem* rates, shall be conspicuously exhibited in the out—side of every Octroi post. Such prices are to be fixed with reference to the cost price of the article to the importer and not with reference to its retail price in the local market. A set of scales and standard measures shall also be kept at every Octroi post.

6. *(a)* The person in charge of goods brought to an Octroi post will be required to state the description, quantity and value of the good in his charge.

*(b)* But any owner or consignee of goods, the value of which exceeds Rs. 20 may subject to such conditions as may with the sanction of the Commissioner from time to time be laid down by the Municipal Committee in that behalf, obtain a pass for them by presenting the invoice of such goods to the Octroi Darogah who having received the duty according to them on the schedule rates will grant a pass in the prescribed form. This pass will only protect such goods as have not broken bulk on the journey. If it is found that the goods have broken bulk, duty will be levied as if no such pass had been given but a refund of the duty originally levied may be obtained on application to the Darogah.

7. If the Octroi officer sees cause to challenge the declaration required by rule 6 (*a*) or the correspondence of the goods with the invoice on which the pass was granted he shall send the goods to the central Octroi office for examination by the Octroi Darogah If the Darogah finds that the amount or the value of the goods exceeds the declared amount or value he shall recover the extra duty payable and should the excess be more than 15 per cent, double duty, shall be realized for which a receipt shall be given. This rule will not prevent a criminal prosecution in any case in which it may appear desirable. The Darogah shall keep a separate register of the payment of such double duties and shall make a note of any cases in which the Octroi officers have vexatiously sent goods to the central office for examination.

8. If the Octroi officer is satisfied that the declaration required by rule 6 (*a*) is correct he shall proceed as follows:—

*(a)* In the case of goods brought to the post and not protected by an invoice pass, he shall inform the person in charge of them of the amount payable by him according to the schedule and demand payment, and on such payment being made grant a pass in the prescribed form.

*(b)* In the case of goods protected by an invoice pass, he shall on the surrender of such pass grant a fresh pass as above (*a*). The pass granted under this rule will be retained by the person in charge of the goods as a voucher for the duty having been paid.

9. There shall be placed at every post a box into which the Octroi officer shall drop the money or the invoice pass received together with the counter part of the pass granted under the last preceding rule. The key of the box will remain with the Octroi Darogah who will every day remove its contents or else the box will be taken every day to the central office there to be opened by the Darogah. The Octroi officer shall be bound to supply, the Octroi payer with such change upto the value of one rupee as may be required by him for the payment of the dues.

10 No goods liable to duty and not hereinafter exempted will be allowed to be brought, or to remain within the Octroi cordon without payment of duty, unless the person in charge of the goods declares himself unable or unwilling to pay the duty demanded. In such case the Octroi officer or farmer may detain a portion of his taxable goods sufficient to cover the amount provided the application for recovery of the said duties be made without delay to a Magistrate through the Secretary of the Municipality; otherwise the detention of goods will be at the risk of the tax—farmer or collector.

11. In any case, in which the owner of a load refuses to show its contents to a collector of town duties the latter shall have the power to detain the goods, and shall apply to a Magistrate forthwith, who may order such examination of the contents of the load as he may deem necessary for the proper assessment of duty.

12. The Octroi officers and any other officers empowered by the Municipality are authorized to inspect passes at any time after goods have passed the Octroi cordons and before they have arrived at their destination, and should the person in charge of the goods refuse to show the pass for the same, the goods will be liable to be removed to and detained at the central office till such time as it is known whether duty on them has been paid.

13. With the exception of goods classed under items 114 to 121 and 132 of the schedule, articles imported by Railway will pay duty by the maunds. Fractions of a maund if below 10 seers will be reckoned $\frac{1}{4}$th. if between 10 and 20, seers will be reckoned $\frac{1}{2}$, if between 20 and 30 seers will be reckoned $\frac{3}{4}$ths, and if above 30 seers will be reckoned full maund and charged accordingly.

14. Articles imported in the different kinds of conveyances shall be assessed, and the capacities of the different conveyances shall be determined as follows:—

15. The maximum limit of weight of a Gada including a cart drawn by 4 bullocks which is subject to the same rate, will be 32 (thirty two) British Indian maunds of 80 lbs. avoirdupois; the maximum limit of weight of an ordinary two bullock cart will be 16 British Indian maunds and the maximum limit of weight of a head—load will be 2 British Indian maunds.

16. One maund of load brought in a Gada or cart, or 20 seers of 80 tolas on a head load, where the rate is below 4 annas, and 10 seers where the rate is higher, will be exempted. Gadas and carts containing loads from 1 maund upto 8 and 4 maunds respectively will pay quarter rates, those containing loads from 8 and 4 maunds to 16 and 8 maunds respectively will pay half rates and those containing loads from 24 and 12 maunds to 32 and 16 maunds respectively will pay full rates. Gadas and carts containing weights over the maximum limits will pay an additional quarter rate for every additional 8 or 4 maunds or fractions thereof respectively. Head loads above 2 maunds in weight will be taxed by the maunds, fractions being calculated as at Railway stations. In case of head—loads, liable to a duty of 4 annas and above they shall be charged in fractions as below. Loads between 10 and 20 seers $\frac{1}{4}$ the full rate, those between 20 and 40 seers half the full rate, those above 40 seers, the full rate.

17, In case of mixed loads or packages, duty will be charged on the whole weight of every such load or package at the rate chargeable on each article.

18. The weight of the packing of the goods when not of mats or fabrics will be deducted from the total weight in assessing duty.

19. Articles imported by sea of the class of piece goods and metal and article made thereof which have paid customs duty, but are admissible to Municipal taxation, are not liable to Octroi exceeding $1\frac{1}{2}$ per cent *ad valorem*. All other articles imported by sea and which have paid customs duty shall be exempt from municipal octroi taxation.

20 The duty being leviable by the load, any person importing goods liable to Municipal taxation not exceeding $1\frac{1}{2}$ per cent, ad valorem, who may consider the octroi demanded to be in excess of such limit may claim to have his goods examined so as to adjust the octroi in accordance with the preceeding rules.

*Goods in transit and Refund Rules*

21 Persons importing goods in transit which enter the town and pass out of it intact within a week of their entering, shall deposit the amount of duty due on them at the in-going Octroi Naka and receive a receipt for the same. They shall present the receipt at the out-going Naka for endorsement as to the goods having passed out of the town intact, and present the endorsed receipt at the Municipal Office where on satisfying the municipal officers of the correctness of the endorsement etc, they will obtain refund of the amount of duty deposited by them.

22. Such goods if they stay in the town longer than a week shall be treated as imported goods for purposes of refund provided that the importer gives notice to the Octroi Darogah to the effect that the goods have remained in the town and gets his receipt endorsed to that effect.

23. Goods which pass out of the town within six months of the date of importation shall be entitled to refund of duty.

24. In cases in which the computed duty shall exceed two rupees the goods shall, on their way out, be brought to the Municipal Office for inspection and verification by the Secretary.

25. Refund of duty on goods which have to break bulk or undergo a change of form in the town shall be claimable provided the goods or the manufactured articles are brought to the Municipal Office for inspection by the Secretary or the Octroi Darogah, packed for export in his presence, and a certificate obtained from the out—going naka within 48 hours after packing, certifying the despatch of the articles in question out of the town.

26. In cases where goods are exported by railway the conditions imposed by the two last preceding rules 24 and 25 (of bringing the goods at the Municipal Office for inspection) shall be dispenced with, and the Railway invoice shall be accepted in lieu thereof as evidence of exportation.

27. All demands for refunds as above should be made within 4 days of the time of export and they should be supplied by the original receipts acknowledging payments of duty and the certificates of export mentioned above.

28 All Octroi receipts are transferable and they will change hands with the goods to which they appertain. Refund will be paid only to the party who actually exports the goods and produces the original receipt.

29. Receipts for Octroi duty shall be given to suit the convenience of traders in demanding refunds.

30. No refund shall be granted below eight annas. Where a consignment of imported goods is exported in parts the fractions above quarter maunds of the exported parts shall be carried forward to the last exported part and paid for. Fraction below a quarter maund at the last calculation shall receive no refund. Each item of export on which refund is claimed must be 'bona fide,' one consignment made by one man to one man at one place on one day, and must form part of one imported consignment. Each receipt granted for duty, received at importation of goods shall, for this purpose, be reckoned as one consignment.

31. Rules 21 to 30 (both inclusive) shall be translated into Marathi and circulated in the Bazar and in the Cotton Market; a copy shall be affixed in a prominent place at the central Octroi office and at each of the Octroi posts.

32. Goods brought by railway will be held to have entered the Octroi cordon directly; they pass beyond the railway station enclosure, and they then become liable to duty in the same manner as goods brought by road.

33 (a) The addressees, to whom this rule applies, of parcels arriving by railway, are required to declare the description of goods received in such parcels and their value, and to pay the duty thereon under penalty of being considered to have evaded the tax. Printed forms of declaration may be obtained on application to the Secretary or the Octroi officer in charge of the Railway station post.

(b) If either the contents or their value are not known to the addressee the parcel may be taken away by the person in charge of it on depositing 8 annas (for which a receipt will be granted), with the Octroi officer of the Railway Octroi post. If subsequently the parcel is found not be subject to duty, a refund will be granted on the production of the receipt at the post whence it was issued. If the duty exceeds 8 annas the consignee shall under the penalty of being considered to have evaded the duty send the excess to the post along with the receipt granted, when a fresh receipt for the proper duty charged will be issued in place of the original receipts, which will be retained by the Octroi officer.

The benefit of this rule shall be allowed to such person as the Municipal Committee decide. It shall not ordinarly be allowed to any person trading in articles subject to duty.

*General Exemptions*

34. Goods the property in which is vested in Government at the time they pass the Octroi cordon and which are intended for the use of Government, shall pass free if accompanied by an invoice with the endorsement of the proper Government officer certifying that they are the property of Government and intended for Government use. Articles intended for sale to the public are not exempted merely because they are the property of Government at time of importation.

35. Goods property in which is not vested in Government at the time they pass the barrier, but which being imported with a view to the fulfilment of a Government contract, or otherwise intended for the use of Government will, in the ordinary course of things, become the property of Government after importation, shall on passing the barrier be declared as intended for the use of Government e. g. in fulfilment of a certain (specified) contract. The duty on them shall be paid, and subsequently if they actually do become the property of Government the duty shall be refunded on a certificate to that effect signed by the Departmental officer concerned.

36 Duty shall not be levied at the time of import on articles imported for manufacturing purposes into the jail. The manufactures [illegible] sold by such jail [illegible] however, be taxed. [illegible] close of each month, the Superintendent of the aforesaid jail shall forward to the Municipal Committee a statement showing the amount of dutiable raw material used in the articles sold to the public during the month and shall send the amount of town duty leviable thereon. Such manufactures as are used in the jail or supplied to jails or Departments of Government are exempted from taxation.

37. No octroi duty shall be levied on any of the following commodities viz:—

(a) Salt;

(b) Opium;

(c) Fermented or spirituous liquors manufactured in India, and drugs liable to excise or Abkari duty.

(d) Bona fide passenger luggage, as also articles intended for private or personal use, which may have been in use before being brought into the town.

*Trade Registration Rules*

38. Such articles as are not liable to octroi duty on importation in the town under the above rules and the Octroi schedule shall be liable to a trade registration fee.

39. No refund shall be granted of such trade registration fee if the goods are exported out of the town.

40. The rate of the trade registration fee shall be ½ pie in the rupee of the value of all articles imported but are not liable to ordinary Octroi duty and where such value is not ascertainable ½ anna per maund of the weight of such articles, shall be charged,

41 No charge shall be made on articles the computed duty on which at the above rate may fall short of three pies.

42. Importers shall be bound to state the correct value of their imported articles for assessment of trade registration fee. Where such information may not be obtainable, or where it is refused or where it may be doubted by the tax collector, the charge shall be levied at the alternative rate of ½ anna per maund.

43. The Municipal Committee, shall from time to time prescribe the forms referred to in the aforesaid rules.

44. Any infringement or evasion of the aforesaid rules will be liable to punishment under section of the Berar Municipal Law.

( To be continued )

## वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य ७ शके १८२५

वऱ्हाड प्रांताचा अर्वाचीन इतिहास मोठा विलक्षण आहे. यांत ब्रिटिश मुत्सद्दीपणा उत्कृष्टपणें निदर्शनास येतो. धुरंधर मुत्सद्दीपणा आपण ज्याला ह्मणतो तो सामान्य व्यवहारामध्यें प्रामाणिकपणाच्या कसोटीला बरोबर उतरणार नाहीं. पण आपल्या इष्ट कार्याची कांस कधींच न सोडण्याची मोठी शिताफी यांतच दिसते. सतत पन्नास वर्षे या प्रांताचा कारभार आपल्या हातांत असल्यामुळे ब्रिटिश सरकारास याचा स्वाभाविकच मोठा मोह पडला; आणि आपोआपच राज्यतृष्णेच्या लोभामुळें हा प्रांत कायमच्या कोलपट्यानें ब्रिटिश सरकाराकडेस आला. ही राजकीय क्रांती ब्रिटिश सरकारास तर समाधानकारक आहेच तशीच पाहो सैन्यराशीच्या दृष्टीनें या प्रांताच्या लोकांसही ती सुखकर होईल अशी आह्मी आशा करितो.

बराबरच्या पाहुण्याच्यास वाटेल कीं निजाम सरकारांनीं हा प्रांत आपल्या राजीखुषीनें इंग्रजाकडेस बहिवाटीला दिला; आणि ह्मणूनच सार्वभौम सरकारचे प्रतिनिधी लार्ड कर्झन साहेब निजाम सरकाराचे परोपरीनें गोडवे गात आहेत. परंतु वस्तुस्थिति प्रकार निराळाच दिसत आहे. मि. ग्रिवल साहेब यांनीं या बाबदींत एक सुंदर लेख लिहिला आहे त्यांत ते ह्मणतात कीं, १९०२ च्या एप्रिल महिन्यांत लार्ड कर्झन हे हैदराबाद संस्थानांत गेले होते, तेव्हांच सांप्रतच्या कोलपट्या विषयीं बोलणें पक्कें झालें. लार्ड कर्झन साहेब शिकारीला जाणार होते तेव्हां निजाम सरकारांनीं प्रांत घेण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. पण व्हाईसराय साहेबांनीं नकार केला आणि निक्षून नवाब सांगितला. मग अर्थातच निजाम सरकार निरुत्तर झाले, आणि कोलपट्याला रुकार देण्या शिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं असें दिसलें तेव्हांच त्यांनीं लुळमाच्या खुषीनें तोंडानें हो ह्मटलें. लागलीच संध्याकाळच्या मेजवानीचा प्रसंग साधून लार्ड कर्झन यांनीं निजामाचा मोठा धन्यवाद केला कीं ते तोंडानें जे ह्मणतील ते अगदीं खरें केल्या शिवाय राहणार नाहींत. येणें प्रमाणे या प्रांताची शिकार चांगलीच साधण्यांत आली. आज पुष्कळ वर्षे निजाम सरकार हा प्रांत परत मागत होते पण शेवटीं काळचक्रामुळें त्यांस तोच प्रांत कायमचा देऊन टाकावा लागला. पहा, सार्वभौम सरकारची इच्छा कशी बळवत्तर असते. ती येणें प्रमाणें लावणीवर पत्र टाकून आणि कोठें धरसोड, कोठें पुरा पिच्छा व कोठें प्रशंसा इत्यादि राजनितीच्या विविध अंगाचें अवलंबन करून हा प्रांत एकदांचा ब्रिटिश सत्ते खालीं घातला.

मि. ग्रिवल साहेब ह्मणतात कीं; कोलपट्याच्या शर्ती देखील सार्वभौम सरकारास अनुकूल अशाच निश्चित करण्यांत आल्या. ते तर ह्मणतात कीं दरसाल २५ लक्ष रुपये देण्याची कबुली केली आहे तिजमध्यें देखील निजाम सरकाराचा फारच फार तोटा झालेला आहे. हा कोलपट्टा दिवाणी कोर्टापुढें येण्यास हरकत नाहीं व तो येईल तर तो रद्द होण्या सारखाच आहे. हेंही जो सारा वाढला आहे तोच फार मोठा आहे आणि २५ लक्ष रुपये ह्मणजे उत्पन्नाच्या मानानें रक्कम फारच लहान आहे. निजाम सरकारनीं निदान ५० लक्ष घेतल्या शिवाय स्वस्थ राहूं नये. वगैरे. येणें प्रमाणें या प्रांताचा इतिहास ह्मणजे ब्रिटिश सरकाराच्या राजनीतीचा मोठाच चिरा होय।

हा प्रांत निजाम सरकाराचा जर अजून खरोखर आहे तर लोकांवर इनकम-टॅक्स बसविण्याचा येऊं नये. परंतु आह्मी तर कर्णोपकर्णी ऐकतों कीं या कराची आकारणी लवकरच अमलांत येईल. त्या शिवाय सध्या लोकांचीं मनें नवीन राज्यव्यवस्थेकडे लागलीं आहेत. ईश्वर करो आणि नवी कारभार सुखद होवो।

## The Berar Samachar

MONDAY MAY 18 1903

The munificient gift of 30 lacs of Rupees which Mr. J. N. Tata promised towards establishing a Re-search Institute in India is well nigh within the grateful memory of this vast nation. Mr. Tata's beneficience did not run in the usual channels which meet with official encouragement. For these six years the proposal of a Research Institute was before the government of India. It was rather shelved in the pigeon holes of the Home—Office. Mr. Tata's scheme was most original and required the unstinted support of the Government of India with regard to its actual fruition. The long period of waiting for the support of the government was after all over and procrastination was no longer found to be a virtue in the policy of Lord Curzon. It is a pleasure to note that Lord Curzon had at last taken up the subject in right earnestness. And we hope that Mr. Tata will not now have the chance of transfering his rare gift to some other educational trust. Otherwise he was tired of

indefinite delays and in the midst of a great disappointment comes a ray of hope that the Government of India do intend to give a practical turn to Mr. Tata's scheme. The Mysore Darbar intends to raise its contribution to 50,000 Rs. The Government have now come forth with the offer of one lac of Rupees for the construction of the building. Lord Curzon has further expressed a hope to the Bombay Government that the government will help the Institute with a grant that will cover the one third of the current annual expenditure. The maximum limit of this grant is, however, fixed at £ 5000. These are big grants, no doubt, but they sink into utter insignificance when we compare them with the rare beneficience of 30 lacs of a private individual coupled with a smaller gift of some five or six lacs from the treasury of the Mysore Darbar. The Government grant does not speak well of the liberality of the Government and it is certainly a very low gift in view of the magnitude of the grand educational purpose which the Research Institute means to advance. It is however solacing to find that Lord Curzon intends to move in the matter and we earnestly hope that before the close of His Excellency's Indian career we shall have seen some solid foundations laid down for the Research Institute.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— उन्हाळा पुष्कळसा कमी वाटतो. वारा सोसाट्याचा सुटतो ऋतुमानांत विशेष फरक दिसतो. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं पण दोषिक ज्वराचा उद्भव पुनः होत आहेसें दिसतें.

मे० रुस्तुमजी फर्दूनजी साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी नरनाळ्यास आहे.

मृगजळाचे उत्कृष्ट देखावे हल्लीं दिवसा दोन प्रहरीं मोकळ्या मैदानांत पुष्कळ दिसतात. समुद्राच्या सारख्या लाटा दिसून त्या मध्यें झाडें वगैरे तरंगतीं दिसतात. हा चमत्कार मृगालाच काय पण मनुष्यालाही मोह पाडतो!

आम्हांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. विनायक आप्पाजी काळे, पेनशनर तहशिलदार यांस परवा शनिवारीं देवाज्ञा झाली. त्यांची प्रकृति चांगली सदृढ होती. इतक्या लवकर यांचा अंत होईल असें वाटलें नव्हतें पण विषमज्वरामुळें देहावसान झालें. आकोटास तहशिलदार असतांना यांनीं पेनशन घेतलें. हे चांगले लोकप्रिय व मनमिळाऊ तहशिलदार होते. पेनशनीच्या काळांत हे येथील मुनसिपालिटीच्या सेक्रेटरीचें काम फार आस्थेनें व चोखपणानें करीत असत. त्यांचा स्वभाव गोडीगुलाबीचा होता. मराठी वाङ्मयाचा यांनीं चांगला व्यासंग केला होता. हे काव्याचे मार्मिक व सहृदय वाचक होते. अलिकडे यांनीं आमच्या पत्रांत पुष्कळसे लेख लिहिले आहेत. यां वरून त्यांच्या गुणांची वाचकांची पारख होईल. ईश्वर त्यास सद्गती

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ६९ |
| ज्वारी ४९।१० | जवस १०३ |
| गहू | ९ ते १ |
| बाजरी | ५९ |
| मीठ | ३८=॥ रु. मण |
| चणे | ३॥= रु. मण |
| तूप | ७॥रु. मण |
| तेल | ६।= रु. मण |
| रुई | १२।१३ |

## NOTICE

—:•*•:—

All persons are, hereby, informed that if they do not attend in person or by Agent all copies will be sent to them by Value Payable post, provided that they give their full and correct address in the application for copy. Dated 11th. May 1903. District Wun.

(Sd.) NIZAMUDDIN
Deputy Commissioner
Yeotmal.

## नोटीस.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, जे कोणी स्वतः अगर मुखत्यार मार्फत हजर होणार नाहींत त्यांच्या नकला त्यांना व्ही. पी. नें पाठविल्या जातील. मात्र अर्जदारानें नकल करितां दिलेल्या अर्जांत आपला पूर्ण आणि बरोबर पत्ता दिला पाहिजे. ता. ११।५।०३ इ. जिल्हा वणी

सही
निजामुद्दीन
डेप्युटी कमिशनर
यवतमाळ जि. वणी.

### नोटीस.

नोटीस बेशमी शाती रूखबसा व सिताराम विठोबा राहणार वाढोन तालुके मुर्तिजापूर जि. उमरावती यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचे पिंजर येथील शेत सर्वे नंबर २१९ एकर ३३८९ गुंठे आकार १८०५०३ हे शेत आम्ही तुमचे पासून सुमारें २ वर्षे झाले विकत घेतले आहे ते शेत ३०० तीनशें रुपयांस देण्याचे ठरले म्हणून आम्ही तुमचा आमचा सवदा पक्का झाल्याबरोबर ५० रुपये इशारा खातर दिले व तुमचे वहीत जमाहि आहेत. ते शेत आमचे नांवे करून देण्यास म्हटलें असतां करून देतो परंतु अद्याप पावेतों नांव करून दिले नाहीं. करितां मुदान नोटिशीनें कळवितों कीं शेत साल्याबद्दल १८८१८३ व. इसाऱ्याबद्दल दिलेले ५० रुपये मिळून ६८८१८३ हे ३०० रुपयांतून वजा जातां बाकी राहिलेले रुपये २३१८१०८९ हे घेऊन आमचे नावे शेत करून द्यावे. असें नोटीस पावल्यापासून एक महिन्यानें न केल्यास आम्ही रीतशीर कोर्टात फिर्याद करून शेत नांवे करून घेऊं व कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च तुम्हा पासून मजरा घेऊं. म्हणून अगाऊ सूचना केली आहे. कळावें.

सही
नागो वल्लद सोनबा सोनार
राहणार पिंजर द. खु.

### नोटीस.

नोटीस बेशमी तुकाराम वल्लद राघोजी माळी राहणार कसबे आडगांव यांस.

खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मी जानी मर्द जानजी व गंगु मर्द नथाजी माळी राहणार अडगांव यांचे पासून तारीख २।३।१।०३ इ. रोजीं १०० रुपयाला माझे गायवाड्याचे दक्षिणकडची जागा खरेदी घेतली आहे ती जागा जानी व गंगु इजला ताब्यांत मागीतली असतां तुम्ही ताबा देण्यास हरकत करितां सदर्हू जागेवर तुमचा मुळींच हक्क नसून त्या जागेवर तुमचा इमारत बसविण्याचा विचार आहे करितां नोटिशीनें कळवितों कीं, सदर्हू जागा १५ दिवसांचे आंत आमचे ताब्यांत द्यावी त्या जागेवर तुम्ही कोणतेही तऱ्हेचें इमारतीचे काम करूं नये. ती जागा कराराचे आंत आमचे ताब्यांत न दिल्यास त्याबद्दल दिवाणीत दावा करून खर्चासुद्धां व नोटिशीचे खर्चा सुद्धा रुपये घेतले जातील. व तुम्ही इमारत बसविल्यास त्या संबंधानें मुळींच तक्रार ऐकली जाणार नाहीं. म्हणून नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. तारीख १४ मे ०३ इ. सही

काशिनाथ आपा शंकरआपा वाणी
राहणार अडगांव द. खु.

### नोटीस.

नोटीस बेशमी गोपाळपुरी अवधूतपुरी गोसावी राहणार अकोलें यांस.

या लेखानें खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यात येतें कीं, तुम्ही ६।५।०३ इ. रोजींची दिलेली नोटीस व जाहिरात पावली ती जागा माझी वडिलोपार्जित आहे. तिच्या वर [illegible] न याशिवा य मी कर्जवगैरेची फड करून सरदीनें मालकीणही आहे. या जागेवर तुमचा काहीं हक्क संबंध नाहीं. तुम्ही विनाकारण नोटीस देऊन आम्हाला खर्चांत व त्रासात आणिलें. माझ्या जागेची मी पूर्ण मालकीण आहे व मी तिची वाटेल ती व्यवस्था करीन. या नोटिशीचा खर्च तुम्ही आठ दिवसांत आणून द्यावा. तसें न केल्यास कोर्ट मार्फत सव्याज रकम वसूल केली जाईल. कळावें. ता. १६ माहे मे सन १९०३ इ. सही.

तानी मर्द संभुगीर गोसावी राहणार
अकोलें द. खु.


## खरेदी करा !

## रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

## नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हें वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस [illegible] वर्णे लिहिलीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस किरत्या झांकणाचें ....................१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ....................२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन-एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह....................२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ....................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें....................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

### इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस....................२०
१९ ,, हंटिग....................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे,

१४ लाईन रिस्ट वॉच ....................३०
१४ ,, हंटिंग....................३५
१८ व १९ ,, ओपनफेस....................३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ....................३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ....................३६
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे
सोल एजंट.

## जाहिरखबर.

वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याच्या ४४ (१) कलमा अन्वयें आकोल्याच्या रहिवाश्यांस नोटीस देण्यांत येते कीं, ह्या म्युनिसिपालिटीनें तारीख २१ एप्रील १९०३ च्या स्पेशल मिटिंगमध्यें सोबत जोडलेल्या परिशिष्टान्वये ऑक्ट्रॉय ह्मणजे आयात मालावर कर बसविण्याचें योजिलें आहे. तसेंच सध्यां अमलांत असलेला ग्रेन मार्केट सेस (धान्य बाजारचा कर) हा ऑक्ट्रॉय बसविल्यावर उठविण्याचे योजिलें आहे व आठवडे बाजारच्या करा ऐवजी अठवडे बाजारांतील जागा वापरल्या बद्दल जागेचें भाडें घेण्यात येईल.

ज्या कोणास या विरुद्ध तक्रार करणें असेल त्यांनीं आपल्या तक्रारी खालीं सही करणार यांजकडेस आज पासून तीस दिवसाच्या आंत लेखी पाठवाव्या, ह्मणजे ही मुदत संपल्यावर स्पेशल जनरल मिटिंग पुढें त्या तक्रारीचा विचार ह्या कमिटीस करितां येईल. ता. १३ मे १९०३

(Sd) V. N Dandekar.
Vice— Chairman
Akola Municipality.

V. A. Kane
Secretary
M. C. Akola

---

## ऑक्ट्राय कर वसूल करण्याचे नियम.

(सामान्य नियम)

१ ह्या सोबत जोडलेल्या पत्रकांत नमूद केलेला माल, कोठेही तयार झाला असला तरी शहरा बाहेरील नाक्यावर निर्दिष्ट केलेल्या [illegible] हद्दीच्या आंत तो आला [illegible] प्रत्येक मालाच्या नांवा समोर सदरहू पत्रकांत लिहिलेल्या दरा प्रमाणें अनुक्रमें कर वसूल करण्यात येईल मात्र ज्या मालावर [illegible] कर माफ करण्यांत येईल. असें पुढें ह्मटलें आहे त्यावर कर घेतला जाणार नाहीं.

२ म्युनिसिपल कमिटीनें आक्ट्राय कर वसूल करण्यासाठीं जीं नाकीं हल्लीं मुकरर केलीं आहेत किंवा या पुढें वेळोंवेळीं जीं नाकीं केलीं जातील त्या ठिकाणावर म्युनिसिपल कमिटीनें त्या कामासाठीं नेमलेले मोहरीर किंवा इतर इसम (ज्यांना आक्ट्राय कर वसूल करणार अधिकारी असें नांव या पुढें देण्यात, आलें आहे) हा कर वसूल करितील. मात्र अशीं नाकीं म्युनिसिपल कमिटीच्या हदी बाहेर ठेविलीं जाणार नाहींत-हा कर वसूल करण्या संबंधाची सर्व देखरेख ज्या अधिकाऱ्याकडे सोपविण्यात येईल त्याला आक्ट्राय दरोगा अशी संज्ञा या पुढें देण्यात आली आहे.

३ आक्ट्राय कर वसूल करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यानें त्याला ज्या कामावर नेमिलें आहे तें दर्शविणारा बिल्ला वापरावा, किंवा ज्या हुकुमावरून त्याची सदरहू कामावर नेमणूक करण्यात आली आहे, तो हुकूम म्युनिसिपल सेक्रेटरी किंवा हें काम ज्याकडे सोंपविलें आहे असा म्युनिसिपल अधिकारी यांच्या सहीचा पाहिजे. आणि वाटेल त्या वेळेस दाखवितां येईल अशा तयारीनें तो बिल्ला आपल्या जवळ ठेवावा.

४ मालावर ऑक्ट्रॉय कर द्यावयाचा तो ब्रिटिश इंडियांत चालूं असलेल्या सरकारी नाण्याच्या रूपानें दिला पाहिजे. ऑक्ट्राय कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं कराच्या रकमे ऐवजीं किंवा सदरहू रकमे करितां तारण ह्मणून कोणत्याही प्रकारचा माल घेऊं नये.

५ ज्या मालावर ऑक्ट्राय कर वसूल करण्यांत येतो तो दाखविणाऱ्या पत्रकाची एक प्रत व त्याचप्रमाणें ज्या मालावर मालाच्या किंमतीच्या मानानें कर वसूल करण्यांत येतो त्या मालाच्या किंमती दाखविणाऱ्या पत्रकाची एक प्रत (सदरहू प्रत दर सोमवारीं दुरुस्त करून तिच्यावर ती दुरुस्त केली असल्या बद्दल ऑक्ट्राय दरोग्याची सही असली पाहिजे) अशा मराठींत दोन प्रती छापलेल्या अगर स्वच्छ अक्षरांनीं लिहिलेल्या प्रत्येक नाक्यां वर बाहेरच्या बाजूस फळीवर चिकटवून ठेविल्या पाहिजेत. किंमतीच्या मानानें ज्या मालावर कर वसूल करावयाचा त्याची किंमत शहरांत आणूं इच्छिणाऱ्या इसमास जी मूळ किंमत पडत असेल त्या मानानें ठरवावयाची. गावांत किरकोळ मालाला जी किंमत पडते तिच्या मानानें सदरहू किंमत ठरवावयाची नाहीं. त्याचप्रमाणें मालाचें वजन करण्यासाठीं कांटा व ठरीव वजनें व मापें हीं प्रत्येक नाक्या वर ठेवण्यांत येतील.

६ (अ) नाक्यावर गावांत माल आणणाऱ्या प्रत्येक इसमानें आपल्या मालाचें वर्णन, वजन व किंमत हीं सांगितलीं पाहिजे.

(ब) परंतु शहरात जो माल आणावयाचा त्याची किंमत वीस रुपयाहून अधिक असेल तर त्या मालाच्या मालकानें किंवा तो माल ज्याच्या नांवानें परगांवाहून पाठविण्यात आला आहे त्या इसमानें (ह्या बाबतींत मे० कमिशनर साहेब प्रांत वऱ्हाड यांच्या अनुमतानें म्युनिसिपल कमिटी वेळोवेळीं ज्या शर्ती ठरवील त्या वर हुकूम) त्या मालाबद्दलचें बिजक ऑक्ट्राय दरोग्यास दाखवून त्या बिजका प्रमाणें आपल्या मालाबद्दल कर द्यावा व त्याप्रमाणें कर दिल्याबद्दल ठरीव नमुन्याप्रमाणें सदरहू दरोग्यापासून पास घ्यावा याप्रमाणें पास घेतला असतां तो माल वाटेत जशाचा तसाच न फुटता आला असेल तर त्या मालावर मात्र पुन्हां कर द्यावा लागणार नाहीं. परंतु बिजकांत दर्शविलेल्या मालाची गांठ वाटेत फोडून पुन्हा नवी गाठ बांधली आहे असें दृष्टोत्पत्तीस आल्यास त्या माला करितां पूर्वीं पास दिला गेला नाहीं असें समजून इतर माला प्रमाणें पुन्हा त्यावर आकारणी करण्यांत येईल.

७ कलम ६ [अ] यांत दर्शविलेल्या प्रमाणें दिलेली माहिती खोटी आहे किंवा ज्या बिजकावरून वर कलम ६ (ब) यांत दर्शविल्या प्रमाणें पूर्वीं पास दिला गेला आहे त्या बिजकांतील मालाच्या वर्णनाशीं जो माल गांवांत नेण्या करितां आणिला आहे त्याचें वर्णन जुळत नाहीं, अशी शंका नाक्यावरील ऑक्ट्राय आफिसर यास आली असतां त्यानें तो ऑक्ट्राय दरोग्याच्या मुख्य आफिसांत तपास करण्या करितां पाठवून द्यावा. जर दरोग्यास असें आढळून आलें कीं मालाचें वजन किंवा किंमत ही बिजकांत दाखविलेल्या वजनापेक्षां किंवा किंमती पेक्षां अधीक असतील तर योग्य कर अधिक वसूल करावा वरच्या प्रमाणें जास्त वसूल केलेली रकम [illegible] १५ पेक्षां जास्त असेल तर त्या इसमाकडून दुप्पट कर घेऊन त्या बद्दल पावती द्यावी. या नियमानें त्या इसमावर जरूरी वाटल्यास फौजदारी खटला करण्यास कोणत्याही रीतीनें बाध येणार नाहीं. याप्रमाणे दुप्पट कर वसूल करण्यात येईल. त्याचें स्वतंत्र रजिष्टर मुख्य आफिसांतील दरोग्यानें ठेवावें व त्याचप्रमाणें नाक्यावरील अधिकाऱ्यांनीं निवळ खोडसाळपणा करण्या च्या हेतूनें माल तपासण्याकरितां मुख्य आफिसांत पाठविला आहे असें दरोग्यास आढळून येईल तेव्हां त्याचें टिपण सदरहू दरोग्यानें ठेवावें.

८ कलम ६ (अ) यांत सांगितल्या प्रमाणें दिलेली माहिती बरोबर आहे असें ऑक्ट्राय कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांची खात्री झाली ह्मणजे त्यानें पुढें लिहिल्या प्रमाणें काम करावें.

(अ) नाक्यावर जो माल आला आहे त्याजबद्दल वर कलम ६ [ब] यांत सांगितल्याप्रमाणें बिजकावरहुकूम पास दिलेला नसेल तर सदरहू अधिकाऱ्यानें ऑक्ट्राय पत्रकांत दर्शविल्या प्रमाणें कराची आकारणी करून माल घेऊन येणार इसमास ती रकम मागावी व त्याप्रमाणें रकम दिली ह्मणजे ठरीव नमुन्या प्रमाणें त्यास पास द्यावा.

(ब) ज्या मालाबद्दल वर कलम ६ (ब) यांत दर्शविल्याप्रमाणें बिजका वर हुकूम पास दिला असल्यामुळें त्या मालावर पुन्हा आकारणी करण्याची जरूर नाहीं. तेव्हां ऑक्ट्राय कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यानें पूर्वी बिजका वर हुकूम दिलेला पास परत घेऊन त्या ऐवजी वर कलम ८ (अ) यांत सांगित ल्या प्रमाणें नवीन पास द्यावा. ज्या इसमानें माल गावांत आणिला असेल त्यानें या कलमा अन्वयें मिळालेला पास आपण दिलेल्या रकमेच्या पावती दाखल ठेवावा.

९ प्रत्येक नाक्यावर एक पेटी ठेवण्यात येईल, त्या पेटींत कर वसूल करणारे अधिकाऱ्यानें वसूल झालेला पैसा किंवा बिजक, पास व मागच्या नियमा प्रमाणें दिलेल्या पासाची स्थळ प्रतहि टाकीत जावी. या पेटीची किल्ली आक्ट्राय दरोग्यापाशीं राहात जाईल. सदरहू पेटींतील पैसा व पास ही दरोग्याने रोजचे रोज घेऊन अथवा सदरहू पेटी दररोज मुख्य ऑफिसांत पाठविली जाऊन तेथें ती दरोग्याने उघडीत जावी. कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यानें कर देणाऱ्या इसमास एक रुपया पर्यंत मोड दिली पाहिजे.

१० माफ केलेल्या माला शिवाय दिलेल्या नियमांत करास पात्र असा इतर कोणताही माल कर वसूल झाल्या शिवाय शहरच्या हद्दींत येऊं द्यावयाचा नाहीं किंवा तो आल्यास तेथें राहूं द्यावयाचा नाहीं पण माल आणणाऱ्या इसमानें कर देण्याची आपली ऐपत किंवा इच्छा नाहीं असें सांगितल्यास कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यानें कराच्या रकमेच्या वसूला पुरता त्या मालांतील भाग अडकवून (हबप) ठेवावा. कराची रकम वसूल करण्याबद्दल मात्र त्यानें तावडतोब म्युनिसिपल सेक्रेटरीचे मार्फत एखाद्या माजिस्ट्रेट साहेबाकडे अर्ज करावा. या प्रमाणें तजवीज न केल्यास माल अडकविण्याची जोखीम त्या अधिकाऱ्याच्या शिरावर राहील.

११ माल आणणारा इसम गाडींत काय आहे हें कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यास दाखविण्याचे नाकारील तेव्हां सदरहू अधिकाऱ्यांस तो माल अडकाविण्याचा अधिकार आहे मात्र त्यानें त्याप्रमाणें माल अडकविण्याची वर्दी माजिस्ट्रेट साहेबास तावडतोब द्यावी ह्मणजे कराची योग्य आकारणी करण्यासाठीं सदरहू गाडींतील माल तपासण्या करितां ते योग्य हुकूम देतील.

१२ कर वसूल करणारे अधिकारी व ज्यांना म्युनिसिपालिटीनें असा अधिकार दिला आहे असे इतर अधिकारी यांना माल नाक्या वरून गावांत आल्या नंतर तो आपल्या ठिकाणास पोहोंचे पर्यंत केव्हांही त्याबद्दलचा पास तपासण्याचा अधिकार आहे. माला बरोबर इसम आपल्या माला बद्दलचा पास दाखविण्याचे नाकारील तर सदरहू माल मुख्य ऑफिसांत नेऊन तेथें त्या बद्दल कर दिला गेला आहे याची चौकशी होई पर्यंत जरूर वाटल्यास तो अडकविण्यांत येईल.

१३ सोबतच्या ऑक्ट्राय पत्रकांतील नंबर ११४ पासून १२१ पावेतों व १३२ नंबरांत दर्शविलेला माल खेरीज करून बाकीचा माल रेलवे मार्गानें आला असल्यास त्यावर मणानें कर आकारण्यांत येईल एका मणाचे आंत माल असल्यास दाहा शेराचे आंत तो भरल्यास $\frac{1}{4}$ मण आहे असें समजलें जाईल, १० व २० चे दरम्यान असल्यास तो $\frac{1}{2}$ मण आहे असें समजण्यांत येईल. व २० आणि ३० शेराचे दरम्यान असल्यास तो $\frac{3}{4}$ मण आहे असें समजण्यांत येईल व ३० शेरांचे वर एक मण पावेतो वजन असल्यास तो एक मण आहे असें समजण्यांत येईल व त्या प्रमाणें कर आकारण्यांत येईल.

१४ निरनिराळ्या वाहनांतून माल आला असल्यास त्याचें मान खालीं लिहिल्या प्रमाणें समजण्यात येईल.

१५ चार बैलांची गाडी किंवा गाडा यांतून येणाऱ्या मालाचे वजनाचें मान सर्वांत जास्त ह्मटलें ह्मणजे ८० आणि पाईस पौंडाचा एक मण या मानानें ब्रिटिश इंडियन ३२ मण होय. साध्या दोन बैलाच्या गाडींतील मालाच्या वजनाचें मान सर्वांत जास्त झालें ह्मणजे १६ ब्रिटिश इंडियन मण होय. व मनुष्यांच्या डोक्या वरील ओझ्याचे वजनाचे सर्वात जास्त मान २ ब्रिटिश इंडियन मण होय.

१६ गाडा किंवा गाडी यांतून आणलेल्या मालाचें वजन १ मण असल्यास तो माल किंवा डोक्या वरून आणलेल्या मालाचें वजन मालावरील कराचा दर ४४ आण्यांहून कमी असल्यास ८० तोळ्यांचा एक शेर या मानानें २० शेर असल्यास तो माल व जेथें मालावरील कर चार आणे किंवा वर आहे अशा वेळीं डोक्यावरून आणलेल्या मालाचे वजन १० शेर असल्यास तो माल माफ समजला जाईल ह्मणजे त्या मालावर कर घेतला जाणार नाहीं. गाडा व गाडी यांतून आणलेल्या मालाचें वजन एक मणा पासून अनुक्रमें ८ व ४ मणांचे आंत असल्यास त्या मालाबद्दल $\frac{1}{4}$ कर द्यावा लागेल त्याच प्रमाणें यांतील वजन अनुक्रमें ८ व चार मणा पासून १६ व ८ मणा पावेतो [illegible] ल्यास त्या माला बद्दल [illegible]

आदळून आल्यास त्या मालाबद्दलची पावती रेल्वे स्टेशनवरील नाकेवाल्यास दाखवून ति-जबद्दलचा दिलेला पैसा सदर्हू इसमास परत देण्यांत येईल. त्या मालावरील कर आठ आण्यापेक्षा जास्त होत असल्यास ज्या इस-माच नावानें पार्सल आलें होतें त्यानें जास्त देणें होत असलेली कराची रकम व पूर्वी दिलेल्या रकमेची पावती हीं रेल्वेवरील नाके-वाल्याकडे पाठवावी ह्मणजे जुनी पावती ठेवून घेऊन एकंदर रकमेबद्दल नवीन पावती दे-ण्यांत येईल. याप्रमाणें जास्त होत असलेली कराची रकम सदर्हू इसमानें न दिल्यास त्यानें ती देण्याचें टाळिलें असें समजून त्या-जवर कायद्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. या नियमा प्रमाणे कोणत्या इसमास सवलत द्यावयाची ते म्युनिसिपल कमेटी ठरवित जाईल. ज्या मालावर कर घेण्यांत येतो अशा मालाचा व्यापार करणाऱ्या लोकांस ही सवलत सहसा देण्यांत येणार नाहीं.

सामान्य माफीचे नियम.

३४ शहरांत आणतेवेळीं ज्या मालावर सरकारची मालकी आहे व जो माल सरका-रच्या उपयोगी लावण्यांत येणार आहे अशा मालावर सदर्हू माल शहरांत आणतेवेळीं तो सरकारी माल असून सरकारचे उपयोगी लावण्यांत येणार आहे अशा बद्दलचे व योग्य अधिकाऱ्यानें दिलेलें सर्टिफिकेट ज्या-वर दिलें आहे असें बिनक दाखविल्यास त्या मालावर ऑक्ट्राय कर किंवा फी आकार-ण्यांत येणार नाहीं परंतु शहरांत आणतेवेळीं मालावर सरकारची मालकी आहे परंतु तो सरकारच्या उपयोगी लागावयाचा नसून लोकांस विकावयाचा असल्यास त्यावरील कर किंवा फी माफ करण्यांत येणार नाहीं.

३५ जो माल शहरांत आणते वेळीं सर-कारचे मालकीचा नाहीं परंतु तो पुढें सरका-राशीं केलेला करार पुरा करण्या करितां किंवा इतर रीतीनें सरकारच्या उपयोगांत आणल्या मुळें त्यावर सरकारची मालकी उपस्थित हो-णार आहे असा माल शहरांत आणणाऱ्या इसमानें सदर्हू माल शहरांत आणते वेळीं तो सरकारच्या उपयोगी लागणार आहे अशा बद्दल नाक्यावरील इसमास जाहीर करावें. व नंतर त्यावरील कर द्यावा. सदर्हू माल सरकारचे उपयोगी लागला ह्मणजे त्याबद्दलचें सर्टिफिकेट त्या त्या सरकारी खा-त्याच्या अधिकाऱ्याच्या सहीचे आल्यास त्यावरील कर अगर फी परत देण्यांत येईल

३६ सरकारी तुरुंगांतील कारखान्यांत तयार करण्या करितां जो माल शहरांत आणला जाईल त्यावर कर किंवा फी माल शहरांत आणतेवेळीं घेतली जाणार नाहीं. परंतु सदर्हू कारखान्यांत सदर्हू मालापासून तयार केलेले जे जिन्नस लोकांना विकण्यांत येतील. त्यावर कर किंवा फी अनुक्रमें घेण्यांत येईल. तुरुंगांतील कारखान्यात तयार केलेले जे जिन्नस लोकांस विकण्यांत आले ते तयार करण्याचे कामीं परगांवाहून आणलेला कच्चा माल किती उपयोगांत आणला गेला या बद्दलचें पत्रक दर महिना अखेरीस सदर्हू जेलचे सुपरिंटेंडेंट यांनीं म्युनिसिपल कमेटी कडे पाठवावें. व सदर्हू पत्रका बरोबर कच्या मालावरचा कर किंवा फी ही अनुक्रमे म्यु-निसिपल कमिटीकडे पाठवून द्यावी. त्या तुरुं-गांत जो तयार झालेला माल खपला असेल किंवा इतर तुरुंगांत किंवा सरकारी खात्यांत पाठविला असेल त्या मालावर कर अथवा फी घेतली जाणार नाहीं.

३७ खालील मालावर ऑक्ट्राय कर किंवा व्यापाराची नोंद ठेवण्याची फी घेण्यांत येणार नाहीं.

( अ ) मीठ

( ब ) अफू

( क ) देशी, विलायती अथवा गाळलेली दारू व इतर मादक पदार्थ ज्यावर हिंदुस्थान सरकारचा कर वसूल करण्यांत येतो,

( ड ) उतारूंचे बरोबरचें सामान किंवा इतर खानगी उपयोगाचे जिन्नस जे शहरांत आणण्यापूर्वी वापरण्यांत आलेले आहेत.

व्यापाराची नोंद ठेवण्या संबंधाचे नियम

(३८) जो माल वरील नियम व सोबत जोडलेलें आक्ट्राय पत्रक या अन्वयें ऑक्ट्राय कर घेण्यास पात्र नाहीं असा माल शहरांत आणते वेळीं व्यापाराची नोंद ठेवण्या बद्दल फी ह्मणून रकम घेण्यात येईल.

(३९) ज्या मालावर व्यापाराची नोंद ठेवल्याबद्दल फी वसूल करण्यांत आली आहे तो माल परगांवीं पाठविला असता सदर्हू फी परत देण्यात येणार नाहीं.

( ४० ) ज्या मालावर ऑक्ट्राय कर घेण्यांत येत नाहीं असा माल शहरात आणते वेळीं त्यावर किमतीचे मानानें दर रुपया-स ½ पै या प्रमाणें व्यापाराची नोंद ह्मणून फी घेण्यात येईल. जेथें मालाची किंमत करण्यांत येणार नाहीं अशा वेळीं सदर्हू मालावर वजनाचे मानानें दर मणास अर्धा आणा या दरानें सदर्हु फी घेण्यांत येईल.

( ४१ ) वरील नियमा अन्वयें फी वसूल करावयाची ती तीन पैचे आंत असल्यास वसूल करण्यांत येणार नाहीं.

( ४२ ) शहरांत माल आणणारे इस-मानें फीची आकारणी करण्या करितां आपल्या मालाची नक्की किंमत काय आहे हें सांगितलें पाहिजे. अशी माहिती मिळणें शक्य नसल्यास किंवा ती देण्याचें माल आणणार इसमानें नाकारल्यास किंवा दिलेली माहिती बरोबर नाहीं अशी नाक्या वरील इसमास शंका आल्यास सदर्हु मालावर दर मणास अर्धा आणा या दरा प्रमाणें फीची आकारणी करण्यांत येईल.

( ४३ ) वरील नियमा अन्वये जे नमुने उपयोगांत आणावयाचे ते म्युनिसिपल कमिटी वेळोवेळीं ठरवीत जाईल.

( ४४ ) वरील नियम मोडल्यास किंवा त्याची अंमल बजावणी करण्याचे एखादे इसमानें टाळल्यास तो वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याच्या कलमा अन्वयें शिक्षेस पात्र होईल.

लागेल व त्यांतून आणलेल्या मालाचें वजन अनुक्रमें २४ व १२ मणा पासून ३२ व १६ मणा पर्यंत असल्यास त्या मालाबद्दल पूर्ण कर द्यावा लागेल. गाडा व गाडी यांतून आणलेल्या मालाचें वजन वर नियम १५ यांत दर्शविलेल्या इयत्तांपेक्षां जास्त असल्यास त्या माला बद्दल अनुक्रमें प्रत्येक ८ किंवा ४ मण वजनाच्या किंवा त्यांहून कमी वजनाच्या मालाबद्दल सदर्हू गाडा अगर गाडी यावर द्यावा लागणाऱ्या कराचा $\frac{१}{२}$ कर अधिक द्यावा लागेल. डोकयावरून आणलेल्या मालाचें वजन २ मणा पेक्षां अधिक असल्यास त्यावरील कराची आकारणी मणावर केली जाईल. मणाच्या अंशांची आकारणी रेल्वे स्टेशनवर मणाच्या अंशाचे जसें वजन धरितात तसें धरलें जाईल. डोकयावरून आणलेल्या ज्या मालावरील कर ८४ आणे किंवा त्यांहून अधिक असेल त्या मालाचें वजन २ मणाचें आंत असल्यास त्यावरील कराची आकारणी खालीं लिहिल्या प्रमाणें करण्यांत येईल. ओझ्याचे वजन १० शेर आणि २० शेर याचे आंत असल्यास त्यावर पूर्ण दराचा $\frac{१}{२}$ कर आकारण्यांत येईल २० आणि ४० शेर यांचे आंत असल्यास त्यावर पूर्ण दराचा निमा कर आकारण्यांत येईल.

१७ जेव्हां एका पेक्षां अधिक प्रकारचा माल आगरा असेल तेव्हां त्यावरील कराची आकारणी प्रत्येक प्रकारच्या मालाच्या वजनावर निरनिराळी करण्यांत येईल.

१८ माला वरील बारदान घटया किंवा कापड, गोंडपाटया नसेल तर त्यांचें वजन ( कराची आकारणी करण्या करितां ) एकं-[illegible] न येईल.

[illegible] मार्गांच्या ( गंधकाच्या ) [illegible] किंवा धातू पासून [illegible] माल जल मार्गानें आणविला असल्यामुळें त्यावर कस्टमची जकात पूर्वी द्यावी लागली आहे परंतु जो या सोबत जोडलेल्या पत्रका बरहुकूम आक्ट्राय कराला पात्र आहे असा माल वरील आक्ट्राय कर त्याच्या किमतीवर दर शेंकडा दीड रुपया पेक्षां जास्त आकारण्यांत येणार नाहीं. ज्या मालावर पूर्वी कस्टमची जकात दिली आहे अशा इतर प्रकारच्या मालावर आक्ट्राय कराची आकारणी बिलकूल करण्यांत येणार नाहीं.

२० ज्या मालावर वर नियम १९ यांत दर्शविल्या प्रमाणें त्याचे किंमतीवर दर शेंकडा रुपया १$\frac{१}{२}$ दीड पेक्षां जास्त कर घेतला जाऊं नये असें ठरलें आहे असा माल डोक्यावर आणल्यामुळें त्यावरील कर ओझ्याच्या मानानें घेतल्या कारणानें जास्त कर आपणास द्यावा लागला असें माल आणणाऱ्या इसमास वाटेल तर त्याला आपण आणलेल्या मालाची तपासणी करून त्यावर मागील नियमा प्रमाणें किंमतीचे मानानें कर घेण्यांत यावा, असें म्हणण्याचा अधिकार पोंहोचतो.

बाहेरून आणलेला परंतु गांवांतून परगांवीं जाणारा माल व त्याबद्दल पूर्वी दिलेला कर परत घेण्याचे नियम

( री फंडाचे नियम. )

२१ परगांवीं जाणारा माल गांवांत येऊन गांवांत आल्या पासून एक आठवड्याच्या आंत जशाचा तसाच न फुटतां गांवाबाहेर जावयाचा असेल असा माल आणणाऱ्या इसमानें गांवांत माल आणते वेळीं वरील नियमा प्रमाणें सदर्हू मालाबद्दल आक्ट्राय कर देऊन रिती प्रमाणें पावती घेतली पाहिजे व नंतर माल गांवाबाहेर घेऊन जाते वेळीं ज्या नाक्यावरून माल गांवा बाहेर नेण्यांत येईल त्या नाकेवाल्या जवळून सदर्हू इसमानें सदर्हू माल जशाचा तसाच न फुटतां गांवाबाहेर गेल्याबद्दल आपल्या पावतीवर दाखला घ्यावा व नंतर ती पावती म्युनिसिपल ऑफिसांत दाखल करावी म्हणजे म्युनिसिपल अधिकाऱ्यांची हे सदर्हू बाबतींत दर्शविलेला माल शहरा बाहेर गेला असल्या बद्दल वगैरे खात्री करून दिल्यावर सदर्हू पावतींत पूर्वी भरलेली कराची दर्शविलेली रकम माल आणणाऱ्या इसमास परत मिळेल.

२२ नियम २१ यांत दर्शविलेला माल एक आठवड्यापेक्षां जास्त मुदती पर्यंत गांवांत राहिल्यास त्याबद्दल दिलेल्या कराची रकम परत घेण्यासाठीं माल आणणाऱ्या इसमानें सदर्हू माल परगावीं पाठवावयाचा असून अद्याप गावात राहिला आहे, अशी आक्ट्राय दरोग्यास नोटिस देऊन सदर्हु नोटीस दिल्या बद्दल सदर्हू दरोग्या कडून आपल्या पावतीवर शेरा लिहून घ्यावा.

२३ वर नियम २२ यांत दर्शविलेली नोटीस दिली असतां शहरांत माल आणिला त्या तारखे पासून सहा महिन्याचे आंत तो बाहेर नेल्यास त्याबद्दल पूर्वी दिलेला कर परत देण्यात येईल.

२४ वरील नियमा प्रमाणें परत द्यावयाच्या कराची रकम रुपये दोन पेक्षां अधिक असेल तर गांवा बाहेर माल घेऊन जाणाऱ्या इसमानें आपला माल म्युनिसिपल आफिसांत हजर केला पाहिजे.

२५ गावांत आणलेला माल फोडावयाचा असेल किंवा त्या माला पासून नवीन तयार केलेला माल गांवा बाहेर पाठविणें असेल तर त्यावरील कराची रकम परत मागण्या पूर्वी सदर्हू माल म्युनिसिपल सेक्रेटरी किंवा ऑक्ट्राय दरोगा यांच्या तपासणी करितां म्युनिसिपल आफिसांत आणून तेथें त्यांच्या समक्ष त्याच्या गांठीं बांधिल्या पाहिजेत व गांठीं बांधल्या नंतर ४८ तासाचे आंत सदर्हू माल गांवा बाहेर नेल्या बद्दल ज्या नाक्यावरून माल बाहेर नेला असेल त्या नाकेवाल्याचा दाखला हजर केला पाहिजे.

२६ जेव्हां रेल्वे मार्गानें परगांवी माल पाठविला असेल तेव्हां नियम २४ व २५ यात सांगितल्या प्रमाणें माल म्युनिसिपल आफिसांत हजर करण्याची अवश्यकता नाहीं तर त्या मालाबद्दल रेल्वे अधिकाऱ्यांकडून मिळालेला पास हजर केला असतां सदर्हू माल परगांवीं पाठविण्यांत आला असें मानण्यांत येईल.

२७ परगांवीं पाठविलेल्या मालाबद्दल कराची रकम परत मागण्या करितां अर्ज करावयाचा तो माल परगांवीं पाठविल्या पासून चार दिवसांचे आंत केला पाहिजे. व त्या अर्जा सोबत माला बद्दल दिलेल्या कराची पावती व माल परगांवीं पाठविला असल्या बद्दल वर दर्शविलेला दाखला हे कागद दाखल केले पाहिजेत.

२८ कर दिल्याबद्दल ज्या पावत्या देण्यात येतील त्यांनवरील मालकी त्यांत दर्शविलेल्यावर मालाच्या मालकी बरोबर एका इसमाकडून दुसऱ्या इसमाकडे जाईल. परगांवीं पाठविलेल्या मालाबद्दल कर परत मिळणें तो जो इसम सदर्हू माल परगांवीं पाठवील व मूळ कराची रकम दिल्याबद्दलची पावती दाखल करील त्या इसमास मात्र परत मिळेल.

२९ कराची रकम परत घेण्याचें कामीं व्यापाऱ्यांस सोयकर व्हावें म्हणून मालावर जो कर दिला जाईल त्या बद्दल पावत्या देण्यांत येतील.

३० परत द्यावयाची कराची रकम आठ आण्यांच्या आंत असल्यास ती परत दिली जाणार नाहीं. गांवांत आणलेला माल अंशतः परगांवीं पाठविला असतां त्या त्या अंशाचा एक चतुर्थांश मणापेक्षां अधिक अंश असेल तो शेवटल्या परगांवीं पाठविलेल्या अंशांत जसें धरून शेवटल्या अंशांत वजनाची बेरीज घेतल्यावर त्या मानानें कराची रकम परत करण्यांत येईल. व एक चतुर्थांश मणाचे आंत मावरील वजनाचा अपूर्णांक असेल त्यावर कराची रकम परत करण्यांत येणार नाहीं परगांवीं पाठविलेल्या ज्या मालावरील कराची रकम परत मागण्यांत येईल तो सर्व माल खरोखर एक गांठ असा पाहिजे म्हणजे एका इसमानें एकाच इसमास एकाच ठिकाणीं व एकाच दिवशीं पाठविलेला असला पाहिजे व ह्या शिवाय तो सर्व माल एकाच खेपेस परगांवांहून गांवांत आलेल्या मालापैकीं असला पाहिजे. गांवांत माल आणितांना दिलेल्या कराची पावतीही त्या दिवशीं आणलेल्या सर्व मालाबद्दल एका खेपेबद्दल ( गांठीं बद्दल ) आहे असें समजलें जाईल.

३१ नियम २१ पासून नियम ३० पावेतों सर्व नियमांचें मराठींत भाषांतर करून तें भाषांतर बाजार व कॉटन मार्केट यांतून प्रसिद्ध करण्यांत येईल. ह्या भाषांतराची एक एक प्रत मुख्य आफिसांत व नाक्यावर ठळक ठिकाणीं लावून ठेवण्यात येईल.

३२ रेल्वे मार्गानें आणविलेला माल रेल्वेच्या फाटका बाहेर आला म्हणजे तो गांवांत आणिला असें समजलें जाऊन तो रस्त्यानें आलेल्या इतर मालाप्रमाणें ऑक्ट्राय करास पात्र होईल.

३३ (अ) ज्यांना हा नियम लागू आहे अशा इसमाकडे रेल्वे मार्गानें पार्सलें आलीं असतां त्यांनीं आपल्या पार्सलांतून आलेल्या मालाचें वर्णन व त्याची किंमत हीं सांगावीं लागतील व त्या मानानें सदर्हू मालावर करही त्यांना द्यावा लागेल. त्या प्रमाणें सदर्हू इसमाकडून वर्तन न घडल्यास कर टाळण्याचा त्यानें प्रयत्न केला असें समजलें जाईल. रेल्वे मार्गानें आलेल्या पार्सला बद्दल काय माहिती द्यावयाची त्यासंबधानें छापील नमुने सेक्रेटरी कडे किंवा रेल्वेच्या नाक्यावरील ऑक्ट्राय अधिकाऱ्याकडे अर्ज केला असतां मिळतील.

(ब) रेल्वे मार्गानें आलेल्या पार्सलांत काय माल आहे हें व त्याची किंमत काय आहे हें ज्याचें नांवानें पार्सल आलें आहे त्या इसमास माहित नसल्यास त्यानें रेल्वेच्या नाक्यावरील ऑक्ट्राय अधिकाऱ्यापाशीं आठ आण्याची रकम अनामत ठेवून तिजबद्दल पावती घ्यावी व आपलें पार्सल घेऊन जावें परंतु ज्या मालावर कर माफ आहे असें

| नंबर | वस्तूचें नांव | दर गाडीस | दोन बैलांच्या गाडीस | दुसऱ्या तऱ्हेच्या गाडी किंवा उंट | घोडे, रेडा, खेचर व तट्टू | गाढव | डोई ओझें | ८० पौंडाच्या मणास एकेरीपर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३. | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | वर्ग पहिला | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| | मनुष्यांचे व जनावरांचे खाण्याचे व पिण्याचे पदार्थ. | | | | | | | |
| | धान्यें | | | | | | | |
| १ | साळ किंवा भात किंवा धान. | | | | | | | |
| २ | बाजरी | | | | | | | |
| ३ | जवारी | | | | | | | |
| ४ | सातू किंवा जव | | | | | | | |
| ५ | मटकी | | | | | | | |
| ६ | तुरी किं० तुरीची दाळ | | | | | | | |
| ७ | मूग किं० मुगाची दाळ | | | | | | | |
| ८ | उडीद किं० उडदाची दाळ | | | | | | | |
| ९. | कुळीथ ( हुलगे ) | १-४-० | ०-१०-० | ०-५-० | ०-२-० | ०-१-३ | ०-०-० | ०-०-८ |
| १० | राजगिरा | | | | | | | |
| ११ | वाटाणे | | | | | | | |
| १२ | मका | | | | | | | |
| १३ | नाचणी | | | | | | | |
| १४ | वरी किं० मगर | १-४-० | ०-१०-० | ०-५-० | ०-२-० | ०-१-३ | ०-०-० | ०-०-८ |
| १५ | खसखस | | | | | | | |
| १६ | किरकोळ धान्यें | | | | | | | |
| १७ | तांदूळ | | | | | | | |
| १८ | गहूं | १-८-० | ०-१२-० | ०-६-० | ०-२-६ | ०-१-६ | ०-०-६ | ०-०-९ |
| १९ | चणे किं० चण्याची दाळ | | | | | | | |
| | भुसारी माल | | | | | | | |
| २० | नारळ | १-८-० | ०-१२-० | ०-६-० | २-६-० | ०-१-६ | ०-१-६ | ०-०-९ |
| २१ | वाळलेलीं फळें व फळांच्या पोळ्या | | | | | | | |
| २२ | आरारूट | | | | | | | |
| २३ | साबूदाणा | | | | | | | |
| २४ | जाडा तवकीर | ४-०-० | २-०-० | १-०-० | ०-६-० | ०-४-० | ०-४-० | ०-२-[illegible] |
| २५ | वाळलेली आणि ताजी खजूर | | | | | | | |
| २६ | वाळवलेली द्राक्षें व मनुका | | | | | | | |
| २७ | बदाम | | | | | | | |
| २८ | खडी साखर | | | | | | | |
| २९ | सुकवलेलें दूध | ६-०-० | ३-०-० | १-८-० | ०-९-० | ०-६-० | ०-६-० | ०-३-० |
| ३० | लोणी | | | | | | | |
| ३१ | मुरंबे व मसाले | | | | | | | |
| ३२ | ऑइल मन्स स्टोअर आणि सर्व प्रकारचे प्रिझर्व्हड सामान | ८-०-० | ४-०-० | २-०-० | ०-१२-० | ०-८-० | ०-८-० | ०-४-० |
| ३३ | साखर | | | | | | | |
| ३४ | तूप | १२-०-० | ६-०-० | ३-०-० | १-२-० | ०-१२-० | ०-१२-० | ०-६-० |
| | फळफळावळ व भाजीपाला | | | | | | | |
| ३५ | निरनिराळ्या भाज्या | | | | | | | |
| ३६ | हिरव्या मिरच्या | ०-८-० | ०-४-० | ०-२-० | ०-०-९ | ०-०-६ | ०-०-० | ०-०-३ |
| ३७ | चिंच | | | | | | | |
| ३८ | निरनिराळीं फळें | | | | | | | |
| ३९ | ऊंस | ०-१२-० | ०-६-० | ०-३-० | ०-१-० | ०-०-९ | ०-०-० | ०-०-४ |
| ४० | मका | | | | | | | |
| ४१ | मासे ताजे अगर सुकलेले व खिम्म मासे | ३-०-० | १-८-० | ०-१२-० | ०-४-६ | ०-३-० | ०-३-० | ०-१-६ |
| ४२ | ताजी फळें म्हणजे नारिंगे, कलमी आंबे शिंगाडे वगैरे. | शेकडा ३-२-० | | | | | | |
| ४३ | तयार किं० शुद्ध केलेली साखर व मध | शेरास ०-०-१ | | | | | | |
| ४४ | गूळ, काकवी वगैरे | ०-०-१ | | | | | | |
| ४५ | बटाटे | दहा शेरास ०-०-३ | | | | | | |
| ४६ | खवा | दर शेरास [illegible] | | | | | | |

| नंबर | वस्तूंचें नांव | दर गाडीस | दोन बैलांच्या गाडीस | दुसऱ्या तऱ्हेची गाडी किंवा उंट | बैल, रेडा, खेचर व तट्टू | गाढव | डोई ओझें | ८० पौंडाच्या म[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ४७ | टिनच्या डब्यांतून आलेले खाण्याचे पदार्थ | शेकडा १-९-० | | | | | | |
| | जनावरांचें अन्न | | | | | | | |
| ४८ | वाळलेलें गवत, गवत, भुसा | ०-८-० | ०-४-० | ०-२-० | ०-०-९ | ०-०-६ | ०-०-३ | ०-०-३ |
| ४९ | कडबी किंवा हिरवा चारा. | | | | | | | |
| ५० | कोंडा व कर्डीची साल | | | | | | | |
| ५१ | देप | ०-८-० | ०-४-० | ०-२-० | ०-०-९ | ०-०-६ | ... | ०-०-३ |
| ५२ | सरकी | | | | | | | |
| ५३ | चण्याची भुकटी | | | | | | | |
| ५४ | अंबाडी अगर तागाचें बी | १-०-० | ०-८-० | ०-४-० | ०-१-६ | ०-१-० | ... | ०-०-६ |
| ५५ | ओट | १-४-० | ०-१०-० | ०-५-० | ०-२-० | ०-१-३ | ... | ०-०-८ |
| | वर्ग दुसरा | | | | | | | |
| | जाळावयाचें, उजेडाचें व धुण्याचे सामान | | | | | | | |
| | सरपण | | | | | | | |
| ५६ | जाळीव लाकूड व गोंवरी | | | | | | | |
| ५७ | कोळसा | ०-८-० | ०-४-० | ०-२-० | ०-०-९ | ०-०-६ | ... | ०-०-३ |
| ५८ | कोक आणि दगडी कोळसा | | | | | | | |
| | उजेडाचे सामान ( तेल व त्यांचे बी ) | | | | | | | |
| ५९ | कर्डी | | | | | | | |
| ६० | तीळ ( गोडे तीळ ) | १-४-० | ०-१०-० | ०-५-० | ०-२-० | ०-१-३ | ... | ०-०-८ |
| ६१ | जवस | | | | | | | |
| ६२ | कारले तीळ | १-४-० | ०-१०-० | ०-५-० | ०-२-० | ०-१-३ | ... | ०-०-८ |
| ६३ | भुईमुगाच्या शेंगा | १-८-० | ०-१२-० | ०-६-० | ०-२-६ | ०-१-६ | ०-१-६ | ०-०-९ |
| ६४ | भुईमुगाचे दाणें | २-०-० | १-०-० | ०-८-० | ०-३-० | ०-२-० | ०-२-० | ०-१-० |
| ६५ | खोबरें | | | | | | | |
| ६६ | [illegible] ...are | ४-०-० | २-०-० | १-०-० | ०-६-० | ०-४-० | ०-४-० | ०-२-० |
| | ... in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bomba... in terms of th... | ८-०-० | ४-०-० | २-०-० | ०-१२-० | ०-८-० | ०-८-० | ०-४-० |
| | Company's ... घासलेट, टर्पेन्टाईन आणि कोपल व्हार्निश हीं खेरीज करून दुसरी तेलें | दर शेरास ०-०-१ | | | | | | |
| | धुण्याचें सामान | | | | | | | |
| ७० | शिकेकाई | १-०-० | ०-८-० | ०-४-० | ०-१-६ | ०-१-० | ... | ०-०-६ |
| ७१ | साबू | ४-०-० | २-०-० | १-०-० | ०-६-० | ०-४-० | ०-४-० | ०-२-० |
| ७२ | चरबी व मेण | शेकडा १-९-० | | | | | | |
| | वर्ग तिसरा | | | | | | | |
| | घरांचें सामान | | | | | | | |
| ७३ | पक्क्या विटा व कौलें. | ०-४-० | ०-२-० | ०-१-० | ०-०-४ | ०-०-३ | ... | ..१ |
| ७४ | घडलेले व दुसरे घराचे दगड | | | | | | | |
| ७५ | चुना व चुनकळी | ०-८-० | ०-४-० | ०-२-० | ०-०-९ | ०-०-६ | ... | ..३ |
| ७६ | कारव्या | | | | | | | |
| ७७ | फोडलेले व साधे बाम्बू | | | | | | | |
| ७८ | बाम्बूच्या व इतर चटया | ०-१२-० | ०-६-० | ०-३-० | ०-१-० | ०-०-९ | ... | ..४ |
| ७९ | जंगली लाकडाचे १८ इंच व्यासाचे अगर त्याहून कमी, वांसे तसेंच लहान तुकडे ९ इंच अगर कमी व्यासाचे | ०-१२-० | ०-६-० | ०-३-० | ०-१-० | ०-०-९ | ... | ..४ |
| ८० | जंगली लाकडाच्या तुळया तक्ते आणि तुकडे ९ इंचावर व्यासाचे व १८ इंचावरील व्यासाचे वांसे | | | | | | | |
| ८१ | सागवानी वासे नमुने व तुकडे | २-०-० | १-०-० | ०-८-० | ०-३-० | ०-२-० | ०-२-० | .१. |
| ८२ | सागवानी ठोकळे, लहान तुकडे आणि तक्ते. | | | | | | | |
| ८३ | सर्व प्रकारचे ठोकळे व नमुने ( मलबार व नागपूर सागाचे ) | ३-०-० | १-८-० | ०-१२-० | ०-४-६ | ०-३-० | ०-३-० | ०-१-६ |
| ८४ | घडीव तुळया व तक्ते ( साग व साल ) | १-८-० | १-०-० | ०-४-० | ०-०-० | ... | ... | ०-०-८ |
| ८५ | कामाठी वीट चुना | ०-३-९ | ०-३-० | ०-१-६ | ०-०-० | ... | ... | ०-०-२ १/२ |
| ८६ | वाटोळी कौले आणि घर सफेदीचा चुना | ०-५-० | ०-४-० | ०-०-९ | ०-०-३ | ... | ... | ०-०-३ |
| ८७ | छपराचें गवत, | ०-४-० | ०-३-० | ०-०-६ | ०-०-० | ... | ... | ०-०-३ |
| ८८ | नारळी व साधे दोर ताग व टाईन वा | चुना व चुनकळी प्रमाणें | | | | | | |

...३ हानबी रोड, मुंबई,

REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ०
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक ..............................०२

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १,
दर ओळीस.........०१ ०६
दुसरे खेपेस..............०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Town ... ... ...
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line ...2 as

VOL XXXVII AKOLA MONDAY 25 MAY 1903 NO 20

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २५ माहे मे सन १९०३ इ० अंक २०

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES

Claims paid for—One Crore and Ten Lakhs.

Immediate Settlement Of Claims.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month and less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

## NOTICE

—:0:—

All persons are, hereby, informed that if they do not attend in person or by Agent all copies will be sent to them by Value Payable post, provided that they give their full and correct address in the application for copy. Dated 11th. May 1903. District Wun.

(Sd.) NIZAMUDDIN
Deputy Commissioner
Yeotmal.

## नोटीस.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, जे कोणी स्वतः अगर मुखत्यार मार्फत हजर होणार नाहींत त्यांच्या नकला त्यांनां व्हि. पी. नें पाठविल्या जातील. मात्र अर्जदारानें नकले करितां दिलेल्या अर्जांत आपला पूर्ण आणि बरोबर पत्ता दिला पाहिजे. ता. ११।५।०३ इ. जिल्हा वणी

सही
निजामुद्दीन
डेप्युटी कमिशनर
यवतमाळ जि. वणी.

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार. मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरणें यांसह. पाठ्यापर्यंत व किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५।०६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

कां० वा० लेले वाई

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस.

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हे वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या करितां विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फॉरेस्ट कान्सरवेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवुन तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें
१९ लाईन ओपनफेस.......................०
१९ ,, हंटिंग,.................................१०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.
१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे .......१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ..................२५०

मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.
रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह.................१०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................१२
१९ ,, हाफ हंटिंगचें......................२०
१९ ,, हंटिंगचें ..........................२०
१४ ,, रिस्ट वॉच ........................१०

इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे
१९ लाईन ओपन फेस.....................२०
१९ ,, हंटिंग.................................२०
१४ ,, रिस्टवॉच..............................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे
१४ लाईन रिस्ट वॉच .....................३०
१४ ,, हंटिंग..................................३५
१८ व १९ ,, ओपनफेस .....................३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ....................३२
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें .....................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें.........३५
१९ ,, हंटिंग ...................................४९
लेडीज वॉचीस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.
ओरिजिनल जिनीवन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

K. N. ESMAYAL & Co.

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु. १॥.

तापावर एग्युभीक्सर कीं. ॥-

वातावर नारायण तेल कीं. रु. १

गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम कि. ४ आणे.

पानथरीवर अमोलीक गोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता—खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

## नोटीस

बेशमी— भागीरथीबाई मर्दे ढनूसा रंगारी बाळापूरकर हल्लीं वस्ती

आत्मारामसा सराफ दुकान–निमगाव–नांदुरा यास:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा मुलगा नामें मारुतीसा वल्द भवानसा याच्याकडे बाटणीमध्यें तुमच्या नवऱ्यानें करून दिलेला याच्या तांबे गहाणाचा २०० रुपयांचा कर्जरोखा गेला होता; आणि त्या गहाणखता प्रमाणें गहाण घरही माझ्या मुलाच्या ताब्यांत होतें. तुम्ही त्याच्या सासू असल्यामुळें या घराचा कांहीं भाग तुम्हास राहण्यासाठीं दिला होता. व बाकीच्या भागांत माझा मुलगा घरांतील सामान सुमान ठेवीत होता. येणेंप्रमाणें व्यवस्था चालू राहिली परंतु आतां माझा मुलगा मारुतीसा हा १॥ वर्षां पूर्वीं मरण पावला व त्याच्या बायकोनें दुसरीकडे दोन महिन्यापूर्वीं पाट लावला यामुळें त्याच्या जिनगीचा वारसा मजकडे आला. त्या वारशाच्या मालकी अन्वयें मी तुम्हास कर्जाचे २०० रुपये देण्यास किंवा घर खालीं करून देण्यास सांगितलें तर तुम्ही हो हो म्हणून कांहींच निकाल करीत नाहीं व त्या घरांतील आमची दवणी वगैरे सामानही नेऊं देत नाहीं.

ही नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत कर्जाचा निकाल करावा. किंवा घर आमचे स्वाधीन करावें व आमचे गाडी वगैरे सामान आणून पोचतें करावें असें करण्यास चुकाल तर रीतीप्रमाणे कोर्ट मार्फत दावा करून सर्व नुकसानी सुद्धां योग्य दाद मागण्यांत येईल. कोर्ट मार्फत घर ताब्यांत येईपर्यंत तुम्हाला दरमहा ४ रुपये प्रमाणें भाडें द्यावें लागेल. कळावें.

तारीख २०।५।०३ इ. (सही)

जानकाबाई जवजे भवानसा रंगारी
बाळापूर दस्तुर तुकाराम
भवानसा.

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य १३ शके १८२५

## माणसाची शिकार

दोन वर्षां पूर्वी आकोल्या जवळील पारस स्टेशना नजिक एक माणूस शिकारीला बळी पडला. भर दिवसांची गोष्ट एक कुणबी शेतांत होता त्यास एका सोल्जिरानें हरिण समजून गोळी झाडली आणि पुढें पाहतात तों हरिण कोणी नव्हता पण एक बिचारा मनुष्य मृत्यूच्या दरबारीं रवाना झाला. ड्यूक अ.फ कानांट साहिबापुढें वाच जन्टलमन ( सभ्य गृहस्थ ) बनून त्यांच्या गोळी पुढें येऊन उभा राहतो आणि आपल्या नीचाचें साफल्य करितो असा उद्गार शिं. सरकारांनीं थोड्या दिवसापूर्वीं काढला होता ण तेच आमचे शिंदे सरकार वऱ्हाडांत येतील तर त्यांस वाटेल कीं वऱ्हाडचे लोक यांच्या व्याख्येप्रमाणें बरहुकूप जंटलमन आहेत ा ते एखाद्या सोल्जराचा देखील पाहुणचार करण्यासाठीं आपण हरिणकाय दिसूं लागतात.

वरच्या सारखा प्रकार थोड्या दिवसां पूर्वीं घडला. मौजे मानेगांव तालुका जळगांव येथील जंगलांत तारीख ७ रोजीं सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारीला मि० जी० एच. सुवेल नांवाचे सोजीर शिकारीला गेले होते. मुद्दाम शिकारीच्या शोकामुळें हे झांशीहून आणिले होते. साहेबांनीं बंदूक झाडली पण ती गोळी नारू वलद कुकाजी या कुणब्याला लागली व तो थोडक्यांत गतप्राण झाला! सोजीराचा हा गुन्हा अक्षम्य आहे तेव्हां मे. रुस्तुमजी साहेब रदहू शिकार करणाऱ्याला न्याय मंदिरांत शिक्षाची परीक्षा करण्यास लावतील असा पक्का भरंवसा आहे. पण एक भ्रमर गुणगुणत असतो कीं वरील प्रकरणीं सोजीराचा गुणताच गुन्हा नाहीं असा निकालही लागला! लार्ड कर्झन साहेबांस अशा शिकारीतील गोष्टींची मोठी चीड आहे तेव्हां या प्रकरणाची विझवाविझव इतकी तावडतोब होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह आहे. कुमार साहेबांची राजेशाही नाहीं री पार्शी साहेबांच्या न्यायदृष्टीवर कोणीही शिंपड वाळूं शकणार नाहीं असें आम्ही वाचकवर्गास आश्वासन देतों.

## कारखाने

फ्याक्टरी कायद्याच्या कलमा खालीं गारे असे कारखाने वऱ्हाडांत सालोसाल वाढत आहेत. १९०१ च्या रिपोर्टीवरून दिसतें कीं रिपोर्टाच्या सालीं २०८ कारखाने होते. आदले वर्षीपेक्षां ३४ कारखाने १९०२ सालीं अधीक निघाले. हल्लीं कापूस वटण्याचे कारखाने फार घालण्यांत येत असतात. साधारण मांडवलवाले दोन चार मिळतात आणि त्यांनीं थोड्या महिन्यांत जिनांचे कारखाने उभारलेले दृष्टीस पडतात तूर्त हे कारखाने उभारण्याकडे लोकांची प्रवृत्ति विशेष दिसते. या कारखान्यांची उत्पत्ति ह्मणजे हात रेच्यांचा लय होय. खेडोपाडीं जे हातरेचे चालत असत व शेंकडों लोकांस रोजी मिळत असे त्या सर्वांचा उपयोग नाहींसा होतो.

या २०८ कारखान्या शिवाय चार तेलांच्या गिरण्या, एक गाड्या तयार करण्याचा कारखाना व एक ... कारखाने या मोजीत आहेत पण ते फ्याक्टरी आक्टाखालीं येत नाहींत. त्या शिवाय १९०२ च्या अखेरीला गठडी बांधण्याचा एक कारखाना व तीन जिनिंग फ्याक्टरीचे कारखाने नवीन निघणार होते. १९०१ सालीं कापूस वटण्याचे कारखाने १२९ होते ते या सालीं १६० झाले. गठडी बांधण्याचे प्रेस ९ वाढून एकंदर ९९ झाले. बडनेऱ्याला जशी सूत काढण्याची व कपडा काढण्याची एक गिरणी आहे तशी एक गिरणी आकोल्यात लवकरच चालू होणार आहे.

वरील सर्व कारखान्यांतून मिळून एकंदर १६४९६ माणसे दररोज कामावर असतात. कारखान्यामुळें कामकरी लोकांची मजुरी चांगली वाढली आहे. एका माणसाला ३॥ आणे रोजीं व बायकोला २॥ आणे रोजी पडते. लोहार, फिटर, सुतार, इत्यादि कारागिरास २५ पासून ३५ रुपये पर्यंत दरमहा पडतो. गवंड्याला २०।२२ रुपये मिळतात. बायलर वरील माणसाला १८ रुपये पडतात.

१९०२ सालीं वऱ्हाडातील फ्याक्टरी मधून २९ अपघात झाले; परंतु पुष्कळदां मजूरदारांच्या अडाणीपणामुळें अपघात घडतात. यंत्रापासून त्यांस कमी धोका व्हावा ह्मणून विशेष खबरदारीचे उपाय योजण्या संबंधीं व्यवस्था करण्यांत आल्या आहेत.

## जंगलखातें

वऱ्हाडातील जंगलखात्याचा विस्तार २९,३०,४२७ एकर ह्मणजे ३९१४ चौरस मैल आहे. गेल्या १९०१–०२ सालीं या खात्याचें उत्पन्न ४,८६,४२७ रुपये आलें व खर्च २,११,९९६ रुपये झाला ह्मणजे या खात्यापासून सरकाराला २॥ लक्ष रुपयांचा निवळ फायदा झाला. यंदा हें उत्पन्न पुष्कळ वाढलें असून दुष्काळा नंतर दोन वर्षांच्या मुदतींत ही मुश्किली आली ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

जंगलखात्याकडून या सालीं रस्ते, पूल, इमारती, व जुन्या रिपेरी मिळून ११३९९ रुपयांचीं कामें करविण्यांत आलीं. हा खर्च यंदा फार कमी करण्यांत आला. गेल्या १० वर्षांची सरासरी घेतली तर असें आढळलें कीं, सालीना या कामाकडे २३५०९ रुपये खर्च होत असे.

जंगल खात्यासंबंधानें जे लोक गुन्हे करितात त्यांचा ... असा अनुभव आला आहे कीं त्यांच्यावर सामान्य गोष्टीमध्यें दया करावी, नुकसानी मरूम घ्यावी व पुनः तसा गुन्हा न करण्या विषयीं मनाइ करावी. अशा रितीनें जंगल खात्याचा फायदा पुष्कळ होतो.

हल्लींचे कान्सरव्हेटर मि. फर्नानडीझ साहेब यांनीं आपल्या रिपोर्टीत कांहीं महत्वाच्या गोष्टींचा शोध लिहिला आहे. ते ह्मणतात कीं जुना समज असा असे कीं जेथें साग, बाभूळ वगैरे झाडें लाविलीं आहेत किंवा उगवलीं आहेत तेथें गवत जशाचें तसें च वाढूं द्यावें आणि आगी पासून या जंगलाचें संरक्षण उत्तम प्रकारें करावें ह्मणजे सागाची व इतर झाडांची वाढ फार उत्कृष्ट होऊन उत्तम प्रतीचे वृक्ष तयार होतात हा समज चुकीचा होता असें गेल्या २१।२० वर्षांच्या अनुभवानें मि० फर्नानडीझ यांच्या प्रत्ययास आलें. मध्यप्रांतांत असें दृष्टीस पडलें कीं जेथाल गवत वरचेवर गुरें खाऊन टाकीत व जेथें अग्नि लागून गवत वगैरे पेट घेत तेथील साग वगैरे वन्य झाडें चांगलीं जामदार दिसत असत. जुन्या रिपोर्टांत असा उल्लेख वारंवार येई कीं बंदोबस्त ठेविलेल्या जंगलांतील झाडें चांगलीं मोठमोठीं होत आहेत, परंतु वास्तविक प्रकार तसा नसे. हीं झाडें गवत जोरानें वाढत गेल्यामुळें खुजी व खुरटीं होऊन त्यांचा जोमही फार कमी होत जात होता. जंगलांतील झाडा सभोंवती जें गवत उगवत असे त्याची छाटाछाट केली व तेथील जमिनीची उलथापालथ केली, आणि ही गोष्ट शेतकऱ्याकडून करवून घेतली ह्मणजे जंगलचीं झाडें फार तुंग जोरदार व दाट छाय होत असत. बैरागड व बुगामल येथील जंगलांत स्वतां परिक्षण केलें तेव्हां मि० फर्नानडिझ यांस आढळलें कीं तेथील अगदीं लहान सागाचीं झाडें ह्मणजे १० वर्षां पेक्षां लहान नव्हतीं, आणि ही झाडें देखील नीट वाढलीं याला कारण ह्मटलें ह्मणजे तेथील जमीन वाहितींत आणिल्यामुळें व इमारती कित्येक उभारल्यामुळें तेथील गवताचीं पाळीमुळें खणलीं गेलीं व तेथें साग चांगला वाढला हें होय; याचप्रमाणें प्रथम जी सागाची उत्तम लागवड व वाढ झाली याचें खरें कारण तेथील जमिनींत जंगलाच्या बंदोबस्तामुळें गवत पुरेसें माजलें नव्हतें; आणि आतां नवीं नवीं सागाचीं झाडें दिसतात त्यांचें बूड पाहिलें तर तीं चांगली जुने व जरठ दिसत परंतु प्रत्येक झाड २० वर्षांपेक्षां पलिकडील नसावं.

वरील अनुभव लक्षांत ठेवण्या सारखा आहे. ही गोष्ट आमच्या शेतकऱ्यांच्या नित्याच्या परिचयांतली आहे. शेतांत गवत हरळी वगैरे वाढली ह्मणजे ते समजतात कीं आपला उद्दीम सर्व बुडाला. गवताच्या वाढीनें पिकाला जसा धक्का बसतो तद्वतच गोष्ट जंगली साग सारख्या झाडासंबंधाची आहे. जंगल खात्यांतील जमिनीचा देखील फेरपालट पुष्कळदां होत गेला. पाहिजे असा आमचा समज आहे. जंगलाची जमीन कांहीं वर्षांसाठीं वहितीला द्यावी आणि वहितीची जमीन जंगलासाठीं परत तितक्याच मुदती साठीं घ्यावी ह्मणजे जंगल व वहिती या दोन्ही बाबींचा चांगला फायदा होईल. कित्येक ठिकाणीं असा प्रकार जेथें घडतो तेथें असाच लाभप्रद अनुभव आलेला आहे. जंगलाकडील जमीन फार दांडगें पीक देते आणि वाहितीकडील जमिनीवर जंगली झाडें फार उत्कृष्ट वाढतात. सांप्रत कसत चाललेल्या वहितीकडील जमिनीचा समाचार जंगलखात्यामें घेतल्यास परिणामीं सरकारचा व रयतेचा फायदा होण्या सारखा आहे. परंतु आरंभीं हीं सुधारणा सरकाराला नुकसानीची बाब वाटेल तेव्हां ती अंमलांत येईल अशी भितीही बाळगण्याचें कारण नाहीं.

## हुंडा

मुलीचा पितृगण वर दक्षिणा ह्मणून जो हुंडा देतात तो वराचा पितृगण आपल्या घरच्या खजिन्यांत ओढतात; ही गोष्ट सुधारलेल्या तऱ्हेनें करण्याविषयीं एक मार्ग रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं सूचविला आहे. त्यांच्या मतें हुंड्याचा विनियोग वधूवरांच्या किंवा त्यांच्या आपत्यांच्या उपयोगांत व्हावा. हुंडा ह्मणजे वधूवरांची व त्यांच्या अपत्यवर्गाची इस्टेट समजली जावी. त्या हुंड्याच्या रकमेवर वराच्या आईबापांचा कांहीं हक्क नसावा. हुंडा ह्मणून देण्यापेक्षां अशा तऱ्हेची योजना या हुंड्याच्या रकमेची होईल तर ती, रा. रा. आण्णा साहेब महाजनी यांस विशेष पसंत आहे असें दिसतें. धारवाडास सामाजिक परिषदेची अध्यक्षाच्या नात्यानें त्यांनीं जो उत्कृष्ट निबंध श्रोतृवृंदा पुढें मांडला त्यामध्यें वरील प्रकारची हुंड्याची व्यवस्था सुधारणा ह्मणून सांगितली आहे. इंग्लिश लोकांमध्यें Marriage articbs ह्मणून एक विशेष व्यवस्था असते. तिचें स्वरूप हुंड्याला देण्याचा विचार प्रचलित आहे.

हुंड्याचा वरील विनियोग वाईट आहे असें आह्मी ह्मणत नाहीं, ही गोष्ट इंग्रजी समाजाला चांगली सुखकर वाटत असेल पण ती तशी आमच्या समाजाला सुखकर होईल असें आह्मास वाटत नाहीं, इंग्रजीत कुटुम्ब ह्मणजे नवरा बायको व मुलें, आमच्या समाजांतील कुटुम्ब अगदींच निराळें. समाइकपणांत असणारीं अविभक्त सर्व मंडळी कुटुम्बाखालीं येतात. इंग्रजींत सर्वच जण विभक्त असतात. इंग्रजीसमाजाचा दायविभाग निराळा आणि हिंदु समाजाचा दायविभाग निराळा. हिंदु समाजांत एका व्यक्तीची ह्मणून निराळी इस्टेट नसते. कुटुम्बाची जी इस्टेट तीच त्यांतील प्रत्येकाची व सर्वांची इस्टेट होय. ही मूळची समाजरचना होय. लग्नाला जो खर्च होतो तो सर्व कुटुम्बाचा होतो; तेव्हां वराला जो हुंडा मिळतो तो कुटुम्बाच्या खजिन्यांत जातो. राजश्री महाजनी यांच्या इच्छे प्रमाणें केलें ह्मणजे हुंड्याची ह्मणून एक निराळीच इस्टेट केली पाहिजे. कुटुम्बांत जो द्विधाभाव नसतो तो हुंड्याच्या आगमीं प्रथमतः सुरू होतो. हा द्विधाभाव अविभक्तपणाच्या साम्राज्यावर कुठारच घालील. अगोदरच पूर्वींचीं अविभक्त कुटुंबें विभक्त व फुटकळ होत चाललीं आहेत. अलिकडे साधारण अविभक्त कुटुम्ब

एक दोन पिढ्या पर्यंत चालतें आणि मग वेगवेगळाल्या चुली होतात. या भावी स्थितीला सत्वर गती देण्याच्या इराद्यानें हुंड्या संबंधानें सूचना कदाचित् असेल पण ती सांप्रतच्या हिंदुसमाजाला नको आहे इतकेंच आमचा सांगण्याचा हेतु आहे. सांप्रतच्या हिंदुकुटुम्बांतून हुंड्या संबंधानें नवीन दंपत्य वेगळें करावें असें आह्मांस वाटत नाहीं. निदान ही कल्पना मनोवृत्तीला आवडत नाहीं. कुटुम्बांतील वधूवरां खेरीज इतर मंडळीला कुटुम्बाच्या ऐक्यभावांत हा विषबिंदु पडल्या सारखें वाटेल.

सामान्यतः गोष्ट अशी असते कीं वधूच्या अंगावर जे दागिने घालतात ते तिचें स्त्रीधन ह्मणून समजतात. कदाचित् कुटुम्बाच्या स्वास्थ्या साठीं हा दागदागिना मोडण्यांत येत असेल परंतु वधूच्या अंगावरील दागिने तिचें स्त्रीधन ह्मणून समजतात. कुटुम्बाच्या खजिन्यांतून बराच [illegible] बराचसा पैसा खर्चीं पडत असतो; आणि पुष्कळ प्रसंगीं तो खर्च हुंड्याच्या अंदाजानें होत असतो. स्त्रीधन ह्मणून जी रक्कम कुटुम्बाच्या पैशांतून काढतात तिची भरती हुंड्यानें झाली तर ती गोष्ट कांहीं वावगी नाहीं असें आह्मांस वाटतें. सारांश, हुंड्याचें वरील रूपान्तर नको आहे आणि त्या गोष्टी श्रीमंत लोकांच्या डोक्यांत घोळत असतात त्या साधारण कुटुम्बाला लागू पडत नाहींत असेंही कष्टानें ह्मणावें लागतें. शिवाय इंग्रजी कल्पनांनीं आमच्या कुटुंबांत फाटाफुटी वाढत आहे. आमच्या राष्ट्रास ह्या फाटाफुटीच्या कल्पना नको आहेत आह्मांस अविभक्तताच जास्त पाहिजे आहे. हीच सुधारणा होणें इष्ट दिसते.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY

25 1903

---

Our Local Municipal Committee have after all hit upon the proposal of levying the Octroi—duty. The whole scheme we have published in our last issue and it is hoped that the people of Akola will give it their best attention and will submit their objections in writing if they have any present to their mind. We think that there will not be a great many objections to the details of the scheme. The rates of duties have been already settled by an experienced and advanced Municipal Committee. We do not see ourselves any important defects in the draft of the proposed taxation. The Octoi—tax is however the last tax that should be resorted to in cases where there is no other hope of raising sufficient funds to meet the growing demands of an expansive municipality. Every year shows an increment in the expenditure whereas the municipal revenues have been crippled by the withdrawal of some current sources of revenue by the government. For over five years the Municipal Committee have been in a fix. Different forms of taxation have been adopted and yet the municipal revenues do not come upto the standard of a stable equilibrium. Revenue was wanted from some quarter or other before the municipal machinery can be made to work well on a sound financial basis. Several representations have been made to the government and the latter though they are not prepared to make some [illegible] and special concessions, are however willing to entertain with diligence any proposal of devising some new form of a suitable and adequate taxation. The Municipal Committee took a long time to hold their deliberations on this vitally important subject of taxation and their mature judgment is now before the public in the form of the Octroi scheme.

An Octroi duty is the last alternative and we wish to know whether our municipal body have exhausted their available sources of revenue. This tax is only allowable if the special circumstances of a municipality justify the imperative necessity of such a tax. We are not however prepared to admit that there exists such an extreme case of imposing a duty on the articles consumed within the municipal limits. There are already a number of taxes and the recent addition of an Octroi duty will make the matter still worse. The thriving cotton-industry of this town was a rich spring of fresh revenues but we are sorry to see that there was no consensus of the major portion of the municipal members in this connection. The vote of the majority ruled that the cotton industry should be allowed to continue undisturbed by means of a local taxation. There is no other industry in the province the dimensions and magnitude of which will come upto the extent of the growing and enormous cotton industry. It is to be regretted that our Municipal Committee do not see their way to levy a tax on this important bran[illegible]y. The Octroi scheme cannot reach this industry because the whole bulk of cotton is sent out to the Bombay harbour in the form of raw goods. Our province is purely agricultural and can hardly afford to do away with taxation on the raw goods like cotton when there exists a necessity for it. Our Municipality lets go free of charge this industry where as it intends to introduce a most cumberous and vexatious taxation. The octroi duty requires an expensive machinery for collecting it. In its collection there are many difficulties which leave open a wide door for oppressio[illegible] number of mal-practice[illegible] go the length of welcoming the oc[illegible] duty but for all that we would request the Municipal Committee to propose an additional tax on the cotton industr[illegible] The number of people who enjoy the blessings of an excellent Cotton—Market will not hesitate to pay in the long run a tax which will enable the Municipality, to afford them the conveniences of good road ; an ample water—supply and the pleasures of an accommodating public seat. The Akola Cotton Market will not suffer in their trade even to a small extent. The Octroi duty is one that reaches the rich and the poor alike within the limits of the Municipality, but it does not affect in the least the large crowds of out—side people who sell their cotton within municipal limits. We think that it is an unwise policy to refuse to impose some tax or other on the cotton industry of this town. Even the Hon'ble the Resident has expressed a favourable opinion to entertain a proposal of taxing the bulk of the trade that brings Akola into the flourishing state of a prosperous town. The Octroi duty affects a large bulk of the local trade but we want to see that the cotton industry pays also its quota towards the expenditure of the municipality.

---

'East and West' has the following paragraph on the probable unification of the Eastern and Western ideals:—

God is no respecter of nations, no respecter of colour. He pours forth His blessings on all, even as He causes His sun to shine in the East as well as in the West. Such virtues as love, sympathy, sacrifice, largeheartedness are not the monopoly of any one nation. There may be differences in degree according to the fullest light which each nation receives. But even in the midst of what is regarded as the darkness of heathendom, there are characters that may not be found in Christendom, "I have not found such great faith, nay not even in Israel," was the verdict of Christ. Away in Scotland I stood once on the summit of a hill and witnessed two sights, on my rights there was a grand waterfall, dashing and foaming as it cut along the stony cliffs, roaring and thundering on all sides and finally emptying itself at the foot of the hill; on the other side there was a gentle stream, which flowed calmly and majestically, widening its banks, and gradually increasing its volume till it became a large river. Some miles further away the two waters blended together, and the united stream flowed along carrying fertility and bringing [illegible] and happiness to thousands of people.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— यंदा वातावरणांत मोठी चलबिचल दिसते. कधीं कडक सूर्यताप, कधीं ढगाची छाया, कधीं तुफान वारा, कधीं थोडा पाऊस इत्यादि गोष्टींमुळें भावी पर्जन्य कालाविषयीं बरोबर कल्पना बसत नाहीं. सध्यां रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं प्लेग बिलकूल नाहीं.

मे० हेअर साहेब कमिशनर आहेतच पण मे० ब्याटन साहेब सिव्हील आणि सेशन जज्ज असतांना यांनीं केलेल्या निवाड्या विरुद्ध झालेल्या अपिलांच्या निकालाचें काम मे० हेअर साहेब हे ज्युडिशिअल कमिशनर या नामानें करितील असा हुकूम झाला आहे.

येत्या शनिवारीं सर्व सरकारी कचेऱ्या बंद राहतील. चक्रवर्ती बादशाहा एडवर्ड महाराज यांचा हा जन्म दिवस असल्यामुळें पवित्र सणाच्या दिवसा प्रमाणें हा पाळण्यांत येईल.

खान बहादूर शेर महमदखान यांनीं रजा न घेतल्यामुळें रा. फरोक हुसेन यांस वाशिमास न नेमतां पुसद तहशिलीवर आक्टींग तहशीलदार नेमण्यांत आलें.

आणि रा. रा. बाळकृष्ण सेनानी यांस तेथून बाळापुरास नायब तहशिलदार नेमण्यांत आलें.

मि. विलिसरासिंग तहशिलदार मेळघाट यांस १ महिना २४ दिवसांची हक्काची रजा दिली त्या ऐवजीं रा. रा. यशवंतराव मन यांस तहशिलदार व अलेरच्या इलिचपूरच्या नायब तहशिलदारीवर मि. डी. एम. बर्वे यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. बाबाजी रंगनाथ पोलीस इनस्पेक्टर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देऊन इनस्पेक्टर मि० सुर्ती यास इलिचपूर जिल्ह्यांत बदलले.

गेल्या मार्च महिन्यांत या प्रांतीं १०९९९ माणसें जन्मलीं व ९२१२ माणसें मरण पावलीं.

गेल्या सोमवारीं टिळक प्रकरणांत राजश्री खापर्डे व दुर्गे जोशी यांच्या साक्षी उमरावतीस व्हावयाच्या होत्या परंतु त्या तारखेची समज साक्षीदारांस दिलेली नव्हती. सरकार तर्फे बारिस्टर स्ट्रांगमन यांचा आग्रह पडला होता कीं साक्षीदारांस वारंटें काढावीं. कोर्टानें ती गोष्ट अमान्य केली आणि तारखेचा घोटाळा पुण्याच्याच कोर्टानें केला आहे असा शेरा दिला. पुढील तारीख २२ जूनची नेमण्यात आली आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=। |
| सोनें २४।= | चांदी ६९ |
| ज्वारी ४९।९० | जवस १०३ |
| गहू | ८३॥। ते ८९। |
| बाजरी | ५९ |
| मीठ | ३८=॥। रु. मण |
| चणे | ४॥– रु. मण |
| तूप | ७॥ ८ ९ रु. मण |
| तेल | ९॥ रु. मण |
| रुई | ९४॥ ५६ |

---

## वर्तमानसार

देव तारी मग कोण मारी— पाडिपाढी येथील एका बाईचा एका नष्टानें तिचे अंगावरील सर्व दागिनें व कपडालत्ता घेऊन तिला विहिरींत लोटून दिली; परंतु आंत पाणी थोडें असल्यामुळें ती मेली नाहीं असें पाहून त्यानें वरून तिच्या कपाळावर एक दोन दां धोंडे लोटल्या पण चुकल्या; ह्मणून तिचा कपाळमोक्ष करण्याचे दुष्ट बुद्धीनें त्यानें एका मोठ्या धोंड्यास हात घातला तोंच त्या धोंडी खालीं असलेल्या काळसर्पानें त्याला दंश केला, आणि त्यानेंच तो मरण पावला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या रस्त्यानें जाणाऱ्या लोकांस तो सर्व प्रकार उमगून त्यांनीं त्या बाईला विहिरींतून काढून मार्गस्थ केली.

### जपानी मेजवानी.

जपानी मेजवानी ह्मणजे अन्नाची अतोनात रगाडी. पाहुणे बोलावले असतील, त्यांच्या भोंवतीं निरनिराळया प्रकारच्या पक्वान्नांनीं भरलेलीं पंचवीस तीस ताटें मांडून ठेवलेलीं असतात. यांतून वाटेल त्या ताटावर वाटेल त्यानें वाटेल तेव्हां आणि वाटेल तसा ताव मारावा. कंटाळा आला तर मध्यें विसावा घ्यावा, इकडे तिकडे गप्पा गोष्टी माराव्या, आणि पुनः या अन्नाकडे मोर्चा फिरवावा. प्रत्येकाला अगदीं पोट भरून झाल्यावरसुद्धां जपानी लोकांत पहावें तों "नुकती कोठें मेजवानी रंगांत आली आहे" असें वाटतें. पक्वान्नें झाल्यानंतर मग आसवें येतात आणि आसवांचें पान यथेच्छ झालें ह्मणजे एक मडें थोरलें पांढरें पिंप भरून ऊनऊन भात आणतात व त्या बरोबर ताजा बनविलेला चहा येतो. मग प्रत्येक पाहुणा प्रथम दोन दोन मुठी भात उठवतो व तो झाल्यावर चहांत मिश्रत वातलेला भात आणखी एक एक मुद तरी चापतो!

### इंजिनिअर पक्षी.

पक्ष्यांत पेनग्वाईन ह्मणून एक जात आहे. ते पक्षी बहुतेक पाण्यांत राहतात. यांचे पंख लहान व आखुड असल्यामुळें त्यांना फार उंच व लांबवर चांगलें उडतां येत नाहीं. तरी पण त्यामुळें त्यांना जमिनीवरून फार जलद चालतां येतें. ते फक्त अंडीं घालण्याचे सुमारास जमिनीवर आपलीं घरटीं बांधतात. हीं बांधण्याचे पूर्वी ते मोठ्यानें जागा पसंती करितां निघतात. ती पसंत झाल्यावर ते उमयतां त्यांतील लहानमोठा दगडगोटा काढून टाकून जागा साफ सपाट करितात नंतर तिच्यांत सारखे चौक पाडून प्रत्येक चौकांत हारीनें समाप्ता अशीं आपलीं घरटीं बांधून मधून सडका ठेवतात. त्या सडका इतक्या सरळ असतात कीं पाहणारास त्या एखाद्या कुशाग्र इंजिनियरानें आखल्या आहेत असा भास होतो. अशा तऱ्हेनें ते पांच पन्नास एकर जमिनीवर आपली वस्ती करितात. त्यामुळें दुरून पाहणारास ते एक लहानसें गांवच भासतें आणि ह्मणूनच त्याला किर्येक वेळीं "प्रेनग्वाईन सिटि" असें सुद्धां ह्मणतात.

**रत्नजडित भूगोल** —तेहरान येथें इराणच्या शहानें अतिशय खर्च करून एक भूगोल करविला आहे व शहा त्यावरून नेहमीं भूगोलाचें ज्ञान मिळवीत असतो. या भूगोलावर जेवढा भूप्रदेश ह्मणून दाखविला आहे तेवढा सगळा रत्नांनीं दाखविला आहे व जलप्रदेश आहे तो केवळ पाचूंचे खडे बसवून दाखविला आहे. संबंद आफ्रिका खंड माणकांनीं दाखविलें आहे. खुद्द इराणचा प्रदेश नीलमण्यांनीं दाखविला आहे, व इंग्लंड आणि फ्रान्स हे तेजःपुंज हिऱ्यांनीं दाखविले आहेत. व संबंद भूगोल भरीव सोन्याचा आहे. हा भूगोल तयार करण्यास किती खर्च झाला आहे, हें सांगणें फार कठीण आहे. तथापि लाखों तर काय, परंतु एक दोन कोटी रुपये लागले असतील असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं.

**बंदुकींत दुर्बिण**—एका जर्मन कारागिरानें एक नवीन बंदूक तयार केली आहे. तींत दुर्बिणीची योजना झाली आहे. दूरच्या मनुष्यावर बंदुक झाडण्यासाठीं संधान साधावयाचें तें या दुर्बिणीच्या साहाय्यानें फार उत्तम साधलें जाऊन गोळी अचूक जाऊन बसावयाची, अशी योजना हींत केली आहे.

### बौधपर गणित—

(१) सौंदर्य आणि सुस्वभाव यांची बेरीज करा.

(२) मैत्रींतून मत्सर वजा करा.

(३) प्रेमाला शुद्ध अंतःकरणानें गुणा.

(४) काळाला उद्योगानें भागा.

(५) निंदेचा लघुत्तम काढा.

(६) सुविचारांचा वर्ग करा.

(७) दया, क्षमा आणि शांति यांची समीकरणें सोडवा.

(८) उत्कृष्ट मनोवृत्तीचा घन करा.

(९) नीति, सत्य आणि परमार्थ यांचें सिद्धांत सिद्ध करा.

(१०) मान, धन आणि कीर्ति यांची प्रमेयें सोडवा.

बायकांच्या गालाला उत्कृष्ट रंग कोणता? लाजेचा.

जेवणाची वेळ कोणती? १ श्रीमंतास वाटेल तेव्हां. आणि २ गरीबास मिळेल तेव्हां.

**निग्रो मुलें**—निग्रो मुलें जन्मतांच साहेबाच्या मुलांसारखीं गोरीं असतात. पुढें दहा बारा दिवसांनीं रंगांत फरक पडतो, आणि पांच चार महिन्यांनीं निळसर शिहीचा काळेपणा यांच्या आंगावर येतो. दुर्दैव बिचाऱ्यांचें!

**लवचीक कांच**—एक प्रकारची नवीन कांच निघालेली आहे. ती हवी तशी लवते. घणानें ठोकली असतां पसरते, दुसऱ्या कांचेला जोडतां येते व तिला मोकळी पाडतां येते.

**सलामी शिक्षा**—पंधरा दिवसांखालीं कोल्हापुरच्या राजाराम हायस्कुलांत एक हास्यास्पद प्रकार घडून आला. तो असा कीं, तेथील ७ व्या इयत्तेचे विद्यार्थी खालच्या मजल्यांतील सायन्सच्या लेक्चररूममध्यें जात असतां जिन्याच्या तोंडाशीं कॉलेजचे प्रिन्सिपाल मि. स्युसी यांची व यांची गांठ पडली. आपले गुरुवर्य पुढें दृष्टीस पडले असतां विद्यार्थ्यांनीं यांस सलाम केला नाहीं या बद्दल प्रिन्सिपाल साहेबांस घुस्सा येऊन त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांस क्लासांत नेऊन पुढील शिक्षा त्यांस दिली:—"मी तुमच्या पुढें हातांत घड्याळ घेऊन उभा आहे. तर एक सारखीं पांच मिनिटें तुह्मी सर्व मला सारखा सलाम करीत रहा" या प्रमाणें शिक्षा सांगून ती तात्काळ अमलांत आणली.

**चांगला ठराव**— हिंदुस्थानच्या सरकारी खात्यांतील आफिसर लोकांची अक्षरें बहुशः चांगलीं नसतात. आणि त्यांच्या सह्या तर बहुतेक वेळा वाचताही येत नाहींत ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या ध्यानांत येऊन असा ठराव करण्यांत आला आहे कीं प्रत्येक पत्राच्या डोक्यावर तें ज्या आफिसराकडून आलेलें असेल त्याचें नांव बहुत स्वच्छ लिहिलेला असावा. आतां आफिसरांना अक्षरें लिहितां येत नसलीं तरी चिंता नाहीं.

**कागद किती लवकर होतो**— झाड तोडणें, त्याची साल काढणें, ती कुटून तिचा भुगा करणें, त्याचा कागद करणें, तो छापणें, मोडणें आणि त्यांची पुस्तकें बांधून विक्रीस काढणें, इतकें सगळें काम आस्ट्रियांतील एका कारखान्यानें १ तास २५ मिनिटांत करून दाखविलें.


विक्रीसतयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड— आवृत्ती दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली अहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड — (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत ... सुद्धां ८॥४.

दिवाणी आक्टसंग्रह—(यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्टं आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २॥८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

मुंबई बँकची ठेंव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयांपर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारां वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ... } एजंट

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोकप्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षांस मी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो० गडहिंग्लज.
इ० कोल्हापूर.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अकसीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥—




देखना चाहिये क्या मुस्क कदर करती है।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आवळणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातांनीं फोडतां न येणें, दांत मळकट पाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारच्या दुखण्यां नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग यांपासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.